



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार २६ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# नायलॉन मांजा



## वापरणा-यांना ५० हजार तर विक्रेत्यांवर २.५० लाखांचा दंड

## हायकोर्टाचे निर्देश !

**मुंबई/प्रतिनिधी :** मकर संक्रांतीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असतानाच, जीवघेण्या नायलॉन मांजाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अत्यंत कठोर पवित्रा घेतला आहे. आकाशात झेप घेणा-या पतंगांमुळे होणारे अपघात आणि निष्पाप जीवांचा जाणारा बळी थांबवण्यासाठी न्यायालयाने आता थेट आर्थिक दंडाचा बडगा उगारला आहे. नायलॉन मांजा विकणा-या विक्रेत्यांवर अडीच लाख रुपये आणि तो वापरणा-यांवर ५० हजार रुपये दंड ठोठावण्याचे निर्देश न्यायालयाने विदर्भातील सर्व जिल्हाधिका-यांना दिले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून नायलॉन मांजामुळे गळे चिरले जाणे, पक्षी जखमी होणे आणि प्राणांतिक अपघात होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. याची गंभीर दखल घेत न्यायालयाने २०२१ मध्ये स्वताहून जनहित याचिका दाखल करून घेतली होती. गेल्या तीन वर्षांत परिस्थितीत कोणताही ठोस बदल न झाल्याबद्दल न्यायमूर्तींच्या खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली आणि आता कडक दंडात्मक कारवाईचे आदेश दिले आहेत:

**विक्रेत्यांवर कारवाई :** नायलॉन मांजाची विक्री करणा-या दुकानदारांना अडीच लाख रुपयांचा दंड सोसावा लागणार आहे.

**वापरणा-यांवर दंड :** पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजा वापरणा-या व्यक्तीला ५० हजार रुपये दंड होईल.

**पालकांवर जबाबदारी :** जर मांजा वापरणारा मुलगा अल्पवयीन असेल, तर दंडाची ही रक्कम त्याच्या पालकांकडून वसूल केली जाणार आहे.

**२७ डिसेंबरला जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे आदेश**

न्यायालयाने या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाला स्पष्ट कालमर्यादा आखून दिली आहे. विदर्भातील सर्व जिल्हाधिका-यांनी २७ डिसेंबर २०२५ रोजी सर्व प्रमुख वर्तमानपत्रांच्या मुखपृष्ठावर जाहीर नोटीस प्रसिद्ध करावी, असे आदेश देण्यात आले आहेत. या नोटीसद्वारे जनतेला दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात येईल आणि संबंधितांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देउन ही दंडात्मक कारवाई केली जाईल.

**पोलिस अधिका-यांचीही आता सुटका नाही!**

केवळ विक्रेते किंवा नागरिकच नाही, तर आता पोलिस प्रशासनालाही न्यायालयाने जबाबदार धरले आहे.

**क्षेत्रनिहाय जबाबदारी :** ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत नायलॉन मांजाचा वापर किंवा विक्री आढळेल, त्या भागातील संबंधित पोलिस अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिस आयुक्त आणि अधीक्षकांना दिले आहेत.

**२९ डिसेंबरची डेडलाईन :** सर्व पोलिस आयुक्त आणि संबंधित अधिका-यांना या आदेशाची माहिती २९ डिसेंबरपूर्वी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ड्युटीत कसूर करणा-या अधिका-यांवर कारवाई का केली जाउ नये, अशी विचारणाही न्यायालय करणार आहे. (पान २ वर)

## पंतप्रधान मोदींनी लखनऊमध्ये 'राष्ट्र प्रेरणा स्थळ'चे केले उद्घाटन

**लखनउ/वृत्तसंस्था :** आज भारतरत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची १०१ वी जयंती आहे. या निमित्ताने दिल्लीतील सदैव अटल येथे प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लखनउ येथे राष्ट्र प्रेरणा स्थल या भव्य स्मारकाचे उद्घाटन केले. राष्ट्र प्रेरणा स्थल सुमारे ६५ एकरांच्या विस्तीर्ण परिसरात सुमारे २३० कोटी रुपयांच्या खर्चातून विकसित करण्यात आले आहे.हा परिसर एक राष्ट्रीय संपत्ती म्हणून पाहिला जात असून, भविष्यातील पिढ्यांना नेतृत्व, सेवा आणि सांस्कृतिक जाणीव यांची प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या भव्य उद्घाटन समारंभाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणासह कडेकोट



सुरक्षा व्यवस्थेत हा कार्यक्रम पार पडला आणि लखनउ शहराने एका नव्या युगाची सुरुवात अनुभवली. पंतप्रधान मोदी यांनी दुपारी २.३० वाजता या विशाल स्मारकाचे उद्घाटन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्स वर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली. त्यांनी लिहिले, देशाच्या महान विभूतींच्या वारशाचा सन्मान आणि संवर्धन करण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे. याच क्रमाने उद्या दुपारी सुमारे २.३० वाजता लखनउ येथे माजी पंतप्रधान भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी (पान २ वर)

## धावत्या बसचे टायर फुटून 9 ठार



**कुड्डालोर /वृत्तसंस्था-**तामिळनाडूच्या कुड्डालोर जिल्ह्यात रात्री झालेल्या भीषण अपघातात नउ जणांचा मृत्यू झाला. चार जण गंभीर जखमी झाले. तिरुचिरापल्लीहून चेन्नईला जाणा-या एका रोडवेज बसचे टायर फुटल्याने राज्य महामार्गावर अपघात झाला. टायर फुटल्यानंतर बस अनियंत्रित झाली, दुभाजकावर चढली आणि विरुद्ध लेनमध्ये गेली, ज्यामुळे समोरून येणा-या दोन कार चिरडल्या गेल्या. दोन्ही कार बसखाली अडकून पूर्णपणे चिरडल्या गेल्या. अपघाताची माहिती मिळताच तिरुचिरापल्ली आणि रामनाथम येथील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि स्थानिक रहिवाशांच्या मदतीने अडकलेल्यांना बाहेर काढले.जखमींना तिरुचिरापल्ली आणि पेराम्बलूर येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातामुळे चेन्नई-तिरुची राष्ट्रीय महामार्गावर एक किलोमीटर लांब वाहतूक कोंडी झाली. क्रेनच्या मदतीने सुमारे दोन तासांनंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली. मृतांमध्ये पाच पुरुष आणि चार महिलांचा समावेश आहे. अपघातात दोन्ही कारमधील सात जणांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दोन मुलांसह चार जखमींवर उपचार सुरू आहेत.

**मुख्यमंत्र्यांकडून मदत जाहीर**

मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. मुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री मदत निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ३ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींना प्रत्येकी १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल.

## चंद्रपुरात भीषण अपघात; 4 महिला ठार, 5 जण जखमी

### चालकावर गुन्हा दाखल

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** नागपूरहून कागजनगरकडे जात असलेली मारुती सुझुकी इर्टिका कार पुलाखाली कोसळून झालेल्या भीषण अपघातात चार महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. ही घटना बुधवारी (२५ डिसेंबर) पहाटे सुमारे दीडच्या सुमारास राजुरा तालुक्यातील सोंडो गावाजवळ घडली.टीएस ०२ ईएन ५५४४ क्रमांकाची इर्टिका कार सोंडो गावाजवळील वळणाचा अंदाज न आल्याने चालकाचा ताबा सुटला आणि गाडी थेट पुलाखाली कोसळली. या अपघातात सलमा बैग, उक्रसा सकरीन, अब्जल बैग आणि सहिरा बेगम यांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये आईसह मुलीचा समावेश आहे.

अपघातात चालक अब्दुल रहमान (वय २८), नुसरत बेगम, नजहत बेगम, साहिल निशा आणि अब्दुल अरहान हे पाच जण जखमी झाले असून त्यांना चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोघांना व्हेंटिलेटरवर ठेवले आहे. अन्य जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. कार्यक्रम आटोपून नागपूरहून परत येत असताना चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे. या प्रकरणी चालक अब्दुल रहमान याच्यावर कलम २८१, २२५ (बी), १०६ (१) बीएनएस तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ अंतर्गत गुन्हा



दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार सुमित परतेकी करीत आहेत.रात्रीच्या प्रवासादरम्यान वेग आणि निष्काळजीपणामुळे अशा घटना वारंवार घडत असून, पुन्हा एकदा सुरक्षिततेच्या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्याने चार निष्पाप जीव गेले.

## अपघातात बसला आग; 10 प्रवाशी जळून खाक

**चित्रदुर्ग / वृत्तसंस्था-**कर्नाटकातील चित्रदुर्गात गुरुवारी (२५ डिसेंबर) पहाटे एक भीषण रस्ते अपघात झाला. या अपघातात १० जणांचा जागीच मृत्यू झालाय. एका लारीची एका खासगी ट्रॅव्हल बसशी जोरदार टक्कर झाल्याने हा अपघात झाला असून, धडकेनंतर बस आणि लारी दोघांनाही आग लागली. या अपघातात बस पूर्णपणे जळून खाक झाली असून, अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटकात एका खासगी ट्रॅव्हल बसला एक लारीनं धडक दिली आणि त्यानंतर दोन्ही वाहनांना आग लागली. या अपघातात बस पूर्णपणे जळून खाक झाली, त्यात अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला. ही बस बंगळुरूहून शिवमोग्गा मार्गे गोकर्णला जात होती. हिरीयुर



गोरलाडू क्रासजवळील जावंगोंडानहल्ली येथे हा अपघात झाला. लारीची धडक बसल्यानंतर अचानक बसमधून आगीच्या ज्वाळा निघाल्या. प्रवाशांनी पळून जाण्याचा प्रयत्न करताच आगीने त्यांना वेढले. आग इतक्या वेगाने पसरली की त्यात अनेकांचा मृत्यू झाला. गुरुवारी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातात लारी चालकासह किमान १० प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे अधिका-यांचे म्हणणे आहे. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी बचाव कार्य सुरू केलंय. अपघातावेळी वाहनामध्ये ३० प्रवासी होते, असे समजते.अपघाताबाबत अधिक माहिती मिळण्याची प्रतीक्षा आहे. अतिरिक्तजिल्हा दंडाधिकारी कुमारस्वामी बी.टी. यांनी माध्यमांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बंगळुरूहून गोकर्णला जाणा-या बसला अपघात झाला. विरुद्ध दिशेने येणा-या एका लारीने बसला धडक दिली, ज्यामुळे हा अपघात झाला. लारी चालकाचा मृत्यू झाला आणि त्याचा मृतदेह रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला.

## एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू



**नांदेड/ मुदखेड/ प्रतिनिधी -**

एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार येथे उघडकीस आली. मृतांमध्ये आई-वडील आणि दोन मुलांचा समावेश आहे सदर घटना संशयास्पद असल्याची शक्यता वर्तवण्यात येत असून मुदखेड तालुक्यात या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. मुदखेड

### मुदखेड तालुक्यात खळबळ

तालुक्यातील जवळा मुरार येथील दोन मुलं रेल्वे खाली कटली आहेत. तर त्या मुलाच्या आई-वडिलांनी घरातच गळफास घेउन आत्महत्या केल्याची (पान २ वर)

## एक कोटीचा इनाम असलेल्या माओवादी गणेशचा खात्मा



### ओडिशा-छत्तीसगड सीमेवरील चकमकीत 4 ठार

**गडचिरोली/प्रतिनिधी :** छत्तीसगडच्या सीमेला लागून असलेल्या ओडिशा राज्यातील माओवादभावित भागात सुरक्षादलाने २५ डिसेंबर रोजी पहाटे मोठे यश मिळवले आहे. ओडिशा-छत्तीसगड सीमेवरील कंधमाल व गंजाम जिल्ह्याच्या सीमावर्ती जंगलात झालेल्या जोरदार चकमकीत दोन महिला माओवाद्यांसह चार माओवादी ठार झाले आहेत. यात संघटनेचा सेंट्रल कमिटी सदस्य व एक कोटी रुपयांचा इनामी कुख्यात माओवादी कमांडर गणेश उईके(६०) याचाही समावेश आहे.

ओडिशातील कंधमाल जिल्ह्यातील चाकपाड पोलिस ठाण्याच्या हद्दीत व गंजाम जिल्ह्याला लागून असलेल्या रांभा जंगल परिसरात ही चकमक झाली. विशेष गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ओडिशा स्पेशल ऑपरेशन ग्रुप(एसओजी), सीआरपीएफ आणि बीएसएफच्या संयुक्त पथकाने मोठ्या प्रमाणावर नक्षलविरोधी मोहीम राबवली. या मोहिमेत एकूण २३ पथके सहभागी होती. मोहिमेदरम्यान माओवाद्यांकडून गोळीबार करण्यात आला, त्याला (पान २ वर)

## देशातील 15 राज्यांच्या बहिणी ठरल्या लाडक्या!

### लाडकी बहिण ■ 2.46 लाख कोटी रुपयांचे बजेट ■ 13 कोटी महिला थेट लाभार्थी ■ राजकीय आखाड्यात स्वतंत्र मतदार गट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रारंभी मध्यप्रदेशात राबविण्यात आलेली महिलांसाठीची थेट आर्थिक मदत योजना १५ राज्यांमध्ये राबवली जात असून ती आता कल्याणकारी आधार बनली आहे. या योजनेवरील वार्षिक खर्च आता १,६०० कोटी रुपयांवरून २०२५ मध्ये २.४६ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. हा खर्च आता देशातील मोठ्या सामाजिक योजनांच्या बरोबरीत आला आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात, देशातील विविध राज्ये सुमारे १३ कोटी महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा करत आहेत. म्हणजेच, भारतातील सुमारे पाचपैकी एका महिलेपर्यंत ही मदत पोहोचत आहे. परिणामी महिलेच्या खात्यात थेट पैसे हे आता निवडणूक आश्वासन न राहता, सरकारसाठी आर्थिक आव्हान बनले आहे.

तेलंगणा, झारखंड आणि दिल्लीमध्ये दरमहा २,५०० रुपये



दिले जातात, तर बिहार आणि आंध्र प्रदेशात वर्षातून एकदा किंवा ठराविक वेळी मोठी रक्कम दिली जाते. काही राज्यांत केवळ ठरावीक उत्पन्न गटातील विवाहित महिलांनाच लाभ मिळतो, तर काही ठिकाणी विधवा आणि एकल महिलांचाही समावेश आहे. काही राज्ये तर सर्वच सज्ञान महिलांना लाभ देण्याच्या दिशेने पावले टाकत आहेत. एकंदरीत सध्या सर्वच राजकीय पक्षांमध्ये बहिणींचे कोडकौतुक करण्याची जणू स्पर्धा लागली आहे.

बहुतेक राज्यांसाठी, थेट रोख लाभावर खर्च होणारा प्रत्येक अतिरिक्त रुपया बजेटवर मोठा ताण आणत आहे. तरीही, महिलांच्या हातात ठराविक (पान २ वर)

## डिव्हायडरवर कार धडकून स्फोट; एकाचा होरपळून मृत्यू

**नांदेड :** जिल्ह्यातील नांदेड-लातूर महामार्गावरील कलंबर फाटा जवळ डिव्हायडरवरती कार चढून झालेल्या भीषण अपघातात कारचा मोठा स्फोट होउन आगीत एकाचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नांदेड लातूर महामार्गावर सोनखेड जवळील कलंबर फाट्याजवळ लातूरहून नांदेडकडे येणा-या एमएच २६ एके ६४४४ या हयूंडाई कारने डिव्हायडरला जबरदस्त दिल्यामुळे कारचा जागीच स्फोट झाला यात चालक होरपळून गेला असून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी आठच्या सुमारास घडली. घटनेची माहिती मिळताच सोनखेड पोलिस (पान २ वर)






जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संविधान नाकारले तर मोठी किंमत मोजावी लागेल

## डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेत डॉ.अविनाश पाटील यांचे व्याख्यान



**अमरावती/प्रतिनिधीः-** संविधान हा आपल्या देशातील लोकांनी स्वतःप्रत केलेला करार आहे आणि तो टिकवायचा असेल तर संविधानाकडे निकोपपणे पाहण्याची गरज आहे. संविधान नाकारले तर मोठी किंमत मोजावी लागेल आणि क्षणिक लोभापायी आपण पुढच्या पिढीचे भवितव्य धोक्यात टाकू, तेंव्हा संविधान समजून घ्या, असे आवाहन विवेकनामा फाउंडेशन, धुळेचे अध्यक्ष अविनाश पाटील यांनी केले.शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती उत्सवानिमित्त मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात आयोजित डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख हे होते.

'भारतीय संविधान व लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर बोलताना अविनाश पाटील म्हणाले की, संविधानापलीकडे काही वेगळी यंत्रणा आहे आणि त्या आधारावर कारभार चालतो असे आजचे चित्र आहे.एक अदृश्य शक्ती काम करत आहे जी संविधानाने निर्माण केलेल्या यंत्रणाच्या पलीकडे आहे,पुढे पूर्ण कारभार या शक्तीच्या हातात जाईल की काय अशी भीती निर्माण झाली आहे.संविधानसंबंधीचे काही गैरसमज असून आपण संविधानाकडे निकोपपणे बघतो की नाही असे जाणवते. संविधानाबाबत गैरसमज पसरविल्या गेले आणि आजही जात आहेत, असेही पाटील म्हणाले.आपल्याला संविधान समजून घेण्याची गरज वाटली नाही कारण आपल्याला जे पाहिजे ते सहज मिळत गेले.आपल्या पिढ्यांनी केवळ संविधानाचे फायदेच घेतले.या देशाचा कारभार राजकीय नेते नव्हे तर प्रशासकीय नेते चालवितात.देशातील सर्वच व्यवस्थांची हास्यास्पद अवस्था असून प्रशासकीय यंत्रणेने त्यांना हात लागणार अशी व्यवस्था करून ठेवली आहे.संविधानाबाबत लोकशाहीत व प्रशासनात काही अंधश्रद्धा तयार केल्या गेल्या आहेत. आणि लाभार्थी समूहाकडून सुद्धा त्या तयार केल्या गेल्या आहेत.अशा वेळी संविधान समजून घेण्याकरिता संविधान सभेतील चर्चा वाचणे आवश्यक आहे, अत्यंत कमी शब्दात मांडलेली संविधानाची उद्धेशिका ही एखाद्या महाकाव्यासारखी आहे,असेही ते म्हणाले.

शिक्षित समाजाचा संविधाना संदर्भातला दृष्टीकोन नकारात्मक असणे ही शोकांतिका असून ही उदासीनता कशी दूर करता येईल असा प्रयत्न शिव परिवाराकडून करू, असे व्याख्यानाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख आपल्या भाषणात म्हणाले.

यावेळी अविनाश पाटील यांचा शाल, ग्रंथ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.व्याख्यानाचे प्रास्ताविक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांनी केले तर डॉ.राजेश मिरगे पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ.प्रशांत हरमकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ.जयराम गायकवाड यांनी केले व डॉ.अपर्णा सरोदे यांनी आभार मानले.

## नगरसेवकाला शिविगाळ करत जिवे मारण्याची धमकी

■ विजयी शुभेच्छा बॅनर पोस्टर फाडले
■ चांदूररेल्वे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूररेल्वे सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रभाग क्रमांक ४ येथून आपले चांदूर पॅनल चे युवा नवनिर्वाचित नगरसेवक हर्षल वाघ यांना गलिच्छ शिविगाळ करत जिवे मारण्याची धमकी तसेच निवडणूक विजयी शुभेच्छा बॅनर पोस्टर स्वरूप रोडे यांनी फाडले म्हणून स्वरूप रोडे यांच्या विरोधात नवनिर्वाचित नगरसेवक हर्षल वाघ यांनी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीत शहरातील वातावरण तापले. निकाला नंतर विजयी मिरवणूक पोस्टर बॅनर लावून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. अश्यात हर्षल वाघ व नगराध्यक्ष प्रियंका निलेश विश्वकर्मा यांचे शुभेच्छा फलक प्रभाग क्रमांक ४ मध्ये लागले. हे बॅनर विरोधक स्वरूप रोडे यांनी फाडले व हर्षल वाघ यांना शिविगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे हर्षल वाघ यांनी स्वरूप रोडे (वय ३२ ,राहणार आझाद चौक) तसेच अन्य काही अज्ञात युवकांविरोधात चांदूररेल्वे पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली. त्यांनी तक्रारी म्हटले की माझ्या किंवा परीवारातील इतर लोकांना तसेच माझे सहकारी यांच्या सोबत कुठल्याही प्रकारे घातपात, अपघात झाल्यास या करीता स्वरूप रोडे जवाबदार असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.सदर युवक हा भांडखोर प्रवृत्तीचा असल्याने सदर युवा विरोधात शहरातील पोलिस स्टेशन मध्ये एन सी अनेक गुन्हे दाखल असल्याची चर्चा असून हर्षल वाघ यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३५१(३),३२४(२),३५२ अन्वये गुन्हे दाखल केले.पुढील तपास पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी करीत आहे.

## वलगावातील वरली, जुगारावर धाड

**अमरावती :** वलगाव पोलिसांनी विविध ठिकाणच्या वरली मटका आणि जुगारावर धाड टाकून आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला. गजानन शंकरराव माहोरे (वय ५२, रा. वलगाव) व विलास रंगराव लाखंडे (वय ४५, रा. अनकवाडी) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तर विनायक बावने (रा. चांदुरबाजार) हा आरोपी पसार झाला आहे. गजानन माहोरेसह अकरा जणांकडून सहा दुचाकी व जुगारातील रोख जप्त करण्यात आली असून, विलास लाखंडेकडून वरली-मटक्याच्या चिठ्या व रोख जप्त करण्यात आली आहे.

## अवैध दारूवर पोलिसांची कारवाई

**अमरावती :** बडनेरा पोलिसांनी २४ डिसेंबर रोजी छत्री चौकातील रहिवासी महिलेच्या ताब्यातून ९६० रुपये किमतीची दारू जप्त केली. तसेच वलगाव रोडवरील धर्मपाल माधवराव स्थुल (वय ४३, रा. वलगाव रोड) याच्या ताब्यातून १,१०० रुपयांची दारू जप्त केली आहे. दोन्ही आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## जल जीवन मिशनची कामे रखडली

**नागपूर :** ग्रामीण भागात प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणा-या जल जीवन मिशन योजनेची अंमलबजावणी सध्या विविध अडचणींमुळे संथ गतीने सुरू आहे. केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध न होणे, अपेक्षित लोकवर्गणी जमा न होणे तसेच श्रमदानाचा अभाव यामुळे योजनेतील अनेक कामे रखडल्याचे स्पष्ट झाले आहे. जल जीवन मिशनसाठी भांडवली गुंतवणुकीच्या प्रमाणात तब्बल २ हजार २२६ कोटी रुपयांची लोकवर्गणी जमा होणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात केवळ २२.०९ कोटी रुपयांचीच लोकवर्गणी जमा झाली आहे. म्हणजेच केवळ एक टक्क्याहून कमी वर्गणी जमा झाली आहे. लोकवर्गणी देणे शक्य नसल्यास श्रमदानाची मुभा देण्यात आली असतानाही, प्रत्यक्षात श्रमदानालाही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळे येत आहेत. राज्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण ५१ हजार ५६० योजना समाविष्ट आहे.

## पाळा येथील युवकाने घेतला गळफास

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी लगतच असलेल्या श्रीक्षेत्र पाळा येथील मोलमजुरी करणाऱ्या एका २८ वर्षीय युवकाने घरातील छताच्या लोखंडी पाईपला दोरीचा गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज दि.२५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजताचे दरम्यान उघडकीस आली.

मृतक युवकाचे नाव कमलेश पंढरी कडू (वय २८ वर्षे रा.पाळा) असे आहे.याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पाळा येथील कमलेश पंढरी कडू हा त्याची वृद्ध आई आणि भावा सोबत राहत होता. मोलमजुरी करून आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत होता. घरची परिस्थिती अतिशय हालाकीची. त्यातच बेरोजगारी यामुळे



व्यसनाधीन झालेल्या कमलेश कडू याने टोकाचा निर्णय घेऊन आपल्या स्वतःच्या घरातील एका खोलीत घराच्या छताला असलेल्या लोखंडी पाईपला दोरीचा गळफास घेऊन आत्महत्या केली. लगेच या घटनेची माहिती गावातील पोलीस पाटील यांनी मोर्शी पोलीस स्टेशन येथे दूरध्वनीवरून दिली. घटनेची फिर्याद मृतकाचा भाऊ प्रकाश कडू यांनी नोंदविली.लगेच मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज साबळे यांनी घटनास्थळी जाऊन मृतक कमलेशचे प्रेत खाली काढून उपजिल्हा रुग्णालय येथे शवविच्छेदनाकरिता रवाना केले.उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी मर्ग गुन्हा दाखल करून पुढील तपास आरंभीला आहे.

पान १ व १० वरून

## वापरणा-यांना 50 हजार तर

**का घेतला हा कठोर निर्णय?**

जीवघेणा धोका: नायलॉन मांजा हा विरघळणारा नसल्यामुळे तो पर्यावरणासाठी घातक आहेच, शिवाय मानवी गळ्यासाठी एखाद्या तलवारीसारखा काम करतो. न्यायालयाने यापूर्वीही निर्बंध घातले होते, मात्र जमिनीवर त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने दंडाची रक्कम वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## पंतप्रधान मोदींनी लखनऊमध्ये

यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त राष्ट्र प्रेरणा स्थलचे उद्घाटन करण्याचे सौभाग्य मला मिळणार आहे.पुढे त्यांनी लिहिले,या ठिकाणी वाजपेयीजींसोबतच डा. श्यामा प्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या भव्य कांस्य प्रतिमाही उभारण्यात आल्या आहेत. यासोबतच एक अत्याधुनिक संग्रहालय विकसित करण्यात आले आहे, जिथे राष्ट्रनिर्माणात या दूरदर्शी नेत्यांचे अमूल्य योगदान जाणून घेण्याची संधी मिळेल.राष्ट्र प्रेरणा स्थलची वैशिष्ट्ये : ६५ एकरांच्या विस्तीर्ण क्षेत्रात पसरलेला हा परिसर २३० कोटी रुपयांच्या खर्चातून विकसित करण्यात आला आहे. या परिसरात डा. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या ६५ फूट उंच कांस्य प्रतिमा उभारण्यात आल्या आहेत. या प्रतिमा भारताच्या राजकीय विचारधारेत, राष्ट्रनिर्मितीत आणि सार्वजनिक जीवनातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचे प्रतीक आहेत.येथे कमळाच्या आकारात उभारलेले एक अत्याधुनिक संग्रहालय आहे, जे सुमारे ९८,००० चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेले आहे.

## एकाच कुटुंबातील चौघांचा

माहिती आहे. सदर घटना दिनांक २४ डिसेंबरच्या रात्री घडली असून दिनांक २५ डिसेंबर रोजी सकाळी ही घटना उघडकीस आले आहे. परंतु हे सर्व संशयास्पद असल्याचे बोलले जात आहे.मयत मुलाचे नाव उमेश लखे २५ व दुस-याचे बजरंग लखे वय २२ असे आहे तर वडील रमेश लखे वय ५१ व आईचे नाव राधाबाई रमेश लखे वय ४५असे असल्याचे माहिती समजते. या घटनेची माहिती मिळताच भोकर अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील पोलीस फौज फाट्यासह घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. सदर घटना ही आत्महत्या प्रकारातली आहे की खातपात आहे याबाबत तर्क वितर्क सुरू असून पोलीस गतीने या घटनेचा तपास करीत आहेत या तपासातच नेमकी सत्य घटना काय आहे हे पुढे येणार आहे या घटनेमुळे मुदखेड तालुक्यात खळबळ उडाली आहे.

## एक कोटीचा इनाम

सुरक्षादलाने चोख प्रत्युत्तर दिले.चकमक संपल्यानंतर घटनास्थळावरून वर्दीधारी चार माओवादी, दोन पुरुष व दोन महिलांचे मृतदेह आढळून आले. याठिकाणाहून दोन इन्सास रायफल व एक ३०३ रायफलही जप्त करण्यात आली आहे. ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये गणेश उईके आहे. उर्वरित तिघांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

**तीन दशकांपासून होती दंडकारण्यात दहशत**

गणेश उईके हा गेल्या तीन दशकांपासून दंडकारण्यातील आंध्र प्रदेश, ओडिशासह छत्तीसगडच्या बस्तर भागात माओवादी कारवायांमध्ये सक्रिय होता. अनेक गंभीर माओवादी हल्ल्यांमध्ये त्याचा सहभाग असून त्याच्यावर ओडिशा व छत्तीसगड पोलिसांनी एक कोटी ते १.१ कोटी रुपयांपर्यंतचे बक्षीस जाहीर केले होते. दरम्यान, या संपूर्ण कारवाईवर ओडिशा पोलिसांचे डीआयजी ऑपरेशन्स अखिलेश्वर सिंह यांनी थेट लक्ष ठेवले होते. चकमकीनंतर परिसरात शोधमोहीम तीव्र करण्यात आली असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## देशातील 15 राज्यांच्या

आणि रोख रक्कम देणे हे इतर विकासकामांच्या खर्चापेक्षा जास्त फायद्याचे आहे, असे संकेत दिले जात आहेत. कारण ही योजना दिसणारी, मोजता येणारी आणि निवडणुकीत खात्रीशीर फायदा देणारी ठरली आहे.

कुटुंबाच्या गरजेला मदत आणि स्वतंत्र मतदार गट

ऑब्झर्वर रिसर्च फाऊंडेशनच्या सुनैना कुमार म्हणतात की, ही रक्कम जरी कमी असली, तरी ती महिलांच्या हक्कांवर सकारात्मक प्रभाव पाडते. आर्थिकदृष्ट्या दुर्लक्षित महिलांच्या गरजांना ही योजना प्रतिसाद देत असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. नुकत्याच झालेल्या घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणानुसार, भारतात ग्रामीण भागात दरमहा प्रति व्यक्ती खर्च ४,१२२ रुपये, तर शहरी भागात ६,९९६ रुपये आहे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी हा खर्च कमी असू शकतो. महिलांच्या खात्यात येणारे १,००० ते २,५०० रुपये हे किरकोळ नाहीत; तर महिन्याच्या एकूण खर्चाचा हा एक मोठा हिस्सा बनले आहेत. या योजनेसाठी जास्त पैसा दिला, तर तोच पैसा इतर गरजेच्या क्षेत्रांसाठी कमी पडतो, ही वस्तुस्थिती असली तरी महिलांचा आणि महत्त्वाचा मतदार गट भारतीय राजकारणात तयार झाल्याचे चित्र दिसत आहे.

## डिव्हायडरवर कार धडकून

ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक माणे यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली. घटनेची माहिती नांदेड येथील एमआयडीसीच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते.

अग्निशामक दलाने तात्काळ वाहनाची आग विझवली व होरपळून गेलेल्या चालकाच्या मृतदेहास विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयांमध्ये आणण्यात आले. सदर घटना रात्री उशिरा घडली असून त्या चालकाचे नाव रात्री उशिरापर्यंत ही समजले नव्हते सदर वाहन हे नांदेड पासिंगचे असून नांदेड परिसरातील वाहन चालक असावा असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. घटनेनंतर नांदेड लातूर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनाची कोंडी झाली होती. नागरिकांनी मोठी गर्दी केली होती या घटनेबाबत सोनखेड पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## चिचफैलमध्ये नायलॉन

प्राण्यांना गंभीर इजा होण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने, अशा बेकायदेशीर विक्रीविरोधात कठोर व सातत्यपूर्ण कारवाई सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

## माजी सरपंच महिलेची

पंचनामा करुन प्राथमिक नोंद केली आहे. सायंकाळी शवविच्छेदनासाठी मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आलेला आहे. अल्का साखरे यांच्या पश्चात पती, एक मुलगी, एक मुलगा असा आप्त परिवार आहे.

## वाहत्या कॅनॉलमध्ये पतीने

कोण मारी'याप्रमाणे अक्षरशः कॅनॉलमध्ये पडताच फिर्यादी महिलेला काही अंतरावरच एक झाड हाती लागले आणि तिचा जीव कसाबसा वाचला.कॅनॉलमधून बाहेर पडताच ती एका शेतातील गृहस्थाकडे गेली,तिने हकीकत सांगितली व तिवसा पोलीस स्टेशन गाठून घटनेची फिर्याद नोंदविली. तिवसा पोलिसांनी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरून आरोपी पती शिवासह अल्पवयीन बालकास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी अधिक तपास तिवसा पोलिस स्टेशन चे ठाणेदार गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय अमोल मुडे हे करीत आहे.

## बांगलादेशातील हिंदूंवर

राजकमल चौकात यामुळे काही काळासाठी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांचा बंदोबस्त तैनात असल्याने परिस्थिती नियंत्रणात होती. बांगलादेश मध्ये राहणाऱ्या हिंदू नागरिकांना सुरक्षा देण्यासाठी ठोस पावले उचलावी अशी मागणी करण्यात आली. निर्दशने करणाऱ्यांमध्ये अनिल साहू, त्रिदेव डेडवाल, दिपक पाठक, महाराज श्रीरंग वडनेरकर ,करण सोलंके, गुरु दयाल, शरद अग्रवाल, विशाल कुलकर्णी, जयेश राजा, बन्टी पारवाणी, विजय शर्मा ,सिध्दु सोलंकी, विजय खडसे, श्रीचंद तेजवानी, अॅड प्रशांत देशपांडे, विनोद तपासे, अश्विन चौधरी, सुरज कोठार, विशाल कुलकर्णी, शरद अग्रवाल, रश्मिकांत घोस, श्रैयस बानाबुटे, कैलास परदेशी, लविना हर्ष, प्रवीण गोयनका, साहिल सोनकर, योगिता कलंबे ,भारती गायकवाड़ ,सुधीर बोपुलकर , अभिनव हिरूडकर, अकाश गौड , सुमित अनासने, रुपेश राऊत, अमित खेडकर , अंजिक्य काले, तेजस इनजिलकर, पवन श्रीवास , श्यामबाबा निचत, उमेश बछेल, सागर व्यास, सजय तिरथकर, सुधा तिवारी,खासदार अनिल बोडे, गजानन देशमुख, विक्की शर्मा, पुरुषोत्तम बजाज, वैभव भगत ,चेतन वाटणकर ,सतीश कुरील, अक्षय निनावे, पकंज गायकवाड़ सह इतरांचा सहभाग होता.

## रोहिच्या धडकेत दुचाकीस्वार

छातीला गंभीर इजा झाली. यावेळी काही नागरिकांच्या मदतीने तिवसा उपजिल्हा रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले असता पुढील उपचारासाठी अमरावती हलविण्यात आले. मात्र वाटेतच महेश पोल्हाड यांचा मृत्यू झाला.त्यांच्या पच्छात आई-वडील, पत्नी व चार वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने पोल्हाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## कत्तली साठी जाणाऱ्या

११ गोवंश जातीचे जनावरे १ लाख २१ हजार व बोलेरो पिअकप वाहन १० लाख असा एकूण ११ लाख २१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपीला पुढील कार्यवाहीसाठी शिरखेड पोलिसांचा ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक निरीक्षक ईश्वर वर्ग, उपनिरीक्षक विशाल रोकडे, अमलदार संतोष तेलंग, दीपक पाल, मनोज कळस्कर ,राजेश कासोटे ,दीपक पाटील, मारुती वैद्य ,अरुण श्रीनाथ, चालक कुणाल भुयार यांनी केली.

## जप्त घराचे सिल

आठ लाख रुपये कर्ज घेतले होते. मात्र त्यांनी कर्जाची किस्त वेळेत न भरल्याने बँकेने काठीपुरा काजीपुरा येथील त्यांचे घर आदेशांनुसार सिल केले होते. तथापि, आरोपींनी अवैध पद्धतीने घराचे सिल तोडून त्यावर कब्जा केला. बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलीस ठाण्यात अकबर हुसेन व इकबाल हुसेन यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला असून तपास सुरू आहे.

## सुजाण सर्जिकल अँड कॅन्सर

फाउंडेशन ची स्थापना केली होती ज्याचे उद्घाटन माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्त झाले होते. आजपर्यंत त्यांनी शेकडो रुग्णांवर प्रभावी उपचार केले आहे. या रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आयुष्यमान भारत सरकार योजना महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण योजना अंतर्गत निशुल्क उपचार करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त सर्व कंपनीचा विमा सुविधा येथे उपलब्ध आहे. अत्याधुनिक रेडीओ थेरपी मशीन येथे उपलब्ध होत आहे. रुग्णालयात रुग्णांसाठी अत्याधुनिक सुविधा सुजाण सर्जिकल केयर घेऊन येत आहे. या सुविधांचा रुग्णांना भविष्यात लाभ होणार आहे. रेडिएशन थेरेपी, बॉडी रेडिएशन थेरेपी सह इतर सुविधा रुग्णांसाठी येथे उपलब्ध आहे. जिल्ह्यातील रुग्णांसाठी हे हॉस्पिटल नवसंजीनी सिध्द होणार आहे,असा दावाही करण्यात आला. पत्रकार परिषदेमध्ये डॉ. राजेंद्र अरोरा सह इतर उपस्थित होते.

## ख्रिसमस मानवी जीवन

यादरम्यान लहान मुलांच्या वतीने सुरेल आवाजात कॅरॉल म्हणजे अर्थातच येशूच्या जन्माच्या गाण्यांचे अप्रतिम असे सादरीकरण केले.

यावेळी ख्रिसमस ट्री ची सजावट,करोल्स चे पार्श्वसंगीत,तसेच येशू ख्रिस्त जन्माचा सोहळा असे आनंददायी चित्र यावेळी चर्च परिसरात दिसून आले. तसेच प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मप्रसंगाचे वर्णन करणाऱ्या प्रतीकात्मक देखाव्याने सुद्धा सर्वांचे लक्ष वेधले होते. कार्यक्रमादरम्यान अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपला मतदार हक्क बजावावा, यासाठी विशेष शपथ घेण्यात आली. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व, जबाबदार नागरिक म्हणून सहभाग आणि निर्भय व निष्पक्ष मतदान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला शहरातील ख्रिस्तबांधव अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वंचित बहुजन आघाडीची

वंचित बहुजन आघाडी व युनायटेड रिपब्लिकन फोरम यांच्यासोबत युती निश्चित करण्यात आली. युनायटेड फोरमचे अध्यक्ष अलीम पटेल यांनी विधानसभा निवडणुकीत अमरावतीतून ५४ हजार पेक्षा जास्त मतं घेऊन सर्वांची झोप उडवली होती. त्यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. भाजपा सत्तेवर असताना मनपामध्ये भ्रष्टाचार, ठेकेदारी पद्धत वाढली, सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला. केंद्रात राज्यात सत्ता असतानाही जर विकास होत नसेल तर मतदारांना नवा पर्याय देण्यासाठी ही युती झाली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ६० जाग्यावर निवडणूक लढण्याची तयारी आम्ही केलेली आहे लवकरच उमेदवारांची यादी घोषित करण्यात येणार आहे,असे सांगण्यात आले. पत्रकार परिषदेमध्ये राहुल मेश्राम, रमेश आठवले, डॉ. अलीम पटेल, किरण गुडधे, सतीश बगडे, अजय तायडे,आनंद इंगळे, दत्ता पिल्लेवार, बाबाराव गावंडे, रोहित गवई आदि उपस्थित होते.

## 'शिवाजी'च्या आंबा परिषदेला

उदघाटन सोहळ्याला प्रामुख्याने उपस्थित होते.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेने राष्ट्रीय कृषी प्रदर्शनी नंतर दरवर्षी कृषी संबंधीचा जो उपक्रम हाती घेतला आहे तो अत्यंत स्तुत्य असून नुसती परिषद न घेता प्रत्यक्ष प्रात्यक्षिक ही संस्था परिसंवादाचे वेळी देते हे महत्त्वाचे असल्याचे सांगून डॉ.गडाख यांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या अतिसघन आंबा लागवड परिषदेच्या उदघाटन सोहळ्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे नवनियुक्त कुलगुरू डॉ.विलास खर्चे आणि डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

परिषदेचे मुख्य संयोजक व श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर देशमुख यांनी प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे स्वागत केले.उदघाटन सोहळ्याचे संचालन डॉ.राजेश मिरगे यांनी केले तर कृषी विद्याशाखा, रुरल इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अभय ढोबळे यांनी आभार मानले.जे.डी.सांगळूदकर महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या चमूने डॉ.राजेश उमाळे व डॉ.सुरेंद्र होजे यांच्या नेतृत्त्वात स्वागतगीत व गौरवगीत सादर केले.श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाला आंबा परिषदेच्या आयोजनात शिवाजी कृषी महाविद्यालय, शिवाजी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी विद्याशाखा, रुरल इन्स्टिट्यूट आणि जनता कृषी विद्यालय यांचे सहकार्य लाभले.या परिषदेला विविध वक्त्यांनी मार्गदर्शन केले.सुमारे दोन हजार शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला.

**कुलगुरू डॉ.विलास खर्चे-**

आपला देश कृषिप्रधान देश असून महाराष्ट्र हे कृषीच्या संदर्भात अग्रगण्य राज्य आहे. आपल्या राज्याची हार्टीकल्चर राज्य म्हणून ओळख आहे, असे प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ.विलास खर्चे म्हणाले.एकचएक पिक पद्धतीमुळे जमिनीचे आरोग्य खालावले असून हवामान बदलाचा देखील शेतीवर परिणाम होत आहे.त्यामुळे पिक बदल आवश्यक आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्था अगदी योग्यवेळी हा उपक्रम घेत असून ही अत्यंत अभिनंदनीय आहे, असेही खर्चे म्हणाले.मोरेश्वर वानखडे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

## एनडीपीएस पथक, डॉग

हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. कारखाने प्रत्यक्ष सुरू आहेत की फक्त नावापुरते सुरू ठेवून आतमध्ये बेकायदेशीर उद्योग सुरू आहेत, याची बारकाईने पडताळणी केली जाणार आहे. पोलिस तपासात अनेकदा बंद पडलेले कारखानेच अवैध दारू, गुटखा व अंमली पदार्थ निर्मितीसाठी वापरले जात असल्याचे समोर आले आहे. विशेष बाब म्हणजे, उत्पादन ज्या शहरात होते, त्या शहरात विक्री न करता इतर जिल्हे किंवा राज्यांत तस्करी केली जाते. याच पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील बंद कारखान्यांवरील चौकीदार, कर्मचारी व मालकांची कसून चौकशी सुरू आहे.

शोध मोहिमेदरम्यान कोणत्याही कारखान्यात संशयास्पद किंवा अवैध उद्योग आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. बडनेरा एमआयडीसी परिसरात वर्षभरापूर्वी उघडकीस आलेल्या बनावट दारू प्रकरणाची आठवण करून देत, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठीच ही व्यापक मोहीम राबविली जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. शहरातील अवैध उद्योगांना कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी ही तपासणी मोहीम पुढील काही दिवस आणखी तीव्र स्वरूपात सुरू राहणार असल्याचे संकेत पोलिस विभागाने दिले आहेत.

अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ‘बिस्मिल की महफिल’चा बुरखा, आत फसवणुकीचा बाजार !

## – सुफी संगीताचा जलसा की फसवणुकीचा तमाशा ?
## – अकोलेकर संतप्त, कारवाईची मागणी तीव्र

***अकोला : ‘सुफी संगीताचा जलसा’ म्हणून जाहिरातबाजी करत अकोलेकरांच्या भावनांशी खेळ करण्यात आला, असा ठपका ‘बिस्मिल की महफिल – मैं हूँ सुफी’ या कार्यक्रमावर ठेवला जात आहे. लाखो रुपये उकळूनही मूलभूत सुविधांचा अभाव, दोन तासांचे सांगून काही मिनिटांचे सादरीकरण आणि आयोजकाचे संशयास्पद मौन यामुळे हा कार्यक्रम ‘सुफी संगीताचा जलसा’ नव्हे तर थेट ‘फसवणुकीचा तमाशाच’ असल्याची तीव्र प्रतिक्रिया आता सर्वत्र उमटू लागली आहे.***

या आयोजनात महागड्या तिकिटांच्या नावाखाली ‘व्हीआयपी’, ‘प्लॅटिनम’, ‘गोल्ड’ अशी स्वप्ने दाखवली गेली; मात्र प्रत्यक्षात प्रेक्षकांच्या हाती अव्यवस्था, गोंधळ आणि अपमान याशिवाय काहीच आले नाही. सव्वा लाखांपर्यंतची तिकिटे घेणाऱ्या रसिकांना दिलेले एकही आश्वासन पाळले गेले नाही. तर दुसरीकडे या कार्यक्रमाच्या प्रचारात भव्यतेचे दावे, प्रत्यक्षात मात्र कार्यक्रम वेळेवर सुरू न होणे, आसन व्यवस्थेचा बोजवारा, सेवा कर्मचाऱ्यांचा अभाव आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कार्यक्रमाची गुणवत्ता शून्य—असा अनुभव अनेकांनी कार्यक्रम आटोपताच कथन केला. परिणामी सुफी संगीताच्या नावावर रसिकांना आकर्षित करून, काही मिनिटांतच कार्यक्रम आटोपल्याने प्रेक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली, हे विशेष !

**बिस्मिल नावाचा वापर, सादरीकरण नाममात्र! :** प्रसिद्ध सुफी गायक बिस्मिल यांच्या नावावर तिकिटांची विक्री करण्यात आली; मात्र प्रत्यक्ष सादरीकरण अपेक्षेच्या आसपासही गेले नाही. दोन तासांचा कार्यक्रम जाहीर करून केवळ काही मिनिटांचे सादरीकरण करून ही ‘महफिल’ गुंडाळण्यात आल्याचा आरोप उपस्थितांकडून होत आहे. त्यामुळे ‘मैं हूँ सुफी’ नव्हे, ‘मैं हूँ फसवणूक’ असा संतप्त सूर रसिकांमधून उमटत आहे.

**आयोजकांची संशयास्पद शांतता :** कार्यक्रमानंतर आयोजकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केले असता अनेकांना आयोजक कार्यक्रमस्थळी आढळून सुद्धा आला नाही, तर काहींनी भ्रमणध्वनीवरून समाधानकारक उत्तर सुद्धा मिळाले नाही. त्यामुळे ना खुलासा, ना परताव्याची हमी—ही भूमिका नागरिकांचा संशय अधिक गडद करणारी ठरत आहे. नियोजनातील चूक की जाणीवपूर्वक करण्यात आलेली आर्थिक फसवणूक? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.




**पोलिस परवानगीवरही प्रश्नचिन्ह :** व्हीव्हीआयपी तिकिटांच्या नावाखाली काही खास टेबल सेवा जाहीर करण्यात आली होती; मात्र अनेक प्रेक्षकांपर्यंत ही व्यवस्था पोहोचलीच नाही. त्यामुळे या सर्व सुविधांसाठी नेमकी कोणत्या अटींवर पोलिस परवानगी देण्यात आली? याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. परवानगी प्रक्रियेत हलगर्जीपणा झाला असल्यास, जबाबदारी निश्चित करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**आयोजक नॉट रिचेबल; चौकशी व परताव्याची मागणी जोरात :** या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच फसवणूक झालेल्या नागरिकांचे पैसे परत मिळावेत, अशी ठाम मागणी अकोलेकरांकडून होत आहे. सुफी संगीताच्या पवित्र नावाला काळिमा फासणाऱ्या अशा ‘इव्हेंट फसवणुकी’ला आळा घालण्यासाठी प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार रसिकांच्या रोषाला कंटाळून आयोजक हा नॉट रिचेबल झाला असल्याची माहिती मिळाली आहे.

### इव्हेंट पार्टनर नाराज?

या संपूर्ण कार्यक्रमात आयोजक असलेल्या ‘इल्युजन स्पार्क एंटरटेनमेंट’ या कंपनीला स्पॉन्सर म्हणून अकोल्यातील काही उद्योजक जुळले होते. तर कार्यक्रमात असलेले हे फूड पार्टनर, ब्रेवरेज पार्टनर, लिकर पार्टनर यांनी सर्वांनी ठरलेल्या करारानुसार कार्यक्रमस्थळी आपली सामग्री आणून सुद्धा ठेवली, ती व्यवस्था टेबलावर पोहोचविणे ही जबाबदारी इव्हेंट आयोजक असलेल्या ‘इल्युजन स्पार्क एंटरटेनमेंट’ यांची होती. मात्र ती जबाबदारी पार न पाडल्याने प्रेक्षकांबरोबर फूड पार्टनर, लीकर पार्टनर, ब्रेवरेज पार्टनर हे सुद्धा आयोजकावर मोठ्या प्रमाणात नाराज असल्याची चर्चा खाजगीत सुरू आहे.

---

# वाशिम मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महिला मुक्तीदिन साजरा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. २५ डिसेंबर रोजी आनंद बुद्ध विहार अकोला नाका येथे श्रीमुक्तीदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा ज्योतिताई इंगळे ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हनुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ भगत, महिला आघाडी प्रदेश सदस्या किरणताई गिऱ्हे, वाशिम विधानसभा समन्वयक डॉ तुषार गायकवाड, प्रा. जयश्री भिसे, जिल्हा महासचिव प्रा. रंगनाथ धांडे, माजी जिल्हामहासचिव सोनाजी इंगळे, जिल्हा सचिव विनोद भगत, जिल्हा उपाध्यक्ष गिरधर शेजूळ, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष सूर्यकांत गायकवाड, प्रा. मिलिंद इंगळे, कृष्णाभाऊ देशमुख, हे होते. तर मुख्य उपस्थिती म्हणुन मालेगाव तालुका अध्यक्ष सरनाथ अवचार, तालुका महासचिव राजु जमधाडे, विनोद चुंभळे, महिला आघाडी जिल्हा महासचिव सुनीताताई खाडे, रिसोड तालुका अध्यक्ष मायाताई अंभोरे, मालेगाव तालुका अध्यक्ष वंदना गायकवाड, भारतीय बौद्ध महासभा प्रा. मुकुंद वानखेडे, संध्याताई पंडीत, मंदाताई धांडे, न. प. उमेदवार जयश्री कांबळे, आरती ठोके, विद्या भगत, संतोष सरकटे हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शन किरणताई गिऱ्हे, डॉ तुषार गायकवाड, ज्योतिताई इंगळे, जयश्रीताई भिसे, प्रा रंगनाथ धांडे, सोनाजी इंगळे, प्रा. मुकुंद वानखडे, संध्याताई पंडीत, कृष्णा देशमुख, यांनी केले. ङयाप्रसंगी मायाताई अंभोरे, सुनीता खाडे, वर्षा भगत, प्रज्ञा नवघरे, छायाताई, मीनल बनसोड, रंजना बनसोड, यांनी ठरावाचे वाचन केले.ङ यानंतर अकोला नाका स्थित छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर मनुस्मृती दहन करून मनुस्मृतीचा निषेध केला. यावेळी समाज बांधव तथा वंचित बहुजन आघाडी चे कार्यकर्ते, समता सैनिक दलाचे शिपाई उपस्थित होते.

# भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कार्यक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ जानेवारी रोजी गुरुवारला सायंकाळी ६ वाजता रिसोड येथील कृ. उ. बाजार समिती येथे शिव शाहीर अविष्कार देशींगे आणि त्यांचा संच यांच्या पोवाडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष तथा सभापती कृ.उ. बा.समिती मा. विष्णुपंत भुतेकर यांच्या हस्ते व भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून उद्घाटन होणार आसलयाचे भूमिपुत्र चे राज्य संघटक व राज्य प्रवक्ते डॉ.जीतेंद्र गवळी यांनी सांगीतले. कार्यक्रमचा समारोप बॉस बॅंड वरील राष्ट्र गीताने होणार आहे. मागील अनेक वर्षांपासून वाशीम जिल्ह्यासह आजु-बाजुचा जिल्हयात पोवाडयाचा कार्यक्रम झाला नव्हता त्यामुळे भूमिपुत्र कडुन महाराष्ट्रातील एक नंबर वर आसलेलया सांगली येथील अविष्कार देशींगे व संच च्या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन भूमिपुत्र कडुन करण्यात आले आहे.

# वाशीम जिल्हा माहेश्वरी सभेला प्रथम पुरस्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महेश नवमी उत्सव संपूर्ण जिल्हयामध्ये उत्साहात साजरा करून विविध सामाजिक ,धार्मिक, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासोबतच भव्य शोभायात्रेचे प्रत्येक तालुक्यात यशस्वी आयोजन केल्याबद्दल विदर्भ प्रादेशीक माहेश्वरी संघटनेच्या वतीने अमरावती येथे मनिरत्नम सभागृहात पार पडलेल्या बैठकीमध्ये वाशीम जिल्हा माहेश्वरी सभेला प्रथम पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय माहेश्वरी युवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद सोनी, माजी सभापती श्यामसुंदर सोनी, प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी, विदर्भ प्रदेशाध्यक्ष सनदी लेखापार दामोदर सारडा, माजी विदर्भ अध्यक्ष श्यामसुंदर मुंदडा, मदनलाल मालपाणी यांच्याहस्ते जिल्हाध्यक्ष कैलास मुंदडा, सचिव सुनिल गट्टाणी, प्रदेश संयुक्त मंत्री शिवलाल भुतडा व टिमला सन्मान चिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी महासभा सदस्य राजकुमार मुंदडा, रमनलाल कोठारी, महेश आवास योजनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शेखर बंग, प्रदेश सदस्य निलेश सोमाणी, डॉ. ललित बियाणी, कैलास सारडा, राजेंद्र करवा, डॉ. सतिष बाहेती, डॉ. माणिक धुत, दिलीप गिलडा, संजय राठी, नंदलाल जाखोटिया, गणेश बियाणी उपस्थित होते. यावेळी दानशुर शिवलाल भुतडा व शेखर बंग यांनी माहेश्वरी संघटनेला सामाजिक उपक्रमासाठी प्रत्येकी १ लाख रूपयांची देणगी दिल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. सोबतच अनसिंग येथील गणेश बियाणी यांनी आपल्या वाढदिवसानिमीत्त संघटनेला ५ हजार शंभर रूपये व कारंजा येथील सास संघटनेला २ हजार शंभर रूपयाची देणगी दिली. गत अनेक वर्षापासून सातत्याने वाशिम जिल्हा माहेश्वरी सभेला विदर्भस्तरावर प्रथम पुरस्काराचा बहुमान प्राप्त होत आहे. त्यामुळे वाशीम जिल्हयाच्या गौरवामध्ये भर पडत आहे.

# वसंतराव नाईक सुधाकरराव नाईक शिक्षण संकुलातील इमॅजिनेशन विदीन अस



**किन्हिराजा :** येथील स्थानिक वसंतराव नाईक सुधाकरराव नाईक शिक्षण संकुलामध्ये दि. १९ डिसेंबर रोजी भव्य ‘इन्स्पायर इमॅजिनेशन विदीन अस’ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

इन्स्पायर या कार्यक्रमांतर्गत तीन उपक्रम राबविण्यात आले. इन्स्पायर सायंटिस्ट विदीन अस, इन्स्पायर आर्टिस्ट विदीन अस व इन्स्पायर बिझनेस मॅन विदीन अस.. अर्थात विद्यार्थ्यांमधील शास्त्रज्ञ, विद्यार्थ्यांमधील कलाकार व विद्यार्थ्यांमधील व्यावसायिक गुण प्रस्तुत करण्याचा हा एक भव्य उपक्रम होता. इयत्ता पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी यामध्ये भरभरून सहभाग घेतला.

सायंटिस्ट विदीन अस या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रोजेक्ट सादर केले. ज्यामध्ये अनेक प्रकारच्या सेन्सरचा वापर करण्यात आला होता. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास झाला. आर्टिस्ट विदीन अस- या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारच्या प्रतिकृती व पोस्टर्स निर्माण करून आणले होते. याद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. तसेच बिझनेसमॅन विदीन अस- या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध व्यंजने आणून स्टॉलवर त्यांची विक्री करून खरी कमाई केली. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक गुणाचा विकास झाला. प्रस्तुत भव्य महोत्सव बघण्यासाठी पंचक्रोशीतील अनेक शाळांनी शिक्षक विद्यार्थ्यांसह भेट घेतली. स्थानिक किन्हीराजा येथील शिवाजी माध्यमिक हायस्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल, आदिवासी आश्रम शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवरदरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मैराळडोह, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशपुर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकापुर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एरंडा इत्यादी शाळांनी विद्यार्थ्यांसह या भव्य प्रदर्शनीला भेट दिली. तसेच अनेक पालकांनी व पत्रकार बंधूंनी प्रदर्शनाला भेट दिली. प्रस्तुत भव्य महोत्सवाचे उद्घाटन केंद्रप्रमुख साखरे व संस्थेचे निरीक्षक अविनाश राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षण संकुलाचे प्राचार्य दि.रा. राठोड, प्राचार्य खचकड , मुख्याध्यापक डोफेकर, पर्यवेक्षक इंगळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर मंडळींनी परिश्रम घेऊन उत्स्फूर्तपणे महोत्सव पार पाडला.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, उभ्या ट्रकला धडक; दोघांचा जागीच मृत्यू

**कारंजा :** समृद्धी महामार्गावरील लोकेशन क्रमांक १९८ येथे मंगळवारी(२५ डिसेंबर) पहाटे साडेतीनच्या सुमारास भीषण अपघात झाला. टायर दुरुस्तीसाठी उभ्या असलेल्या ट्रकला मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने जोरदार धडक दिल्याने दोन जणांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

नागपूरकडे जाणारा एमएच ०४ जेके ९४१६ क्रमांकाचा ट्रक रस्त्याच्या कडेला उभा करून टायर दुरुस्तीचे काम सुरू होते. त्याचवेळी मागून येणाऱ्या एमएच १४ एचव्ही ७३९५ क्रमांकाच्या ट्रकने वेगाने येत उभ्या ट्रकला धडक दिली. धडकेचा आवाज इतका भीषण होता एकच खळबळ उडाली. या अपघातात सुभाष वाघ (२५, रा. मसला, ता. जि. बुलढाणा) आणि संतोष सिंग (३५, रा. जनकपूर, उत्तर प्रदेश) यांचा मृत्यू झाला. तर अनिकेत सिंग (३०, रा. जनकपूर, उत्तर प्रदेश) हा गंभीर जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच रमेश देशमुख, तसेच १०८ समृद्धी महामार्ग शेलुबाजार व कारंजा येथील रुग्णवाहिका पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

# विद्यार्थ्यांची अरण्यवाचन उपक्रमांतर्गत काटेपुर्णा अभयारण्याला भेट

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित आणि ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेद्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय वनोजाच्या विद्यार्थ्यांनी अरण्यवाचन या महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमांतर्गत दि.२४ डिसेंबर बुधवार रोजी वाशिम- अकोला जिल्ह्यात पसरलेल्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याला भेट देत निसर्गाशी थेट संवाद साधला. पर्यावरण संवर्धन, वन्यजीव संरक्षण तसेच जैवविविधतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना



प्रत्यक्ष अनुभवातून समजावे, या उद्देशाने या अभ्यासभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या भेटीदरम्यान वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना अभयारण्यात आढळणाऱ्या विविध प्रजातींच्या झाडांची माहिती दिली. यामध्ये औषधी वनस्पती, दुर्मिळ वृक्षप्रजाती, स्थानिक व स्थलांतरित पक्षी, तसेच अभयारण्यात आढळणारे वन्यप्राणी यांची सविस्तर माहिती दिली. वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास, अन्नसाखळी, पर्यावरणीय समतोल राखण्यात जंगलांचे महत्त्व आणि मानवाने निसर्गाशी सुसंवाद कसा ठेवावा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि काटेपुर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे यांच्या सहकार्याने मराठी विभाग प्रमुख प्रा. गजानन घोंगटे आणि प्रा. बापुराव डोंगरे यांनी केली. यावेळी प्रा. राधिका सावके, प्रा. स्वाती राठोड, सचिन राणे, आकाश गांजरे यांच्यासह काटेपुर्णा वन्यजीव अभयारण्यातील वनरक्षक प्रविण कांबळे, गाईड नागसेन आकोडे, प्रथम सिंकटवार, सुमित भगत, नयन राठोड यांची उपस्थिती होती.

# वत्सगुल्म नगरीत आजपासून माय मराठीचा जागर

## -एस.एम.सी. परिसरात जिल्हा मराठी साहित्य संमेलन
## -विविध कार्यक्रमांची मेजवानी, अशोक मानकर संमेलनाध्यक्ष

■ प्रतिनिधी | वाशिम ■

***मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या अनुदानातून एस. एम. सी. शिक्षण प्रसारक मंडळ वाशीम या संस्थेच्या वतीने, शुक्रवार दि. २६ आणि शनिवारी दि. २७ डिसेंबर रोजी वत्सगुल्म जिल्हा मराठी साहित्य संमेलन होत आहे. ग्रंथदिंडी, कथाकथन, कविसंमेलन, प्रकट मुलाखत, चर्चासत्र, विनोदी कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि तीन परिसंवाद, अशा विविध उपक्रमांमधून यानिमित्ताने माय मराठीचा जागर होणार आहे.***

शुक्रवारी सकाळी नऊ वाजता ग्रंथदिंडीने संमेलनास प्रारंभ होईल. ग्रामदैवत बालाजी मंदिरातून ग्रंथदिंडी निघणार असून, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांच्या हस्ते उद्घाटन होईल. उपजिल्हाधिकारी कैलास देवरे यांची विशेष उपस्थिती राहील. जिल्हा ग्रंथालय अधिकारी बालाजी कातकडे, राज्य ग्रंथालय परिषदेचे सदस्य प्रभाकर घुगे, ज्येष्ठ साहित्यिक धोंडुजा इंगोले, सायास प्रकाशनाचे डॉ. माधव जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहील. बालाजी मंदिरातून छत्रपती शिवाजी महाराज चौक, रविवार बाजार, पाटणी चौक, रिसोड रोड मार्गे एस.एम.सी. शिक्षण संकुल परिसरात संमेलनस्थळी ग्रंथदिंडीचा समारोप होईल. त्यानंतर सकाळी अकरा वाजता संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते या संमेलनाचे उद्घाटन करतील. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांची विशेष उपस्थिती राहील. संमेलनाध्यक्ष म्हणून यापूर्वीच सुप्रसिद्ध विनोदी कथालेखक अशोक मानकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत संमेलन समिती अध्यक्ष प्रा. हरिभाऊ क्षीरसागर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे आणि डॉ. मार्तंड कुलकर्णी, विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, ग्रामीण कादंबरीकार बाबाराव मुसळे, एसएमसीचे सचिव पुरूषोत्तम शर्मा यांची प्रमुख उपस्थिती राहील.

उद्घाटनानंतर लेखक विलास अंभोरे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन होईल. त्यानंतर शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांच्या अध्यक्षतेखाली महिलांसाठी परिसंवाद होणार आहे. तिसऱ्या सत्रात कविसंमेलन होईल. ज्येष्ठ कवी मोहन शिरसाट हे कविसंमेलनाचे अध्यक्ष आहेत. त्यानंतर सायंकाळी विविध शाळा, महाविद्यालयांचे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी गोपाल खाडे यांचा वऱ्हाडी किस्से आणि कवितांचा नजराणा, डॉ. विजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली वाशीमच्या साहित्य आणि संस्कृतीवर चर्चासत्र, संपादक श्रीपाद अपराजित यांची प्रकट मुलाखत होणार आहे. त्यानंतर दोन परिसंवाद होणार आहेत. तरूणाईसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आयोजित परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी वाशीम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान हे राहतील. त्यानंतर प्रसारमाध्यमांचे समाजभान या विषयावर पत्रकारांचा परिसंवाद होणार असून, ज्येष्ठ पत्रकार सनत अहाळे त्याच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. दुपारी तीन वाजता संमेलनाचा समारोप होईल. या संमेलनाचा वाशीमकरांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन एस.एम.सी. शिक्षण प्रसारक मंडळ आणि संमेलन समितीच्या सदस्यांनी केले आहे.

**ग्रंथप्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन :** संमेलनस्थळी ग्रंथप्रदर्शन आणि विक्री, लोकसंस्कृतीविषयक कलादालन आणि मोरया आम्हा तुझा छंद हे श्रीगणेशाच्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. नोंदणी करणाऱ्यांसाठी संमेलनस्थळी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत विनामूल्य आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१ ■ शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


# तहसील दलालांच्या ताब्यात; प्रशासन हतबल, नागरिक लुटले जातात

## -'चिरीमिरी'शिवाय कामच नाही अशी संतप्त नागरिकांची ओरड

**वर्धा । जनमाध्यम :** तहसील कार्यालय परिसरात खुलेआम वावरणाऱ्या दलालांनी प्रशासनालाच आव्हान दिले असून, सामान्य नागरिकांची उघडपणे आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शासनाच्या विविध कार्यालयांतील कामे आमच्याशिवाय होतच नाहीत, अशा मग्रुरीत सांगणारे एजंट (दलाल) नागरिकांकडून हजारो रुपयांची चिरीमिरी उकळत असल्याने तहसील कार्यालय दलालांच्या विळख्यात सापडल्याचे चित्र आहे.

पंचायत समिती, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, धान्य पुरवठा विभाग, भुमिअभिलेख, यांसह अन्य शासकीय कार्यालयांची कामे करून देतो, असे आमिष दाखवत हे दलाल तहसील परिसरात ठाण मांडून बसले आहेत. दाखले, नोंदी, मोजणी, मंजुरी, अर्ज प्रक्रिया यासाठी थेट पैशांची मागणी केली जाते. पैसे दिले नाहीत, तर फाईल पुढे सरकत नाही, असा दबाव नागरिकांवर टाकला जात असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत.



या प्रकारामुळे गोरगरीब, शेतकरी, मजूर, वृद्ध नागरिक अक्षरशः वेठीस धरले जात आहेत. विशेष म्हणजे, या लुटीबाबत तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने दलालांचे मनोबल वाढले आहे. यामागे राजकीय आशीर्वाद तर नाही ना, असा थेट प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. या प्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात मात्र त्यांचे संशयास्पद मौन दिसून येत आहे. दलालांमध्ये सत्ताधारी पक्षाचेच कार्यकर्ते असल्यामुळेच कारवाई होत नाही का? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत. पालकमंत्र्यांच्या दुर्लक्षामुळेच तहसील परिसरात दलालराज फोफावल्याचा आरोप होत आहे.

नागरिकांनी स्पष्ट शब्दांत मागणी केली आहे की, तहसील कार्यालय परिसरात तात्काळ विशेष मोहीम राबवून सर्व एजंट-दलालांना हद्दपार करण्यात यावे. चिरीमिरी घेताना आढळलेल्या दलालांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचीही चौकशी व्हावी. अन्यथा, येत्या काळात नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

'सामान्य माणसासाठी सरकार' असा दावा करणाऱ्या सत्तेच्या नाकाखालीच जर तहसील कार्यालय दलालांच्या ताब्यात जात असेल, तर हा केवळ प्रशासनाचा नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेचा पराभव आहे. आता तरी पालकमंत्री जागे होऊन दलालमुक्त तहसीलचा शब्द प्रत्यक्षात उतरवणार का, हा प्रश्न वर्धा जिल्ह्यातील नागरिक विचारत आहेत.

# शेतकरी हितासाठी दोन रणधुरंधर आमनेसामने; व्यवस्थेच्या पिळवणुकीवर चर्चा

**वर्धा /अकोला । जनमाध्यम-** वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे आणि शेतकरी नेते संपादक प्रकाश पोहरे यांची अकोल्यात भेट झाली आणि ही भेट क्षणातच शेतकरी प्रश्नांवरील आक्रमक चर्चेचे रणांगण ठरली. सत्ताकेंद्रात आणि रस्त्यावर शेतकऱ्यांसाठी लढणारे हे दोन आवाज एकत्र आले की विषय एकच शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय आणि तो थांबवण्याची गरज.



शेतकऱ्यांची दैनावस्था, शेतमाल विक्रीदरम्यान खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी निर्घृण पिळवणूक, बाजारात कोसळलेले दर, वाढता उत्पादन खर्च आणि त्या तुलनेत मिळणारा तुटपुंजा भाव या सगळ्यांवर दोघांनी स्पष्ट आणि संतप्त भूमिका मांडली. शेतकरी उद्ध्वस्त होत असताना व्यवस्था गप्प का, असा थेट सवालही चर्चेत उपस्थित झाला.

सरकारकडून शेतकऱ्यांच्या पिळवणुकीला अप्रत्यक्ष सहकार्य मिळत असल्याचा आरोप करत, बाजारव्यवस्थेतील दलालशाही, खासगी व्यापाऱ्यांची मक्तेदारी आणि अपयशी धोरणांवर कडाडून टीका करण्यात आली. शेतकऱ्यांच्या घामाला किंमत नाही, हीच आजच्या व्यवस्थेची शोकांतिका असल्याचे मत व्यक्त झाले.

खासदार अमर काळे लोकसभेत सातत्याने शेतकरी प्रश्नांवर आवाज उठवत आहेत, तर प्रकाश पोहरे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी रस्त्यावरची लढाई लढत आहेत. व्यासपीठ वेगवेगळे असले तरी लढा एकच शेतकरी वाचवायचा.

एकंदरीत, ही भेट म्हणजे केवळ संवाद नव्हे तर शेतकरी हितासाठी पेटलेली ठिणगी ठरली असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर निर्णायक संघर्ष अटळ असल्याचे संकेत या चर्चेतून मिळाले.

## जनतेच्या विश्वासाचा मान, सेवेला सुरुवात

# नवनियुक्त नगरसेविका सोनाली तडसे यांचा मान्यवरांकडून सत्कार

**वर्धा । जनमाध्यम :** नवनियुक्त नगरसेविका सोनाली तडसे यांच्या निवडीबद्दल शहरात अभिनंदनाचा सूर उमटत आहे. नागरिकांच्या वतीने तसेच अल्पसंख्याक कल्याण संघटनेच्या माध्यमातून आयोजित कार्यक्रमात विविध मान्यवरांनी त्यांचा मनःपूर्वक सत्कार केला. पत्रकार हाजी इकराम हुसेन, हाजी एजाज साहिब, अख्तर खान, सतीश पलेरिया, आर. एम. खान नायडू, शादाब खान, सौ. मोना खान आणि अमरीन खान यांनी पुष्पगुच्छ देत शुभेच्छा दिल्या.


या वेळी उपस्थितांनी सामाजिक एकोपा जपत सर्वसमावेशक विकासासाठी काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. शहरातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य व महिलांच्या प्रश्नांवर ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त झाली.

सत्काराला उत्तर देताना सोनाली तडसे म्हणाल्या की, नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत पारदर्शक व लोकाभिमुख कारभार केला जाईल. जनतेने दिलेल्या विश्वासाला पात्र ठरून सर्वांना सोबत घेऊन विकासाचा नवा अध्याय लिहिण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# धाडी येथील वनतलाव परिसरात वाघीणीचा हल्ला; गाय ठार

## -शेतमजुराचे सुमारे एक लाखांचे आर्थिक नुकसान

**आष्टी शहीद । जनमाध्यम :** आष्टी-वरुड राष्ट्रीय महामार्गालगत धाडी गावाच्या घाट परिसरातील वनतलावाजवळ वाघीणीच्या हल्ल्यात एका गाईचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवार, दि. २३ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे तीन वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत शेतमजूर मिनाज अली नियाज अली यांचे सुमारे एक लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.



नेहमीप्रमाणे धाडी गावातील गाईंचा कळप चराईसाठी गावापासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर असलेल्या वनतलाव परिसरात गेला होता. दुपारी कळप पाणी पिण्यासाठी तलावाजवळ आला असता, तीन पिलांसह दबा धरून बसलेल्या वाघीणीने संधी साधून एका गाईवर जोरदार झडप घातली. या हल्ल्यात गाय गंभीर जखमी झाली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे कळप सैरावैरा पळाला. झटापटीदरम्यान जखमी गाय वाघीणीच्या तावडीतून सुटून थेट मालकाच्या घरापर्यंत आली. मात्र घरात पोहोचताच ती जमिनीवर कोसळून मृत झाली.

घटनेची माहिती मिळताच वनपाल दीपक कर्डीकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पशुवैद्यकीय डॉक्टरांनी उत्तरीय तपासणी केल्याची माहिती देण्यात आली आहे. परिसरात वाघांचा वावर वाढल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# नायलॉन मांजा विक्रीसाठी साठवणूक करणाऱ्यांवर २ लाख ५० हजार दंड प्रस्तावित

## मांजा वापरणाऱ्यांवर देखील ५० हजार दंड प्रस्तावित

**वर्धा जनमाध्यम :** नायलॉन धागा, मांझा व इतर सिंथेटिक धागे वापरामुळे गंभीर दुष्परिणाम दिसून येतात. त्यामुळे असा धागा, मांझा विक्रीसाठी साठवणूक करणाऱ्यांवर २ लाख ५० हजार व नायलॉनचा वापर व पतंग उडविण्यासाठी वापर करणाऱ्यांवर ५० हजार दंडाची तरतूद का करु नये, अशी विचारणा उच्च न्यायालयाने केली आहे. याबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दि.५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या सुनावणीत म्हणणे मांडता येणार आहे.



मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाकडील मुळ जनहित याचिका क्र. ०१/ २०२१ मध्ये दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार नायलॉन धागाचे गंभीर दुष्परिणाम लक्षात घेऊन, सिंथेटिक मांझा, नायलॉन धागा आणि इतर तास्तामा सिंथेटिक धागे यांच्या वापर विक्री, साठवणूक टाािार दंडात्मक कार्यवाही का करुन नये याबाबत निर्देश दिले आहेत.

दरवर्षी अशा नायलॉन मांजामुळे अनेक लोक जखमी होतात किंवा काही जणांचा मृत्यू होतो. त्याअनुषंगाने नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजाचा मोठ्या प्रमाणात वापर अजूनही वापरात दिसून येत असल्याचे नमूद केले आहे.

खंडपिठाने दिलेल्या निर्देशानुसार पतंग उडविण्यासाठी नायलॉन धागा वापरणाऱ्या अल्पवयीन मुलाच्या पालकावर ५० हजार दंड तसेच पतंग उडविण्यासाठी नायलॉन धागा वापरणाऱ्या व्यक्तीवर ५० हजार दंड आणि नायलॉन मांझा साठा जप्त करण्यात आलेल्या तसेच विक्रीसाठी साठवणूक करणा-या विक्रेत्यावर २ लाख ५० हजार दंड का आकारण्यात येऊ नये? याबाबत विचारणा केली आहे.

याबाबत काही म्हणणे, आक्षेप असल्यास आपले म्हणणे मांडण्यासाठी खंडपिठ नागपूर द्वारे पुढील सुनावणी दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी ठेवण्यात आली असून याबाबत म्हणणे मांडण्यास निर्देशित केले आहे. जर कोणी हजर झाले अथवा म्हणणे मांडले नाही तर नायलॉन मांझा धागा, सिंथेटिक धागे यांचे उत्पादन, विक्री, साठवणूक, खरेदी व वापर करणा-यांवर वरील प्रमाणे दंड आकारण्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल, असे उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ नागपूर यांनी नमूद केले आहे. त्यामुळे याबाबत कुणाची काही हरकत, म्हणजे असल्यास सुनावणीवेळी सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बनावट नोटरी, बँक मॅनेजरांचा संगनमताने डाव : महिलेच्या खात्यातून तब्बल ८.६० लाखांची सायबर लूट

## -वकील-नोटरींचा मास्टरमाइंड, बँक अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने आर्थिक दहशत

**वर्धा । जनमाध्यम :** वकील आणि नोटरीचा शिक्का, बँक मॅनेजरांची मूक साथ आणि सायबर तंत्रज्ञानाचा गैरवापर करत एका महिलेच्या खात्यातून तब्बल ८ लाख ६० हजार १७४ रुपयांची सुनियोजित लूट केल्याचा खळबळजनक प्रकार वर्धा जिल्ह्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणात बसमत (जि. हिंगोली) येथील वकील, नोटरी, त्यांचे नातेवाईक, मित्र तसेच दोन बँकांचे शाखाधिकारी थेट आरोपीच्या भूमिकेत असल्याचा गंभीर आरोप तक्रारदार महिलेने केला आहे.




भिमनगर, सावंगी (मेघे), वर्धा येथील एका ३३ वर्षीय महिलेने सायबर क्राईम पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, सन २०१९ पासून तिच्या बँक खात्यातील पत्ता व मोबाईल क्रमांक बनावट दस्तऐवज व खोट्या नोटरीच्या आधारे बदलण्यात आला. यानंतर फोनपे, गुगल पे, एटीएम आणि एफडी अशा विविध माध्यमांतून ठगबाजांनी तब्बल ८.६० लाखांनी फसवणूक केल्याचे तक्रारीनंतर २५ रोजी उजेडात आले आहे. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी या नोकरी करतात. त्यांना हरिष मुर्के रा. बसमत ता. जि. हिंगोली, उमाकांत व्यंकटी मोरे, नितीन व्यंकटी मोरे, स्वाती नितीन मोरे, व्यंकटी उमाजी मोरे चौघेही रा. हिंगोली, अतुल पिचकेवार रा. हिंगोली, राहुल पंडीत रा. बसमत जि. हिंगोली तसेच पुणे जिल्ह्याच्या चाकण येथील बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी, हिंगोली जिल्ह्याच्या बसमत येथील बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी व इतरांनी खोटी बतावणी करून तब्बल ८ लाख ६० हजार १७४ रुपयांनी गंडा घातला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादी महिलेने सायबर पोलिस स्टेशन गाठून तक्रार नोंदविली. संबंधित प्रकरणी न्यायालयाच्या आदेशान्वये तक्रारीवरून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयात फिर्यादीची बाजू ॲड. विशाल टिबडेवाल यांनी मांडली. अधिक तपास सायबर विभाग करीत आहे,

# जाम परिसरात वाघाचा मुक्त संचार; पगमार्क आढळताच वनविभाग अलर्ट

## -मेनखात, औरंगपूर, उबदा परिसरात खळबळ; गावांना सतर्कतेचा इशारा

**हिंगणघाट । जनमाध्यम :** हिंगणघाट शहरालगतच्या जाम परिसरात वाघाचा मुक्त संचार सुरू असल्याचे स्पष्ट झाल्याने ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे. मेनखात, औरंगपूर व उबदा परिसरात वाघाचे ठळक पगमार्क आढळल्याने वनविभागाने तातडीने अलर्ट मोड स्वीकारत परिसरातील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास शेतात जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या आकाराचे पगमार्क दिसून आले. हे पगमार्क वाघाचे असण्याची शक्यता लक्षात येताच वनविभागाला माहिती देण्यात आली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. प्राथमिक तपासणीनंतर या परिसरात वाघाचा मुक्त संचार सुरू असल्याचे स्पष्ट झाले.



वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी संवेदनशील ठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले असून नियमित गस्त वाढविण्यात आली आहे. वाघ व मानव यांच्यात संघर्ष टाळण्यासाठी नागरिकांना खबरदारीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रात्री व पहाटे एकटे शेतात किंवा जंगलालगतच्या भागात जाणे टाळावे, गुरेढोरे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत, तसेच संशयास्पद हालचाल दिसताच तातडीने वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, वाघाच्या हालचालींमुळे शेतकरी, शेतमजूर व महिलांमध्ये चिंता व्यक्त होत असून वनविभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार यांच्या जनसंपर्क कार्यालयात अटल बिहारी वाजपेयी जयंती उत्साहात

**हिंगणघाट । जनमाध्यम :** भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती आज हिंगणघाट येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. आमदार समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार कुणावार यांनी अटलजींच्या राष्ट्रहिताच्या, लोककल्याणकारी व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा गौरव केला. अटलजींचे राजकीय जीवन हे भारतीय राजकारणासाठी मार्गदर्शक ठरले असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर, भाजपा पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अटलजींच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# ४ तलवारी, फरश्या, २ चाकूसह आरोपी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलिसांनी रहमान नगर टॉवर लाईन परिसरात आरोपी आमिन खान आशीक खान (वय २३) याच्या घरी धाड मारून ४ तलवारी, १ लोखंडी दांड्याचा फरशा, २ स्टीलचे चाकू असा एकूण ९ हजार २०० रुपयांचा अवैध शस्त्र साठा जप्त केला. आरोपी विरुद्ध कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार नागपूर गेट पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे आरोपी आमिन खान आशिक खानच्या घरी पंचा समक्ष धाड मारून अवैध शस्त्र साठा जप्त केला.

पोलीस आयुक्त राकेश ओला उपायुक्त गणेश शिंदे सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार, उपनिरीक्षक पंकज गुप्ता, डिबी पथकाचे हेड कॉन्स्टेबल राजेंद्र पिंपळे, मलिक अहमद, इरफान रायलीवाले, प्रवीण ढेंगेकार, अमर पटेल, सागर पंडित, मोहन चव्हाण, संदीप माकोडे, शेखर गायकवाड, इमरान खान, मनीष यादव, भारती वानखेडे यांनी ही कारवाई केली.

# साईबाबांच्या कृपेचा अनुभवः हृदयस्पर्शी कथा भक्तांसमोर उलगडल्या

**हिंगणघाट । जनमाध्यम :** श्री साई प्रतिष्ठानच्या वतीने नंदोरी रोडवरील श्री साई मंदिरात भक्तिमय वातावरणात श्री साई कथेचे आयोजन करण्यात आले. प्रसिद्ध साई कथाकार ह.भ.प. बाळकृष्ण महाराज सुरासे (शिर्डी) यांनी आपल्या ओजस्वी वाणीने श्रोत्यांसमोर साईबाबांचे जीवनमूल्य, भक्तीसाधना आणि चमत्कारांची कथासंग्रह उलगडून दाखवली.

शिर्डीचे साईबाब महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. सबका मालिक एक हा संदेश सर्व धर्म, जात, पंथ, श्रीमंती-गरीबी भेद न करता गरजूंच्या सेवेत समर्पित जीवनाचे दर्शन घडवतो. संकटातून मार्ग दाखवणाऱ्या, अंधकारातून प्रकाश देणाऱ्या साईबाबांच्या शिकवणीने श्रोत्यांचे मन भारावून गेले. कार्यक्रमासोबतच भव्य नि:शुल्क आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर आयोजित करण्यात आले, ज्याचा शहरातील पाचशेहून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. महाप्रसादाने कथा सांगताना भक्तांच्या चेहऱ्यावर आनंद आणि श्रद्धेचे भाव स्पष्ट दिसून आले. यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश्वर महाराज, सचिव अतुल वांदिले, समितीचे सर्व पदाधिकारी, साई सेवक व साई सेविका उपस्थित होते.



# अटलजींना 16 जानेवारीला खरी आदरांजली द्यायची आहे-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** अटलजींनी ज्या प्रकारे मुंबईमध्ये भाजपाची सुरुवात करून दिली होती त्याचप्रमाणे, पुन्हा एकदा मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये महायुतीची सत्ता आणून अटलजींचे कार्य पुढे न्यायचे आहे. आपली लढाई ही मुंबईकरांची लढाई आहे. पारदर्शी आणि प्रामाणिकतेतून मुंबईची महानगरपालिका चालली पाहिजे हा संकल्प घेउन आम्ही या निवडणूकीत उतरलो आहोत. आज तर आपण अटलजींना आदरांजली देतोच आहोत, पण १६ जानेवारीला आपण अटलजींना खरी आदरांजली द्यायची आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



आज संपूर्ण देशभरात श्रद्धेय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. या निमित्त भाजपा मुंबईच्या वतीने संपूर्ण मुंबई शहरात वेगवेगळ्या ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून 'चित्र-चरित्र प्रदर्शनी'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते वसंतस्मृती कार्यालय, दादर येथे करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात ढोलताशांच्या गजरात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या स्वागताने झाली. त्यानंतर भाजपा महिला मोर्चाकडून औक्षण करण्यात आले.मुख्यमंत्री फडणवीस आणि भाजपा मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालत आदरांजली वाहिल्यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली.

फडणवीस पुढे म्हणाले, 'भारतमातेच्या या सुपुत्राने जवळपास ५ दशकांपर्यंत या देशाला दिशा देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो नवभारत तयार केला. त्या नवभारताचा पाया रचणारे श्रद्धेय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी होते. या भारतीय जनता पार्टीला त्यांनी विपरीत काळामध्ये दिशा दिली आणि हिंदुत्त्वाच्या संकल्पनेच्या व्यापक विचारांशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. पहिल्यांदा परराष्ट्रमंत्री झाल्यानंतर भारताचे परराष्ट्र धोरण अटलजींनी परिभाषित केलं तेच धोरण आजही महत्त्वाचं मानलं जातं.'ते पुढे म्हणाले, 'देशामध्ये पंतप्रधान म्हणून अटलजींनी केलेलं कार्य हे अविस्मरणीय आहे. ते नेहमी म्हणायाचे 'रस्ते हे देशाला एकात्मतेकडे नेतात' आणि त्यांच्याच संकल्पनेतून देशाला वर्ल्डक्लास हायवे पाहायला मिळाले. त्यांनी पहिल्यांदा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना देशात सुरु केली. ज्यामुळे शहरे गावांशी जोडली गेली. भारत देश अणुसंपन्न करण्याचं काम त्यांनी केलं. मोठ्या राष्ट्रांकडून दबाव येत असताना अटलजी त्यांच्या निर्णायावर ठाम राहिले आणि आज भारत एक बलवान देश म्हणून उभा आहे. एवढंच नाही तर अटलजींच्या काळात देशाची अर्थव्यवस्था १० टक्क्यांपर्यंत वाढली. अणुस्फोटानंतर जगाने बहिष्कृत केलेल्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला ठामपणे उभं करणारे अटलजी होते.'

भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्या प्रास्ताविक भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी बोलताना ते म्हणाले, 'मागच्या ११ वर्षांत देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईलाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राला 'सुशासन' नेमकं काय असतं हे दाखवून दिलं आहे. मुंबईतील मेट्रो, अटल सेतू, कोस्टल रोड आणि बीबीडी चाळीतील माणसाला ५६० चौरस फुटांचं घर ही सर्व कामे कोणी केली हे माहित आहे. देवेंद्र फडणवीस आणि भाजपाने मागील ११ वर्षांत ज्या प्रमाणे काम केलं त्याने मुंबईकर प्रभावित झालेले आहेत. त्यामुळे आगामी काळात मुंबई महापालिकेवर महायुतीचा भगवा झेंडा फडकताना दिसेल. 'या प्रसंगी व्यासपीठावर राष्ट्रीय सहसंगठन महामंत्री शिवप्रकाश, कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. कालिदास कोळंबकर, आ. विद्या ठाकूर, राजहंस सिंह, सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, राजेश शिरवडकर, श्वेता परुळकर आणि भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## सैन्य जवानांना सोशल मीडिया वापरण्याची परवानगी

- इंस्टाग्रामवर कमेंट करण्यास मनाई;
- व्हाट्सॲपवर मेसेज करू शकतील,
- ५ वर्षापूर्वी बंदी घातली होती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय लष्कराने जवानांच्या सोशल मीडिया ॲप्सच्या वापराबाबत नवीन धोरण जारी केले आहे. इंस्टाग्रामवर रील्स, फोटो आणि व्हिडिओ पाहता येतील, मात्र कमेंट करण्याची परवानगी नाही. व्हाट्सॲप, टेलिग्रामसारख्या ॲप्सवर गोपनीय नसलेली माहिती शेअर करता येईल. याशिवाय, यूट्यूब आणि ज्ञ चा वापर केवळ माहितीसाठी केला जाईल. तसेच, लिंक्डइन, स्काईप आणि सिग्नल ॲपसाठीही नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. भारतीय लष्कराने गेल्या महिन्यात नवीन कोट काम्बॅटच्या डिझाइनचे (डिजिटल प्रिंट) पेटंट घेतले होते. हा त्रि-स्तरांचा गणवेश सैनिकांसाठी प्रत्येक हवामानात आरामदायक आहे. म्हणजेच, लष्कराच्या परवानगीशिवाय कोणीही या डिझाइनचा गणवेश बनवू शकणार नाही, विकू शकणार नाही किंवा वापरू शकणार नाही. असे केल्यास कायदेशीर कारवाई आणि दंड आकारला जाईल. हा नवीन कोट काम्बॅट नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलाजी (निफ्ट), दिल्लीने आर्मी डिझाइन ब्युरोसोबत तयार केला आहे. लष्कराने जानेवारी २०२५ मध्ये नवीन काम्बॅट गणवेश सादर केला होता. गृह मंत्रालयाने बार्डर सिक्युरिटी फोर्स (एच्क्र) मध्ये कान्स्टेबल भरतीसाठी माजी अग्निवीरांसाठी आरक्षण १०ऽ वरून ५०ऽ पर्यंत वाढवले आहे. या संदर्भात १८ डिसेंबर रोजी एक राजपत्र अधिसूचना (गजट नोटिफिकेशन) जारी करून माहिती दिली आहे. सरकारने 'बार्डर सिक्युरिटी फोर्स, जनरल ड्युटी कॅडर (नान-गजेटेड) रिक्रूटमेंट रूल्स, २०१५' मध्ये बदल केले आहेत. यासोबतच, माजी अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीला कमाल वयोमर्यादेत ५ वर्षांची सूट मिळेल. तर, नंतरच्या तुकड्यांना वयोमर्यादेत ३ वर्षांची सूट दिली जाईल



## राहुल गांधींच्या परदेश दौ-यावर पाळत

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांच्या परदेश दौ-यांवरून देशातील राजकीय वर्तुळात नेहमीच चर्चा आणि आरोप प्रत्यारोप होत असतात. दरम्यान, इंडियन ओव्हरसिज काँग्रेसचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सॅम पित्रोदा यांनी राहुल गांधी यांच्या परदेश दौ-यांवरून केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहे. परदेश दौ-यांदरम्यान, राहुल गांधींवर केंद्र सरकारकडून पाळत ठेवली जाते, असा आरोप सॅम पित्रोदा यांनी केला आहे. सॅम पित्रोदा यांनी राहुल गांधी यांच्या परदेश दौ-यांवरून भाजपाकडून करण्यात येणारे आरोप फेटाळून लावले. तसेच परदेश दौ-यांदरम्यान भारतीय दूतावासामधील लोक राहुल गांधींवर पाळत ठेवून असतात. तसेच अनेक परदेशी नेत्यांना राहुल गांधी यांची भेट घेउ नका, असे सांगितले जाते, असा आरोप पित्रोदा यांनी केला. राहुल गांधी यांनी हल्लीच जर्मनीचा दौरा केला होता. या दौ-यावेळी राहुल गांधी यांनी भारतामधील लोकशाहीच्या स्थितीसह अनेक मुद्यांवर परखड भाष्य केले होते. दरम्यान, राहुल गांधी यांच्या या दौ-याच्या टायमिंगवरून अनेक सवाल उपस्थित करण्यात आले होते. आता सॅम पित्रोदा यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, आता परदेश दौरे हे अचानक होत नाहीत. तर अनेक महिन्यांपूर्वी त्यांचं नियोजन होते. जर्मन दौ-याचा मुख्य हेतू हा पुरोगामी आघाडीची बैठक हा होता. त्यात सुमारे ११० देशातील पुरोगामी पक्ष सहभागी झाले होते. यावेळी राहुल गांधींवर परदेशात जाउन भारत विरोधी वक्तव्ये करत असल्याच्या होणा-या आरोपांबाबत सॅम पित्रोदा यांनी परखड शब्दात प्रत्युत्तर दिले. आजच्या काळात तुम्ही भारतामध्ये जे काही बोलता ते जगभरात पसरते आणि जे बाहेर बोलता ते देशात पसरते. खरंतर तुम्हा देशात बोला अगर परदेशात बोला, सत्य हे सत्यच असते असा टोलाही पित्रोदा यांनी लगावला. जर काँग्रेसला संस्थांवर कब्जा होत आहे, प्रसारमाध्यमे पक्षपात करत आहेत, सिव्हिल सोसायटीला कमकुवत केले जात आहे असे वाटत असेल तर ही बाब देशातही सांगितली जाईल आणि परदेशातही सांगितली जाईल, असेही पित्रोदा यांनी सांगितले.



## भाजपची उमेदवारी ठरवण्याचा अधिकार मुख्यमंत्री फडणवीस आणि मलाही नाही

**नागपूर/प्रतिनिधी :** स्पष्टवक्ते म्हणून प्रसिद्ध असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मागील आठवड्यातच नागपूरमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी मागणा-यांच्या गर्दीवर कार्यकर्त्यांचा समाचार घेतला होता. केंद्रात आणि राज्यातही भाजपची सत्ता असल्याने महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी मागण्यांची संख्याही मोठी आहे. नागपूरमध्ये जवळपास पाच हजार लोकांनी उमेदवारी मागितली आहे. अन्य शहरातही अशीच स्थिती आहे.

यावर पुन्हा एकदा गडकरींनी उमेदवारी मागण्यासाठी येणा-या कार्यकर्त्यांना ठणकावून सांगितले. भाजपची उमेदवारी मागणा-यांना गडकरी म्हणाले, उमेदवारी ठरवण्याचे काम मी स्वतः आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही करणार नाही. यामुळे उमेदवारी कोण ठरवणार असा प्रश्न कार्यकर्त्यांमध्ये उपस्थित झाला आहे. यावर गडकरींनी काय सांगितले पाहा. अटल संवाद सभेदरम्यान गडकरींनी अटलजींच्या जीवनापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. अटलजींकडून एक आदर्श मी घेतला असेही गडकरी म्हणाले. त्यांनी सांगितले होते की, घरी भेटायला येणा-या कार्यकर्त्यांना दुखवू नका. त्यांना थोडातरी वेळ देउन त्यांचे निवेदन स्वीकारा. हेच करत असल्याने कार्यक्रमाला येण्यास विलंब झाल्याचेही गडकरी म्हणाले. घरी भेटायला येणारे लोक का आले होते हे सर्वांना माहिती आहे, असेही गडकरी म्हणाले. आता सगळ्यांना असे वाटते की, साहेबांनी सांगितले, काळजी करू नको, तुझाच विचार होणार आहे.



सगळ्यांच्या चेह-यांवर लगेच तेज दिसत आहे. एक अनार आहे बाकी सगळे बिमार, अशी स्थिती आहे असेही गडकरी म्हणाले.

**अर्धे आयुष्य इच्छुकांकडून नाश्ता करण्यात गेले-** यावेळी गडकरींनी ते तरुण असतानाचा एक किस्सा सांगितला. इच्छुक उमेदवारांकडून ढगे यांच्या हाटेलमध्ये आम्ही नेहमी चहा, चिवडा आणि नाश्ता करत होतो. एक म्हणायचा सगळे खा पण माझे काय होणार. त्या संधीचा आम्ही फायदा घ्यायचो. कार्यकर्त्यांमध्ये अपेक्षा राहणे चुकीचे नाही. प्रत्येकाची अपेक्षा असते. एकदा बनल्यावर दुस-यांदा बनण्याचीही अपेक्षा असते. एक महिला आल्या होत्या. त्या म्हणायच्या मला एकदा नगरसेवक बनवा. नंतर महापौर झाल्या नाही तर रडत राहिल्या. माझी आई म्हणाली तिचे पतीचे निधन झाले का. मी म्हटलं तिला आता महापौर बनायचे आहे पण उमेदवारी मिळाली नाही. यावर सभागृहात एकच हसा पिकला.

**उमेदवारी देण्यावर गडकरी नेमके काय म्हणाले?** गडकरी म्हणाले, उमेदवारी मागता तर शिव्या खायची तयारी ठेवा. नगरसेवक बनायचे असेल तर काम करावे लागेल. एका घरातील चौघांनी उमेदवारी मागितली. कुणाचा मुलगा मुलगी होणे गुन्हा नाही. मात्र, तुमच्यासाठी उमेदवारी मागायला जनता यायला हवी. तुमचे वडील आई उमेदवारी मागायला येत असेल तर याला अर्थ नाही. मी एकही उमेदवारी ठरवायला येणार नाही. पक्षाने शहरात चार सर्व्हे केले आहेत. एक मी केले आणि तीन देवेंद्र फडणवीस यांनी केले. या सर्व्हेमध्ये ज्यांना चांगले असेल तर उमेदवारी मिळेल. एकेका ठिकाणी पाच पाच सक्षम उमेदवार आहेत. त्यांच्यात काहीही कमी नाही. त्यामुळे उमेदवारी कुणाला द्यायची हा गंभीर प्रश्न आहे. उमेदवारी न मिळाल्यास दुःख नक्कीच होईल, असेही गडकरी म्हणाले.

## बांगलादेशात आणखी एका हिंदू तरूणाची मारहाण करून हत्या

- ७ दिवसांत दुसरी घटना;
- यापूर्वी दीपू दासला मारून जाळले होते

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशात पुन्हा एकदा जमावाच्या हल्ल्यात एका हिंदू तरुणाचा जीव गेला आहे. राजबारी जिल्ह्यातील पांगशा परिसरात २९ वर्षीय अमृत मंडलला जमावाने मारहाण करून ठार केले. ही घटना दीपू चंद्र दास यांच्या मृत्यूनंतर ७ दिवसांनी घडली आहे. पोलिसांनी सांगितले की, खंडणीच्या आरोपावरून जमावाने तरुणाला ठार केले. ही घटना बुधवारी रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास कालीमोहोर युनियनमधील होसेनडांगा गावात घडली. मृत अमृत मंडल उर्फ सम्राट याच गावाचा रहिवासी होता. पोलिसांनी अमृतचा एक साथीदार मोहम्मद सलीम याला अटक केली आणि त्याच्याकडून दोन शस्त्रे जप्त केली. पोलिस एसएसपींनी सांगितले की, सम्राटचा मृतदेह शवविच्छेदनासाठी राजबारी सदर रुग्णालयाच्या शवागारात पाठवण्यात आला आहे. त्यांनी असेही सांगितले की, सम्राटविरुद्ध पांगशा पोलिस ठाण्यात किमान दोन गुन्हे दाखल आहेत, ज्यात खुनाचा एक गुन्हा देखील समाविष्ट आहे. डेली स्टारच्या वृत्तानुसार, स्थानिक लोकांनी सम्राटवर गुन्हेगारी टोळी तयार केल्याचा आरोप केला आहे. तो ब-याच काळापासून खंडणी आणि इतर गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील होता. भारतात दीर्घकाळ लपून राहिल्यानंतर, तो नुकताच घरी परतला होता. कथिततरित्या, सम्राटने गावातील रहिवासी शाहिदुल इस्लामकडून खंडणीची रक्कम मागितली होती. काल रात्री सम्राट आणि त्याचे साथीदार शाहिदुलच्या घरी पैसे घेण्यासाठी गेले होते. जेव्हा घरच्यांनी 'चोर' ओरडून गोंधळ केला, तेव्हा स्थानिक लोक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी सम्राटला मारहाण केली.



## राजकीय पक्षांना 'इलेक्टोरल ट्रस्ट'कडून तब्बल 3,811 कोटी देणगी

### भाजपला 2024-25 मध्ये सर्वाधिक 3,112 कोटी काँग्रेसला केवळ 299 कोटी मिळाले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इलेक्टोरल ब?न्डवरील सर्वोच्च न्यायालयाच्या बंदीनंतर, पहिल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राजकीय पक्षांना नउ इलेक्टोरल ट्रस्ट्सद्वारे ३,८११ कोटी रुपयांची देणगी मिळाली आहे. यापैकी ३,११२ कोटी रुपये केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाला (भाजप) मिळाले. ही माहिती इलेक्टोरल ट्रस्ट्सनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या अहवालातून समोर आली आहे. निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर अपलोड केलेल्या या अहवालानुसार, इतर सर्व पक्षांना मिळून सुमारे ४०० कोटी (१०%) निधी मिळाला. यामध्ये काँग्रेसला २९९ कोटी मिळाले, जे एकूण देणगीच्या ८% पेक्षाही कमी आहे. इलेक्टोरल ट्रस्ट ही एक नोंदणीकृत संस्था असते, जी कार्पोरेट कंपन्या आणि व्यक्तींकडून देणग्या घेउन राजकीय पक्षांपर्यंत पोहोचवते.

ट्रस्टला देणग्यांची संपूर्ण माहिती निवडणूक आयोगाला द्यावी लागते. यामुळे देणग्यांचा रेकार्ड राहतो आणि कोणत्या पक्षाला किती देणगी मिळाली हे कळते. २० डिसेंबरपर्यंतच्या आकडेवारीनुसार, निवडणूक आयोगाकडे १९ पैकी १३ इलेक्टोरल ट्रस्ट्सचे अहवाल उपलब्ध होते. यापैकी ९ ट्रस्ट्सनी २०२४-२५ मध्ये एकूण ३,८११ कोटी देणगी दिली, जी २०२३-२४ च्या १,२१८ कोटींच्या तुलनेत २००ऽ पेक्षा जास्त आणि तिप्पट आहे.




**भाजपला प्रोग्रेसिव्ह ट्रस्टकडून २९३७.६९ कोटी देणगी**

भाजपला देणगी देण्याच्या बाबतीत इलेक्टोरल ट्रस्ट सर्वात पुढे होता. भाजपला एकूण ३,११२ कोटींपैकी २,१८०.०७ कोटी एकट्या प्रुडेंटने दिले. प्रुडेंटने काँग्रेसला २१.६३ कोटी देणगी दिली. प्रुडंट इलेक्टोरल ट्रस्टने तृणमूल काँग्रेस(टीएमसी), आम आदमी पार्टी(एएपी), टीडीपीसह अनेक पक्षांनाही देणग्या दिल्या. मात्र, त्यांच्या एकूण २,६६८ कोटींच्या देणग्यांपैकी सुमारे ८२% रक्कम भाजपला मिळाली.

**देणगीत प्रोग्रेसिव्ह दुस-या स्थानी**

ट्रस्टला ज्या कंपन्यांकडून निधी मिळाला, त्यामध्ये जिंदल स्टील अँड पॉवर, मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, भारती एअरटेल, ऑरोबिंदो फार्मा आणि टारंट फार्मास्युटिकल्स यांचा समावेश आहे. पक्षांना सर्वाधिक देणग्या देण्याच्या बाबतीत प्रोग्रेसिव्ह इलेक्टोरल ट्रस्ट दुस-या क्रमांकावर होता, ज्याने एकूण ९१४.९७ कोटी दान केले, त्यापैकी ७५७.६२ कोटी भाजपला आणि ७७.३४ कोटी काँग्रेसला दिले. गेल्या आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भाजपला एकूण ३,९६७.१४ कोटी देणग्या मिळाल्या होत्या. यापैकी ४३% म्हणजे १,६८५.६२ कोटी इलेक्टोरल बान्डद्वारे आले होते.

**२०१३ पासून ट्रस्ट सुरू-** २०१८ मध्ये सुरू झालेले इलेक्टोरल बान्ड सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी २०२४ मध्ये पारदर्शकतेच्या अभावामुळे अवैध ठरवून बंद केले होते. त्यानंतर राजकीय निधीमध्ये मोठा बदल झाला आणि इलेक्टोरल ट्रस्ट राजकीय पक्षांसाठी देणगीचे मुख्य माध्यम बनले आहेत. इलेक्टोरल ट्रस्ट योजना २०१३ पासून देशात लागू आहे. ट्रस्ट सध्या कंपनी कायदा २०१३, आयकर कायद्याचे कलम १३ बी, इलेक्टोरल ट्रस्ट योजना २०१३ आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नियंत्रित केले जातात. ट्रस्ट कार्पोरेट कंपन्यांकडून मर्यादित स्वरूपात रोख रक्कम घेउ शकतात. त्यांना ही रक्कम आरटीजीएस किंवा एनईएफटीद्वारे जमा करावी लागते. कोणत्या पक्षाला किती देणगी द्यायची आहे, हे ट्रस्ट बोर्ड ठरवते. याचा नियम असा आहे की, किमान ९५% रक्कम वर्षाच्या आत पक्षांना देणे आवश्यक आहे.

## हरपाळकर यांच्याकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची धुरा

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सचिवपदाचा गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेला गोंधळ अखेर संपला आहे. सामान्य प्रशासन विभागाने महेंद्र हरपाळकर यांची सचिवपदी नियुक्ती केली आहे. हे पद रिक्त राहिल्यामुळे आयोगातील परीक्षा, निकाल आणि मुलाखती रखडल्या होत्या, ज्याचा थेट फटका हजारो स्पर्धा परीक्षार्थींना बसत होता. मात्र आता रखडलेले निकाल आणि लांबणीवर पडलेल्या मुलाखतींच्या प्रक्रियेला गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. एमपीएससी ही घटनात्मक संस्था असून यामध्ये अध्यक्ष आणि सचिव ही महत्त्वाची पदे आहेत. आयोगाच्या परीक्षा, निकाल, शिफारशी, न्यायालयीन प्रकरणे, नवीन नियमावली लागू करणे आदी सर्व जबाबदा-या सचिवांकडे असतात. सचिव हे कार्यालयीन प्रमुखही असतात. आयोगाच्या माजी सचिव डॉ. सुवर्णा खरात यांचा कार्यकाळ संपल्यापासून हे पद रिक्त होते. मधल्या काळात अपर जिल्हाधिकारी जगन्नाथ वीरकर यांची नियुक्ती करण्यात आली होती, मात्र त्यांनी हे पद स्वीकारण्यास नकार दिला होता. परिणामी गेल्या दोन महिन्यांपासून सचिव पद रिक्त असल्याने आयोगाचा संपूर्ण कार्यभार वा-यावर होता.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा श्रीगणेशा

### इंडिगोच्या पहिल्या उड्डाणाने एअरसाईड ऑपरेशन्सचा शुभारंभ

भारतीय नागरी विमान वाहतूक क्षेत्रात आज एका सुवर्ण अध्यायाची नोंद झाली. बहुप्रतिक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर बुधवारी पहिल्या व्यावसायिक उड्डाणाचे यशस्वी लँडिंग झाले आणि यासोबतच विमानतळाच्या एअरसाईड ऑपरेशन्सचा अधिकृतपणे प्रारंभ झाला. मुंबई महानगर प्रदेशाच्या दळणवळण व्यवस्थेला नवी दिशा देणारा हा एक मैलाचा दगड ठरला आहे. या ऐतिहासिक दिवसाची सुरुवात इंडिगो एअरलाईन्सच्या ६क४६० या विमानाने झाली. बेंगळुरूहून उड्डाण केलेले हे विमान सकाळी ०८:०० वाजता नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर दिमाखात उतरले. विमानतळ प्रशासनाकडून या पहिल्या व्यावसायिक विमानाचे स्वागत अत्यंत भव्य स्वरूपात करण्यात आले. विमान वाहतूक क्षेत्रातील जागतिक परंपरेनुसार, या विमानाला 'वाटर कॅनन सॅल्यूट' (पाण्याच्या कारंज्यांची सलामी) देउन मानवंदना देण्यात आली. आगमनानंतर काही वेळातच, या विमानतळावरून पहिल्या प्रस्थानाची ( नोंद झाली. सकाळी ०८:४० वाजता इंडिगोच्या 6E882 या विमानाने हैदराबादसाठी उड्डाण केले. पहिल्याच दिवशी आगमन आणि प्रस्थानाचे चक्र यशस्वीपणे पूर्ण झाल्याने विमानतळाची तांत्रिक सज्जता आणि कार्यक्षमता सिद्ध झाली आहे.



**मुंबईच्या विमान वाहतुकीचा भार हलका होणार-** सध्या मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (CSMIA) प्रवाशांचा आणि विमानांच्या वाहतुकीचा प्रचंड ताण आहे. नवी मुंबई विमानतळावर नियोजित प्रवासी सेवा सुरू झाल्यामुळेः गर्दीत घट झाली. मुंबई विमानतळावरील विमानांच्या येण्या-जाण्याचा ताण लक्षणीयरीत्या कमी होईल. एक 'ग्रीनफील्ड' आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून विकसित करण्यात आलेले ?ग्क्ष्ञ्ख केवळ प्रवासाचे साधन नसून ते आर्थिक विकासाचे इंजिन ठरणार आहे. विमानतळ कार्यान्वित झाल्यामुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. सुलभ हवाई प्रवासामुळे महाराष्ट्रातील पर्यटनाला गती मिळेल. जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधांनी सज्ज असलेले हे केंद्र भारताच्या विमान वाहतूक परिसंस्थेचा विस्तार करण्यास मदत करेल.

## बनावट क्रेडिट कार्डद्वारे बँकेला दीड कोटींहून अधिकचा गंडा

**नागपूर :** बँकेत शाखा प्रबंधक असताना क्रेडिट कार्ड व कर्ज विभागात कार्यरत कर्मचा-यांना हाताशी धरून ग्राहकांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करत त्यांच्या नावाचे बनावट क्रेडिट कार्ड, कर्ज उचलून सात जणांच्या टोळीने बँकेलाच १ कोटी ६५ लाख १७ हजार रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बँकेत शाखा प्रबंधक असलेल्या अधिका-याने आपल्या कार्यकाळात हा प्रकार केल्याची बाब अंकेक्षण अहवाल आणि फसवणूक देखरेख तपासणीतून समोर आली आहे. गणेशपेठ पोलीस हद्दीतील गोदरेज आनंदम येथील युनियन बँक ऑफ इंडियासोबतच ही फसवणूक झाली. सध्या घाट रोडवरच्या शाखेत मुख्य प्रबंधक असलेले संदिप मोतीलाल कुमार यांनी २०१९ ते २०२२ दरम्यानचे बँकेचे अंकेक्षण अहवाल तपासले. यात त्यांना विशिष्ठ जणांच्या क्रेडिट कार्डची बिले थकल्याचे आढळले.

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी ब्लॉक

**वर्धा, दि.२५ (जिमाका) :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर हायवे ट्रैफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यासाठी महामार्ग काही ठिकाणी ४५ ते ६० मिनीटांसाठी पुर्णतः थांबविण्यात येणार आहे. महामार्गावरुन प्रवास करणा-या जिल्ह्यातील नागरिकांनी याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.समृध्दी महामार्गावर हायवे ट्रैफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत कि.मी. १०४अ०८० ते कि.मी. १२०अ३०० ता. धामणगाव रेल्वे व ता. चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती येथे गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत दि.२७ ते दि.२९ डिसेंबर या कालावधीत पाच टप्प्यात करण्यात येणार आहे. या प्रत्येक टप्प्यादरम्यान कामाच्या टप्प्यानजीक संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांकरिता पूर्णत? थांबविण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यातील काम पूर्ण झाल्यावर दुरुतगती मार्गावरील संबंधित वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल. त्यानुसार गॅन्ट्री उभारण्याच्या कामाकरीता दि.२७ डिसेंबर रोजी दुपारी २ ते ३ किंवा दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान मुंबई वाहिनीवर नगरगावंडी गावाजवळ साखळी क्रमांक १०४.०८० तसेच १०५.०५० येथे मार्ग बंद राहील. दिनांक २८ डिसेंबर रोजी दुपारी २ ते ३ किंवा दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान नागपूर वाहिनीवर नगरगावंडी गावाजवळ साखळी क्रमांक १०५.०६५ येथे मार्ग बंद राहील.दिनांक २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते १२ किंवा दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान नागपूर वाहिनीवर टिटवा गावाजवळ साखळी क्रमांक १२०.३०० येथे मार्ग बंद राहील. दिनांक २९ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ४ किंवा सायंकाळी ४ ते ५ वाजताच्या दरम्यान मुंबई वाहिनीवर टिटवी गावाजवळ साखळी क्रमांक १२०.३०० येथे मार्ग वाहतुकीकरिता ४५ ते ६० मिनीटांसाठी पुर्णतः थांबविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिका-यांनी कळविले आहे.




## सुट्यांमुळे शिर्डीत भाविकांची प्रचंड गर्दी

**अहिल्यानगर / प्रतिनिधी-** नाताळ आणि नवीन वर्षाच्या सुट्यांमुळे शिर्डीतील साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. गुरुवार, २५ डिसेंबर रोजी देशभरातून लाखो भाविक शिर्डीत दाखल झाले आहेत. वाढलेल्या भक्तांच्या गर्दीमुळे साई मंदिराकडे जाणारे सर्व प्रमुख रस्ते फुलून गेले आहेत. साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना गुरुवारी किमान चार-पाच तास प्रतीक्षा करावी लागत आहे. नाताळ आणि नवीन वर्षाच्या सुट्या गुरुवारपासून सुरू झाल्याने देशभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत दाखल झाले आहेत. या सुट्यांच्या कालावधीत शिर्डीत येणा-या भाविकांचा ओघ लक्षात घेता साईबाबा संस्थानच्या वतीने दर्शन व्यवस्था तसेच निवास व्यवस्था चोख करण्यात आली आहे. भाविकांच्या सुरक्षेचीही विशेष काळजी घेण्यात येत आहे. नाताळ आणि नवीन वर्षाच्या संभाव्य गर्दीच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन तसेच साईमंदिर प्रशासनाकडून योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे. ही गर्दी पुढील दहा दिवस अशीच टिकून राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



केंद्र सरकारने ‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी या योजने’च्या नावात बदल करण्याचे विधेयक संसदेत सादर केल्यापासूनच चर्चेला तोंड फुटले. केंद्र सरकारला कोणत्याही कायद्यात बदल करण्याचा अधिकार असतो. काळानुरूप कायद्यात बदल करावाही लागतो. तसा तो करण्यात गैर काहीच नाही; परंतु हे करताना सरकारचा हेतू स्वच्छ आहे का, हे पाहिले पाहिजे. गेल्या काळात मोदी सरकारने गांधी- नेहरू कुटुंबांशी संबंधित तीसपेक्षा अधिक योजनांची नावे बदलली. याच धडाक्यात केंद्र सरकारने महात्मा गांधी यांच्या नायाने असणाऱ्या ‘मनरेगा’ योजनेचे नाव बदलून ‘विकसित भारत- रोजगार आणि अजीविका मिशन (ग्रामीण) असे केले. या बदलाला राष्ट्रपतींची संमतीदेखील मिळाली. विधेयकानुसार, कोणत्याही विशेष कौशल्याशिवाय हाताने काम करण्यास तयार असणाऱ्या प्रौढ गरजूंना एका आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या पगारी रोजगाराची कायदेशीर हमी दिली गेली आहे. ‘व्हीबी- जी- राम जी’ नामक हा कायदा सुरू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत राज्यांना नवीन कायद्यातील तरतुदींनुसार एक योजना विकसित करावी लागेल. ग्रामीण विकास मंत्रालयाने म्हटले आहे की, प्रस्तावित कायदा ‘विकसित भारत २०४७’चे ध्येय साध्य करण्यासाठी एक आधुनिक कायदेशीर चौकट स्थापित करेल. या विधेयकाचे उद्दिष्ट चार प्राधान्यक्षेत्रांद्वारे रोजगारनिर्मिती आणि शाश्वत ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. नवीन कायदा उत्पादक मालमत्ता निर्माण करून, उत्पन्न वाढवून तसेच लवचिकता सुधारून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणारा असेल तसेच ही नवी योजना पाण्याशी संबंधित कामांना प्राधान्य देईल. यात ग्रामीण पायाभूत सुविधांवर भर दिला जाईल. या क्षेत्रांमध्ये बाजारपेठ उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी रस्ते, संपर्कयंत्रणा आणि मूलभूत पायाभूत सुविधाही पूर्वीपेक्षा मजबूत केल्या जातील. त्याचबरोबर साठवणूक, बाजारपेठ आणि उत्पन्न विविधीकरणावर भर दिला जाईल. नवीन योजनेतील पाणी साठवण, पूर निचरा आणि माती संवर्धनासाठीच्या पायाभूत सुविधा ग्रामीण उपजीविकेचे रक्षण करणाऱ्या ठरतील. एकीकडे हे सगळे असतानाच दुसरीकडे यामुळे ग्रामीण भागात होणारी रोजगाराची उपलब्धता वाढल्यामुळे स्थलांतर कमी करण्यासही ही योजना मदत करणारी

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# मनरेगातील बदल

ठरेल. ग्रामीण भागात राहणाऱ्यांना दीर्घकालीन कामाची हमी मिळेल. वेतन आधीप्रमाणेच पूर्ण बायोमेट्रिक आणि आधार- आधारित पडताळणीसह सुरू राहील. त्यामुळे वेतन चोरी पूर्णपणे थांबेल. विकसित ग्रामपंचायत योजना कामाचे आगाऊ नियोजन असल्याची खात्री करेल. महत्त्वाचे म्हणजे काम न पुरवल्यास राज्यांना रोजगार भत्ता द्यावा लागेल. चांगले रस्ते, पाणी आणि उपजीविकेची साधने सामान्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणतात तसेच जीवनशैलीतही सकारात्मक बदल घडवतात, हे आपण पाहिले आहे. त्यामुळेच या उद्देशाने ‘मनरेगा’ कायदा २००५ मध्ये तयार करण्यात आला असला तरी पुढील २० वर्षांमध्ये ग्रामीण भारत बदलला आहे. अनेक सरकारी संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणांमध्ये लोकांची खर्च करण्याची क्षमता वाढल्याचे दिसून आले आहे. सुधारित उत्पन्न आणि आर्थिक उपलब्धतेमुळे गरिबी २५.७ टक्क्यांवरून (२०११-१२) ४.८६ टक्क्यांपर्यंत (२०२३-२४) कमी झाली आहे. मजबूत सामाजिक संरक्षण, चांगली संपर्क यंत्रणा, डिजिटल यंत्रणेचा वाढता वापर आणि वैविध्यपूर्ण ग्रामीण उपजीविका साधनांच्या उपलब्धीमुळे जुनी रचना आताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत बसत नाही. तेव्हा या संरचनात्मक बदलामुळेच ‘मनरेगा’चे ‘ओपन- एंडेड मॉडेल’ जुने झाले असल्याचे बोलले जाते. या पार्श्वभूमीवर ‘व्हीबी- जी राम- जी’ अधिक समर्पक आणि काळानुरूप आवश्यक ते बदल घडवणारा असल्याचा सरकारचा दावा आहे.

तो नवीन वैधानिक वेतन कार्यक्रम सादर करण्याचा प्रयत्न करणाराही आहे. ही तरतूद माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी आधीच मान्य केली होती. त्यांनी ‘यूपीए’ सरकारच्या काळात असाच एक प्रस्ताव मांडला होता; परंतु त्यामुळे बराच वाद निर्माण झाला आणि काही मंत्र्यांनीही त्यावर टीका केली होती. पवार यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना पत्र लिहून शेतीच्या हंगामात ‘मनरेगा’ योजना किमान तीन महिन्यांसाठी स्थगित करण्याची मागणी केली होती. गंमतीची बाब म्हणजे नवीन सुधारित कायद्यामध्ये ९० ऐवजी फक्त ६० दिवसांसाठी स्थगिती देण्यात आली आहे. ‘मनरेगा’ मुळे ग्रामीण कामगार बाजारपेठ विकसित झाल्याचे मानले जाते. मात्र हे वेतनात लक्षणीयरित्या प्रतिबिंबित होत नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये ग्रामीण भागामध्ये वेतनवाढ झाली आहे. भारतातील २० राज्यांमधील ६०० गावांमध्ये सर्वेक्षण करून ही माहिती मिळते. मात्र यादीवरून दिसून येते, की सरासरीने सर्व व्यवसायांमध्ये ग्रामीण भागातील पुरुष कामगारांच्या वेतनातील वार्षिक वाढ ३.६ ते ६.४ टक्क्यांदरम्यानच आहे. याचा अर्थ वास्तविक अर्थाने वेतनात घटच झाली आहे. गेल्या दहा वर्षांपैकी आठ वर्षात शेतीतील वेतन एकूण ग्रामीण वेतनापेक्षा वेगाने वाढले आहे. मागील दोन वर्षांमध्ये (२०१५-१६ आणि २०१९-२०) ग्रामीण वेतनाचा वाढीचा दर शेतीतील वेतनापेक्षा जास्त आहे. शेतीतील वेतनात एकूण ग्रामीण वेतनापेक्षा जास्त वाढ झाली आहे. खेरीज ग्रामीण भारतातील महिलांचा वाढता कामगार सहभाग दर (एलएफपीआर) उंचायत त्याचे श्रेय प्रामुख्याने मोदी सरकारच्या ‘उज्वला’, ‘हर घर जल’, ‘सौभाग्य’ आणि ‘स्वच्छ भारत’ यासारख्या योजनांना देण्यात येत आहे. या योजनांमुळे केवळ स्वच्छ स्वयंपाक इंधन, स्वस्त वीज, पाइपद्वारे पिण्याचे पाणी आणि घरांमध्ये शौचालयांची उपलब्धता लक्षणीयरित्या वाढली नाही तर ग्रामीण महिलांचा लाकूड आणि शेण गोळा करण्यात किंवा पाणी आणण्यात खर्च होणारा वेळ आणि मेहनतदेखील वाचली आहे. आता ‘मनरेगा’ मुळे शेतातून विस्थापित झालेल्या महिलांची मोठी संख्याही नव्या कायद्याच्या प्रभावाखाली येईल आणि त्यांनाही शेतीची कामे नसताना काम मिळेल अशी आशा आहे. अर्थातच हे आणि यासारखे लाभ मिळण्यासाठी कायद्याची चोख अंमलबजावणी होणे गरजेचे आहे

# इथेनॉल हवेच... पण कशापासून ?

मक्याचा इथेनॉलमधील वापर कमी झाला. परिणामी मक्याचे भाव पडले आणि त्याचा फटका मका उत्पादक शेतकऱ्यांना बसू लागला अशा बातम्या आल्या. त्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाची चर्चा होणे आवश्यक वाटते. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादनासाठी तुकडा तांदळाचा वापर करण्याचा निर्णय घेतल्यानंतर

केंद्र सरकारने तुकडा तांदळाचा वापर इथेनॉलनिर्मितीसाठी करण्याचा निर्णय या वर्षीच्या जुलै महिन्यात घेतला. आणि त्या निर्णयाची समीक्षा होण्याऐवजी मक्याच्या इथेनॉलमधील वापरावर टीका झाली. हे अतार्किक आहे, अशी तर्कदुष्ट भूमिका मका उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधी तर आहेच, पण त्याचबरोबर ती सरकार सध्या वापरत असलेल्या पर्यावरणीयदृष्ट्या जास्त हानीकारक अशा पर्यायाला मूक संमती देते.

सरकारचे उद्दिष्ट पुढील वर्षापर्यंत पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे आहे. आणि हे साधायचे असेल तर सरकारला इथेनॉल उत्पादन दुपटीने वाढवावे लागणार आहे. साखरेच्या उत्पादनाची मर्यादा, तिच्या उत्पादनात होणारा पाण्याचा प्रचंड वापर यामुळे साखरेपासून इथेनॉलनिर्मितीवर मर्यादा घालण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर धान्यापासून इथेनॉलनिर्मितीचा पर्याय समोर आला.

धान्यापासून इथेनॉलनिर्मिती करणे चुकीचे आहे अशी भूमिका घेता येऊ शकते. आणि तशी ती घेतली देखील गेली आहे. म्हणजे इथेनॉल उत्पादनासाठी मुख्य अन्नधान्याऐवजी कृषी-कचरा आणि पिकांचे अवशेष (उदा. पिकांची धसकटे, गवत, दाणे काढलेले कणीस) वापरणे हा अधिक संयुक्तिक पर्याय आहे. आणि अशी भूमिका असेल तर चर्चा वेगळ्या पातळीवर जाईल. पण तसे न करता फक्त मक्यापासून इथेनॉलनिर्मिती नको अशी भूमिका घेणे आणि तुकडा तांदळाच्या इथेनॉलनिर्मितीत वापराबद्दल मौन बाळगणे हे अनेक अर्थाने चुकीचे आहे.

मक्याचा वापर इथेनॉलसाठी झाल्यास शेतकरी भातशेतीकडून मक्याकडे वळतील हा तर्क चुकीचा आहे. याचे कारण भातशेतीला हमीभावाचे संरक्षण आहे. आणि निविष्टांवरदेखील अनुदान आहे. मक्याचा वापर इथेनॉलसाठी झाला तर शेतकरी डाळींकडून मक्याकडे वळतील हा तर्कही चुकीचा आहे. डाळींची अत्यंत कमी उत्पादकता हे शेतकरी डाळींकडून इतर पिकांकडे वळण्याचे प्रमुख कारण आहे. अमेरिकेतील किंवा इतर देशातील इथेनॉलसाठी मक्याचा अनुभव भारतीय संदर्भात बऱ्याच अंशी अप्रस्तुत आहे.

अन्न महामंडळाकडे तुकडा तांदळाचा मोठा साठा आहे. आज सरकारने त्याचा वापर इथेनॉलसाठी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील काही गोष्टी लक्षात घेऊ.

हा तांदूळ पंजाब, हरियाणा काही प्रमाणांत ओरिसा आदी राज्यांतून शेतकऱ्यांकडून हमी भावाने खरेदी करण्यात आला आहे. शासनाकडे असलेला तांदळाचा साठा देशाच्या

**तांदूळ या पिकाला जास्त पाणी लागते. तसे मक्याचे नाही. हवामान बदलाचा मोठा फटका तांदूळ उत्पादनाला बसू शकतो. पण मका हे पीक हवामान बदलाला एवढे संवेदनशील नाही. त्यामुळे इथेनॉल उद्योगालाही तांदळापेक्षा मका हे पीक जास्त भरवशाचे आहे.**



अन्नसुरक्षेसाठी आवश्यक असतो असे मानले गेले आहे. तो आवश्यकतेपेक्षा खूप जास्त असेल तर ती बाळगण्याची गरज नाही. त्यासाठी आवश्यक त्या धोरणात्मक सुधारणा करण्याची गरज आहे. तांदळाला इतर पिकांच्या तुलनेत पाणी जास्त लागते, पंजाब, हरियाणामध्ये शेतकऱ्यांना वीज मोफत असल्याने पाण्याचा उपसा इतका वाढला आहे की भूगर्भातील पाण्याची पातळी खूप खोल गेली आहे. जमिनीची सुपीकता गेली आहे. त्यामुळे हरितक्रांतीच्या पट्ट्यातील शेतकऱ्यांनी तांदळाकडून दुसऱ्या पिकाकडे वळावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. असे असताना तुकडा तांदळाचा वापर इथनॉलसाठी करणे पूर्णतः असमर्थनीय आहे. कारण यामुळे तांदळाची मागणी वाढते.

जैवऊर्जा विषयातील तज्ज्ञ आकांक्षा जैन यांनी या विषयावर त्यांच्या संशोधनपर लेखात सविस्तर मांडणी केली आहे. इथेनॉल निर्मितीसाठी वापरण्याअगोदर जी प्रक्रिया तांदळावर करावी लागते त्यासाठी पाण्याचा आणि ऊर्जेचा भरपूर वापर होतो. ऊर्जानिर्मितीसाठी निवडलेल्या पर्यायी इंधनावरच पाणी आणि ऊर्जेचा जास्त वापर होत असेल तर तो पर्याय समर्थनीय कसा ठरेल असा प्रश्न त्या उपस्थित करतात.

तांदूळ हे भारतातील सर्वात जास्त पाणी लागणारे पीक आहे. एक किलो तांदूळ पिकवण्यासाठी अंदाजे अडीच ते पाच लिटर पाणी लागते. भारताच्या एकूण गोड्या पाण्याच्या वापरापैकी सुमारे २५इ पाणी केवळ भातशेतीसाठी वापरले जाते. याउलट, मक्यासाठी प्रति किलो केवळ ९००-१,२०० लिटर पाणी लागते. त्यामुळे तांदळाऐवजी मक्याचा वापर केल्यास पाणी वाचेल. शिवाय, भातशेतीमध्ये पाणी साचून राहिल्यामुळे मिथेन वायूचे उत्सर्जन होते, जे हवामान बदलास हातभार लावत.

याशिवाय हवामान बदलाचा मोठा फटका तांदूळ उत्पादनाला बसू शकतो. पण मका हे पीक हवामानबदलाला एवढे संवेदनशील नाही. त्यामुळे इथेनॉल उद्योगालाही तांदळापेक्षा मका हे पीक जास्त भरवशाचे आहे.

तांदळाऐवजी मक्याचा इथेनॉलसाठी वापर शेतकऱ्यांसाठी अतिशय लाभकारक आहे. आज हवामान बदलामुळे खरीप आणि रब्बी हंगामनुसार शेती करणे धोक्यात येत आहे. पाऊस वेळेवर झाला नाही तर खरिपाच्या पेरण्या वेळेवर होत नाहीत आणि पाऊस लांबला तर रब्बी हंगामाच्या पेरण्यांवर परिणाम होतो. ३० जूनपर्यंत पेरणीयोग्य पाऊस पडला नाही तर मूग, उडीद उत्पादक शेतकऱ्यांना त्या पिकांची पेरणी करता येत नाही. १५ जुलैपर्यंत पेरणीयोग्य पाऊस पडला नाही, तर तूर-सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्या पिकांची पेरणी करणे जास्त फायद्याचे ठरत नाही. अशा परिस्थितीमध्ये मका हे पीक शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरते. कारण पावसाच्या आगमनानुसार मक्याची पेरणी कोणत्याही महिन्यामध्ये करणे शक्य असते. मका काढणीवेळी पावसाची संततधार सुरू राहिली आणि त्यामुळे काढणीला १०-१५ दिवस विलंब झाला तर उडीद-सोयाबीनसारख्या पिकांच्या तुलनेत मक्याचे नुकसान खूप कमी होते. उत्पादनावरही तितकासा परिणाम होत नाही.

शाश्वत शेती व्यवस्थापनामध्ये पिकाचा फेरपालट अत्यंत महत्त्वाचा असतो. खरीप हंगामामध्ये बहुतांश कडधान्ये पेरली जातात. त्यापैकी सोयाबीन, मूग, उडीद ही पिके कमी कालावधीत तयार होतात. म्हणजे अडीच तीन महिन्यांमध्ये त्या पिकांचा हंगाम पूर्ण होतो. त्यानंतर उपलब्ध पाण्यावर हमखास उत्पादन देणारे आणि तुलनेने जास्त उत्पादन देणारे पीक म्हणून सुद्धा मक्याचे महत्त्व मोठे आहे. चारा उत्पादनासाठी भातपिकापेक्षा मका पीक हे जास्त परवडण्यासारखे आहे. कारण तुलनेने जास्त चारा आणि जास्त सकस चारा मका उत्पादनामुळे शक्य होतो. समजा पाऊस कमी पडला आणि मक्याचे पीक येणार नाही असे झाले तर शेतकरी कणसे लागण्या आधीच पीक काढतो आणि त्याचा फक्त चाऱ्यासाठी वापर करतो.

तांदूळ उत्पादक राज्य, शेतकरी संख्या आणि अनुदानाचे लाभ असा विचार केल्यानंतरही मका हे पीक अनेक अर्थाने महत्त्वाचे ठरते. मक्याची हमीभावाने खरेदी होत नाही. याउलट जो तांदूळ इथेनॉलसाठी वापरला जाणार आहे, त्याची खरेदी हमीभावाने झाली आहे. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान ही महत्त्वाची मका उत्पादक राज्ये आहेत. पावसावर आधारित पीक पद्धतीमध्ये असणाऱ्या डाळी, तृणधान्य अशा पिकांमध्ये सध्या मका हे जास्त उत्पादन देणारे पीक आहे.

अन्नसुरक्षेचा विचार करता कोणत्या पिकाएवजी मका पीक घेतले जात असा विचार केला तर आपल्या पटकन असे लक्षात सात येते की, बाजारपेठेचा आणि हवामान बदलाचा रेटा यावरील व्यवहार्य तोडगा म्हणून मका पिकाखालील क्षेत्र वाढत आहे. याची तीन प्रमुख कारणे आहेत. एक, सरासरीएवढा पाऊस पडला तरी तो शेतीला पूरक न ठरणे. दोन, ज्वारी, बाजरीसारखी तृणधान्ये आणि कडधान्ये पिकांची उत्पादकता कमी असणे आणि पावसाच्या आगमनानुसार ती पेरता न येणे, तीन मक्याच्या उत्पादन वाढीची तुलनेत मोठी शक्यता असल्यामुळे बाजारपेठेतील, चढ-उतार सहन करण्याची क्षमता काही प्रमाणात शाबूत राहणे... अशा सर्व पार्श्वभूमीवर मका हे पीक शेतकऱ्यांनी स्वीकारले आहे.

या सर्व बाबी लक्षात घेता पर्यावरण आणि शेतकऱ्यांचे हीत या दोन्ही निकषावर तांदळाचा इथेनॉल साठी वापर करणे अत्यंत असमर्थनिय आहे.

**मिलिंद मुरूगकर**
**डॉ. सतीश करंडे**

# तिबेटचा यक्षप्रश्न आणि भारत

चीनचे साम्राज्यवादी धोरण आशियाई देशाला हानिकारक आहे. या धोरणाचा सर्वात मोठा शिकार तिबेट हे राष्ट्र झालेले आहे.

तिबेट मधील नागरिकांचे मानवी मूल्य आणि स्वातंत्र्य पायदळी तुडविल्या गेलेले आहेत. भारतासारख्या बलाढ्य आणि जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असलेल्या देशाला चीन नमवू शकतो तर तिथे छोट्याशा तिबेटची काय गत होईल, हे आपल्या सहजच लक्षात येऊन जाते. मुळात तिबेट या राष्ट्राने भारतातील बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे चीन आणि तिबेट यांच्यामध्ये सांस्कृतिक मतभेद दिसून यायला लागले होते. बौद्ध धर्माचे अस्तित्व एकच असले तरीही तो वेगवेगळ्या पंथांनी विविध राष्ट्रात वावरताना दिसतो. प्रत्येक पंथाची एक वेगळी मान्यता आणि संस्कृती आहे. तिबेट हा कमकुवत देश असला तरी सांस्कृतिक दृष्ट्या महान आहे. दलाई लामा यांना तिबेटीसंस्कृतीत सर्वोच्च आध्यात्मिक व्यक्ती मानतात. १९१२ मध्ये किंग राजवंश संपल्यानंतर १३वे दलाई लामा यांनी तिबेटला स्वतंत्र घोषित केले आणि १९५० पर्यंत ते वास्तविकपणे स्वतंत्र राष्ट्र राहिले. १९५० चीनने तिबेटवर लष्करी आक्रमण केले. १९५१ मध्ये जबरदस्तीने १७-सूत्री करार करून तिबेटला चीनचा भाग बनवले. १९५९ मध्ये तिबेटी उठाव दडपवला गेला आणि १४वे दलाई लामा यांना भारतात आश्रय घ्यावा लागला. त्यांनी भारतातील धर्मशाळेत निर्वासित सरकार स्थापन केले. त्यानंतर चीनने सांस्कृतिक क्रांती दरम्यान हजारो मठ, विहारे नष्ट केलीत. यामध्ये मोठ्या प्रमाणात नरसंहार झाला. चीनने इथे मानवतावाद दृष्टीकोन सोद्लायचे दिसते.

सध्याच्या काळात तिबेटमध्ये धार्मिक स्वातंत्र्यावर कठोर नियंत्रण आहे. तिबेटी भाषा, संस्कृती आणि परंपरांना धोका आहे. दलाई लामांचे फोटो ठेवणे किंवा त्यांच्याशी संपर्क ठेवणे गुन्हा मानल्या जाते. चीनने तिबेटी बौद्ध धर्माला समाजवादी समाजाशी जुळवून घेण्याचे निर्देश दिले आहेत. म्हणजे चीनच्या बौद्ध संस्कृतीशी जूळवून घेणे त्यांना अनिवार्य बनले. मागच्या काळात चीनचे राष्ट्राध्यक्ष यांनी तिबेटला भेट दिली तेव्हा त्यांनी तिबेटच्या धार्मिक व्यवहारांवर कठोर नियंत्रण आणले. चीनने तिबेटमध्ये जबरदस्ती रस्ते, रेल्वे आणि लष्करी बेस मजबूत केला आहे.; त्यामुळे तिबेटी व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा आणली आहे. दलाई लामा हे तिबेटी बौद्ध धर्माचे सर्वोच्च नेते आहे. त्यांनी मागेच स्पष्ट केले आहे की, दलाई लामा पद चालू राहील आणि त्यांच्या उत्तराधिकारी निवडीत चीनचा हस्तक्षेप होऊ देणार नाहीत. भारताने वेळेला तिबेटला चीनचा भाग मान्य केले, पण दलाई लामांना भारतात आश्रयही दिला. भारताने अनेक तिबेटी निवसितांना आश्रय दिला आहे. तिबेटी संस्कृती आणि बौद्ध धर्म जगभरात प्रसिद्ध आहेत.

तिबेटमुळे भारत-चीन सीमा विवाद आजही ज्वलंत आहे. २०२५ मध्ये भारत-चीन संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, तिबेट, दलाई लामांचा उत्तराधिकारी आणि सीमा मुद्दे हे अजूनही यक्षप्रश्न आहेत. भारताने तिबेटी संस्कृतीचे संरक्षण केले आणि तिबेटी निर्वासितांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी दिल्या. तिबेटी बौद्ध धर्म आणि संस्कृती भारतात जिवंत आहे. भारताने गौतम बुद्धाचा शांततेचा संदेश जगात पोहचवण्याचा प्रयत्न केला आणि करत आहे. भारत-तिबेट संबंध हे सांस्कृतिक आणि धार्मिकदृष्ट्या प्राचीन आणि खोल आहेत. राजकीयदृष्ट्या, भारताने तिबेटला चीनचा भाग मान्य केले असले तरी दलाई लामा आणि निर्वासित तिबेटींना आश्रय दिला आहे. हा मुद्दा भारत-चीन संबंधातील संवेदनशील भाग बनला आहे आणि भविष्यात तिबेटच्या उत्तराधिकारी निवडीमुळे आणखी यांच्यामधील तणाव अधिक वाढण्याची शक्यता दिसून येते.

तिबेटच्या लोकांनी सुद्धा स्वातंत्र्यात जगले पाहिजेत हाच मानवतावादी दृष्टीकोन चिनी स्वीकारावा, ही माफक अपेक्षा आहे.


**हेमंत दिनकर सावळे**
मो. ७८५१७३८२८
सहा. प्रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

## पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम..

भारत हा कृषिप्रधान देश आहे वातावरणातील बदल, रसायनाचा वापर, बनावट बी-बियाणे यामुळे भूमीचा कस पूर्णता जाऊन ती नापीक बनण्याच्या स्थितीला आली आहे. त्याचा परिणाम अन्नदाता शेतकरी यांच्या जीवनावर झाला आहे. नापीकी, कर्जबाजारीमुळे तो आत्महत्या करू लागला आहे. शासनाने २०२२ - २३ पर्यंत शेतीचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा केली होता. त्याला केवळ पाच राज्यातच यश मिळाले. केंद्र शासनाने २०२२ पासून नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, नैसर्गिक खताला चालना देणे, युरियाला कडूलिंबाचे तेल लावणे, कृषी सिंचन, सौर पंप, शेती पतपुरवठा, नैसर्गिक शेतीला आर्थिक सहाय्य देणे, शून्य भांडवलात नैसर्गिक शेती करणे, सकस आणि चांगले बी बियाणांचा पुरवठा करणे इत्यादी योजना सुरू केल्या आहेत. राज्यातही पुढील दोन-तीन वर्षात २५ लाख हेक्टर भूमी नैसर्गिक शेती खाली आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे ‘आशियाई बियाणे परिषद २०२५’ च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी सांगितले. देशातील पहिले ‘कृषी ए आय’ धोरण त्यांनी घोषित केले. त्याच्या उपयोगाने शेती अधिक पूर्वानुमानक्षम आणि उत्पादनक्षम करण्याचा शासनाचा मानस असल्याचेही सांगितले. नैसर्गिक शेतीच्या धोरणातून उत्पादकता वाढून उत्पादन खर्च कमी करणे हे लक्ष आहे. त्यातून होणारे अन्य लाभ हे देशाचा खरा विकास करून देणारे आहेत. पर्यायाने शेतकरी आपत्कालीन संकटाला तोंड देण्यास सक्षम बनेल. गोवंशियांचे महत्त्व, वृद्धी आदी होऊन पर्यायी सर्वच उद्योग वाढवून सफलता मिळेल. गोधनाचा वापर वाढल्याने त्यांचे रक्षण होईल. सेंद्रिय शेतीमुळे अन्यधान्य सात्विक आणि सकस होऊन समाज रोगमुक्त होईल. कृत्रिम खते, खोटे बियाणे, फळांवर रसायने लावणे आधी संबंधित सर्वच प्रकारांवर आळा बसेल. अनेक प्रकारचे प्रदूषण टाळून गाव स्वच्छ आणि स्वयंपूर्ण होण्यासही सहाय्य होऊ शकते आणि देशाला पूर्वीचे दिवस परत यायला मोठाच हातभार लागेल. सर्क्युलर इकॉनोमी असणारे समृद्ध गावाचे स्वप्न देखील साकार होईल. या सर्वाचा परिणाम अंतिमतः व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या उन्नतीसाठी होणार आहे. शेतकरी आणि राष्ट्र यांच्या विकासासाठी योजनांवर लक्ष केंद्रित करणे ही खऱ्या अर्थाने भारताला महासत्ता बनविण्यासाठी ची पायाभूत गोष्ट ठरेल.

**लीना गाडगीळ**

# मनरेगा वि VB-G RAM-G (1)




‘एक देश एक श्रम बाजार’ VB-G RAM-G: (One Nation One Labour Market) तयार करण्याच्या धोरण प्रयत्नातील एक भाग! VB-G RAM-G कडे देशातील विखंडित असलेला अकुशल/ अर्धकुशल श्रम बाजार एकजिनसी करण्याच्या धोरण प्रयत्नातील एक भाग म्हणून बघावयास हवे. देशात ‘एक देश, एक अमूक, एक तमूक’ असे कार्यक्रम राबवले जातच आहेत. त्या साखळीतील ही अजून एक कडी म्हणता येईल.

हा कायदा मोदी राजवटीच्या गेल्या अकरा वर्षातील उलगडत असलेल्या राजकीय आर्थिक तत्वज्ञानाच्या कॅनव्हास वर ठेवून, इतर धोरण बिंदूंना जोडून बघितला की, त्याचे अधिक अर्थ लावता येतील. उदा. नवीन चार कामगार संहिता आणि नवीन ग्रामीण रोजगार कायदा जवळजवळ ठेवून बघितला की या राजवटीला देशात मुक्त श्रम बाजार तयार करायचा आहे हे अधिक ठळकपणे दिसते..

श्रम बाजार मुक्त असण्यासाठी त्यात मागणी पुरवठा तत्वानुसार किमती ठरणे (इथे त्याचा अर्थ मानवी श्रमाची वेतन पातळी), शासकीय कायदे आणि नियामक मंडळाचे कमीतकमी हस्तक्षेप, श्रमिकांनी कोणत्याही हक्काधारित मागण्या न करणे (जो मनरेगाचा मूलाधार होता), श्रमिकांनी आपल्या / आपल्या कुटुंबाच्या कल्याणाची जबाबदारी स्वतः घेणे आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांवर विसंबून न राहणे अध्याहत असेल.

ज्यावेळी आपण श्रम बाजार असे म्हणतो तो काही एकजिनसी नाही. त्यात अनेक सेगमेंट असतात. उदाहरणार्थ आता ग्रामीण रोजगार कायद्याची चर्चा करताना अंग मेहनतीची कामे करणारे श्रमिकांचे सेगमेंट आपल्यासमोर आहे.

शहरी भागात औद्योगिक केंद्रात, बांधकाम उद्योगात, गिग इकॉनॉमी, शहरात सेवा क्षेत्रात विविध प्रकारची अंग मेहनतीची कामे करणारे श्रमिक आणि ग्रामीण भागात स्वतःच्या शेतीवर किंवा दुसऱ्याच्या शेतीवर शेतमजूर म्हणून किंवा इतर ठिकाणी अंग मेहनतीची कामे करणारे श्रमिक एकाच कॅटेगरीत मोडतात.

मनरेगाच्या गेल्या अनेक वर्षातील आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील जवळपास १२ कोटी स्त्री पुरुष श्रमिक या योजनेअंतर्गत आपले श्रम विकून वेतन कमवतात. इतर सर्व्हे नुसार ही दिसते की मनरेगा या हक्काधारित योजनेमुळे ग्रामीण भागातून शहरी भागात पोट भरण्यासाठी जाण्यास भाग पडणाऱ्यांची संख्या व वेग कमी राहिला आहे.

हक्काधारित ग्रामीण रोजगार मिळणार नसतील तर यात बदल होणार हे नक्की. उदा. सध्या manufacturing मध्ये नाही तर बांधकाम व्यवसाय आणि गिग इकॉनॉमि मध्ये अकुशल, अर्धकुशल रोजगार तयार होत आहेत. त्या क्षेत्रांना मजुरांचा पुरवठा वाढेल आणि कोणीही वेतन वाढीची मागणी करण्यास धजावणार नाही.

VB-G RAM-G ची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर एकाच श्रमिक कॅटेगरी मध्ये असणाऱ्या ह्या दोन सेगमेंट मध्ये अधिक वेगाने अभिसरण होऊ लागेल. नवीन ग्रामीण रोजगार कायद्याचा अनेक इंटेंट पैकी हा एक महत्वाचा इंटेंट आहे. पंतप्रधान मोदी, विविध मंत्री, यांची नावे बाजूला ठेवा. ज्यावेळी नवीन आर्थिक धोरणे आणली जातात त्यावेळी व्यक्ती केंद्री विचार न करता..

यामागे देशातील शासक वर्गाचा आर्थिक अजेंडा काय असेल असा विचार केला की वेगळा दृष्टिकोन मिळतो. व्यक्ती केंद्री नव्हे सिस्टीम केंद्री दृष्टिकोनाची गरज आहे.

**संजीव चांदोरकर**

# घरफोडी प्रकरणातील आंतरजिल्हा टोळी गजाआड

## स्थानीक गुन्हे शाखेच्या ताब्यात, आठ घरफोडी उघड, मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत वाढत्या घरफोडी पोलिसांसमोर आव्हान ठरत असतानाच स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी घरफोडी करणारी टोळी पकडली असून त्यांच्याकडून आठ चोऱ्या उघड केल्या आहेत.याशिवाय लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या संदर्भात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांनी सांगितले की, पांढरकवडा, वणी, यवतमाळ, येथील वेगवेगळे गुन्हे तपासात घेतले असताना वनी आणि चंद्रपूर जिल्ह्यात चोरी करणारा अट्टल सराईत गुन्हेगार सचिन संतोष नगराळे राहणार बोरगाव अहेरी हल्ली मुक्काम भद्रावती याची माहिती मिळाली तो सध्या त्याचा मित्र लालगुडा वणी परिसरात फिरत असल्याचे दिसून आले पोलिसांनी लगेच त्याला ताब्यात घेतले आणि फिरण्याचे कारण विचारले असता त्यांनी उडवा-उडविची उत्तरे दिली.

यावरून पोलिसांचा संशय बळावला आणि पोलिसांनी तपास करणे सुरू केले आरोपी सोबतच त्याचा मित्र कार्तिक शंकर साळवे राहणार घोटकाळा वार्ड नेहरू शाळा मागे चंद्रपूर याची विचारणा करणे सुरू केल्यावरून त्यांनी आठ ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली पोलिसांनी या आठही घर फोडी तपासात घेतल्यानंतर त्या घरातून चोरी गेलेला मुद्देमाल ताब्यात घेतला. सदर दोन्ही आरोपी वनी चंद्रपूर भद्रावती येथील पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर असून गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले वनी येथील सात चोरीचे गुन्हे तसेच भद्रावती येथील एक चोरीचा गुन्हा उघड करून त्यांच्याकडून चांदीचे साहित्य, होम थिएटर, टीव्ही माईक नगदी असा दोन लाख तीन हजार 580 रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे आरोपीला पुढील कारवाई साठी वणी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपी सचिन नगराळे राहणार बोरगाव हा सराईत गुन्हेगार असून त्याने जिल्हा चंद्रपूर, भद्रावती, राजुरा, घुगुस, गडचांदूर ,तसेच जिल्हा वर्धा, यवतमाळ, येथे चोऱ्या केले असल्याचे सांगितले. तशी नोंद गुन्ह्याची त्या त्या पोलीस स्टेशनला असल्याचीही स्थानिक गुन्हे शाखेने सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता पेंडकर, पोलीस उपनिरीक्षक धनराज हाके, सुनील खडांगळे, सुधीर पांडे, निलेश निमकर, सुधीर पिदूरकर, सलमान शेख, रजनीकांत मडावी, सतीश फुके, आणि इतर स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# जातनिहाय जनगणनेमुळेच देशाचा सर्वांगीण विकास शक्य : प्रा. आर. डी. शिंदे

## 'ओबीसी प्रवर्गाला विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी जनगणना अनिवार्य'

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - भारताच्या सर्वांगीण विकासासाठी इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाचे मागासलेपण दूर होणे अत्यावश्यक असून त्यासाठी जातनिहाय जनगणना ही काळाची गरज आहे, असे स्पष्ट प्रतिपादन ओबीसी विचारवंत प्रा. आर. डी. शिंदे (नांदेड) यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पर्व २०२५ निमित्त यवतमाळ येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा. शिंदे यांनी सांगितले की, ब्रिटिश काळात १९३१ मध्ये देशाची शेवटची जातनिहाय जनगणना झाली. त्यानंतर अनुसूचित जाती (एससी) व अनुसूचित जमाती (एसटी) यांची जनगणना नियमितपणे झाली; मात्र ओबीसी प्रवर्गाची स्वतंत्र व सखोल जनगणना झाली नाही. जातनिहाय आकडेवारीच्या अभावामुळे ओबीसी समाजाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचे अचूक चित्र समोर येत नाही. परिणामी, त्यांच्या गरजांनुसार प्रभावी धोरणे व कल्याणकारी योजना राबविताना अडचणी येतात. त्यामुळे ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जातनिहाय जनगणना अपरिहार्य आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.हा कार्यक्रम भारतीय पिछडा शोषित संघटन (नवी दिल्ली) व ओबीसी जनमोर्चा, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने २४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास काळे यांनी केले. त्यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जातनिहाय जनगणनेविषयीच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. 'स्मृती पर्व प्रक्रिया आणि मानवतावाद' या विषयावर डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी बीजभाषण केले, तर उपस्थितांचा परिचय मायाताई गोरे यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त व सलोखा पॅनलचे अध्यक्ष गोविंद चव्हाण होते. प्रमुख अतिथी म्हणून सुनीता काळे, अशोक मोहुरले, प्रा. दीपक वाघ, इं. दीपक बोरगामवार, देवराव जिपकाटे, विनोद इंगळे, प्रा. सविता हजारे आदी मान्यवर उपस्थित होते. नांदेडचे बी.पी.एस.एस. अध्यक्ष सतीश चंद्र शिंदे यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाखा येवतकर यांनी केले, तर राहुल पाचघरे यांनी आभार मानले. स्मृती पर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल उपस्थितांनी प्रशंसा केली.

## • वेचक

### माळेगांव सोसायटीच्या बँक प्रतिनिधी पदी मंगलाबाई राठोड यांची निवड



महागाव - माळेगांव ग्राम विविध सहकारी सोसायटी मधुन बँक प्रतिनिधी म्हणुन मंगलाबाई अमरसिंग राठोड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा बँकेवर प्रतिनिधी निवड करण्याची प्रक्रिया जिल्हाभर राबविण्यात आली असुन महागाव तालुक्यातील माळेगांव ग्राम विविध सहकारी सोसायटीच्या सभासदांमधून बँक प्रतिनिधी म्हणुन माजी सरपंच पवन राठोड यांच्या मातोश्री श्रीमती मंगलाबाई अमरसिंग राठोड यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष पवन राठोड, अमरसिंग रमणा राठोड ,अमोल भिकन चव्हाण ,बाबुसिंग जाधव ,आनंदा खामला ,प्रेम पवार ,श्रीकांत पवार ,सुनिल पाटिल, हिरूबाई कांबळे ,गंभिर चव्हाण, शिवदास अनखुळे, रवि राठोड ,सचिव शिंदे , सहाय्यक विजय माटाळकर डिगांबर राठोड यांच्यासह सभासद व संचालक उपस्थित होते.

### हिवरा ग्रा.प.येथे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंती निमित्त अभिवादन



महागाव - भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त महागाव तालुक्यातील हिवरा(सं) ग्रामपंचायत येथे अभिवादन करण्यात आले .यावेळी हिवरा ग्रामपंचायतचे उपसरपंच शरद पाटील, ग्रामपंचायत सदस्य राजू भाऊ धोतरकर. भारतीय जनता पार्टीचे सतीश सुभाषराव कदम, अभयजी बोंपीलवार, अनिलजी कदम, प्रशांत गांधी, चंद्रभानजी अडगे, गजानन कदम, सोशल मीडिया प्रमुख विकास कदम, अविनाश ठाकरेसह उपस्थित सर्व मान्यवरांनी हिवरा ग्रामपंचायत येथे माझी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली आहे.

### पुसद तहसीलदारपदी रेखा वाणी रूजू



पुसद - येथे २०२३ पासून कार्यरत असलेले तहसीलदार महादेव जोरवर यांची नागपूर येथे नुकतीच उपविभागीय अधिकारी पदी पदोन्नती झाल्यामुळे. त्यांच्या रिक्त जागी तहसीलदार म्हणून रेखा वाणी-मोहिते नव्याने नियुक्त होऊन रूजु झाल्या आहेत. त्यांनी २३ डिसेंबर २५ रोजी पदभार स्वीकारला आहे. पुसद तहसील कार्यालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच रेखा वाणी ह्या एक महिला तहसीलदार रुजू बरेच काळानंतर झाल्या आहेत पुसद येथे रुजू होताच तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांची त्यांनी बैठक घेऊन आपले कर्तव्य जबाबदारी पार पाडण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी दिल्या आहे.

### बोथबोडण येथे तरुणावर चाकुने प्राणघातक हल्ला

दारव्हा : तालुक्यातील लाडखेड पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या बोथ बोडण येथे चाकूने वार करून तरुणास गंभीर जखमी केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मनोज बक्षी चव्हाण (वय २९, रा. बोथ बोडण) यांनी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत, २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास फिर्यादीचा भाऊ नितीन बक्षी चव्हाण हा अमित राठोड याच्यासोबत घरात बसून असताना गावातीलच आरोपी गजानन मोहन पवार याने जोरजोराने आवाज देत नितीनला घराबाहेर बोलावले. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी लोकांमध्ये माझ्याबाबत काय बोलत होता, असा जाब विचारत आरोपीने जवळील चाकू काढून नितीन यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने पोटावर व हातावर वार केले.

# 'मशाल' विझण्यामागे कोण ? उबाठा पराभूत उमेदवारांचे नेतृत्वाला थेट प्रश्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**



**महायुतीत कार्यकर्त्यांचा वापर, नार्को टेस्टचीही मागणी**


यवतमाळ - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या नगर परिषद निवडणुकीतील पराभूत उमेदवारांनी मंगळवार, २५ डिसेंबर रोजी यवतमाळ येथील विश्रामगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत पक्षाच्या जिल्हास्तरीय नेतृत्वावर गंभीर आरोप करत राजकीय वादाला नवे वळण दिले. "मशाल पूर्णपणे विझवण्यामागे नेमकी कोणाची भूमिका आहे?" असा थेट आणि टोकदार सवाल उपस्थित करत, पराभवासाठी केवळ मतदार नव्हे तर अंतर्गत राजकारण जबाबदार असल्याचा आरोप उमेदवारांनी केला. या पत्रकार परिषदेत अतुल गुल्हाने (शहर प्रमुख), मनीष लोळगे, शुभम तोलवाणी, मंदाताई भिवंगडे, रवी राऊत, बाळू नाईक, श्रद्धा लोळगे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

उमेदवारांच्या मते, विधानसभा व लोकसभा निवडणुकांवेळी महायुतीच्या नावाखाली तीनही पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर वापरले गेले. मात्र नगर परिषद निवडणुकीत कार्यकर्त्यांचीच पाळी आली तेव्हा खासदार व आमदारांनी आपापले राजकीय हितसंबंध जपत त्यांना वाऱ्यावर सोडले. "नेत्यांची निवडणूक आली की सर्व एकत्र, आणि कार्यकर्त्यांची निवडणूक आली की 'तो त्याचा, हा माझा' असा भेदभाव का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पराभूत उमेदवारांनी पक्षातील काही वरिष्ठ पदाधिकारी, खासदांगर संजय देशमुख, जिल्हा प्रमुख किशोर इंगळे, जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड व नेते संतोष ढवळे यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी करत खळबळ उडवून दिली. महाविकास आघाडी जाहीरपणे अस्तित्वात असताना अचानक आघाडी का तुटली, निर्णय कोणी घेतले, याचे स्पष्ट उत्तर देण्याचीही मागणी करण्यात आली. पक्ष फंडाबाबतही तीव्र नाराजी व्यक्त करत, "एक रुपयाही फंड मिळाला नाही. प्रचारासाठी झेंडे देण्याइतकेही पैसे नव्हते, मग निवडणूक का लढवली?" असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. तसेच, खासदार जिल्ह्यातील असूनही एकाही प्रभागात 'मशाल' पेटली नाही, याची जबाबदारी कोणाची, असा सवाल उपस्थित झाला. दरम्यान, उमेदवारांनी लवकरच पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन संपूर्ण वस्तुस्थिती मांडणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या आरोपांवर संबंधित नेतृत्वाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली, तरी उबाठा गटातील ही उघड नाराजी आगामी राजकारणात अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र होण्याचे संकेत देत आहे.

# कोची कॉनवेल प्रकल्पातील नाला वळविल्याने शेतक-यांचे मोठे नुकसान

## ७ दिवसांत कार्यवाही न झाल्यास कुटुंबासह उपोषणाचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - कोची कॉनवेल प्रकल्पाच्या कामादरम्यान अधिकाऱ्यांनी व ठेकेदाराने नैसर्गिक नाल्याची दिशा बदलल्यामुळे एका शेतकऱ्याच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे.रामपूर (कारेगाव) ता.केळापूर येथील शेतकरी विजय फणीधर खापर्डे यांनी याबाबत उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, केळापूर यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज सादर केला असून,तातडीने दखल न घेतल्यास कुटुंबासह उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे.

अर्जात नमूद केल्याप्रमाणे, शिवणी व कोची गावाच्या शिवधुरावर पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणारा नैसर्गिक नाला कोची कॉनवेल प्रकल्पाच्या कामात अडथळा ठरत असल्याने तो जबरदस्तीने दक्षिणेकडून उत्तरेकडे वळविण्यात आला.हा नाला तसेच प्रकल्पातील अतिरिक्त पाणी थेट विजय खापर्डे यांच्या शेतात घुसल्याने कापूस पिकासह संपूर्ण शेती खरडून गेली.शेतातील सुपीक माती वाहून गेली असून,शेतामध्ये चक्क नवीन नालाच तयार झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे,नाला वळविण्यापूर्वीच संभाव्य धोक्याची माहिती संबंधित पाटबंधारे अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना देण्यात आली होती. "हा नाला दूरवरून मोठ्या प्रमाणात पाणी आणतो,त्याची दिशा बदलल्यास माझ्या शेताचे नुकसान होईल," अशी स्पष्ट सूचना देऊनही ती दुर्लक्षित करण्यात आली.ठेकेदाराच्या सुपरवायझरने पोकलँड मशिनच्या सहाय्याने नाल्याची दिशा बदलल्याचा आरोपही अर्जात करण्यात आला आहे.या प्रकरणी शेतकऱ्याने यापूर्वीही दोन वेळा अधिकृत अर्ज दिले आहेत. पहिला अर्ज २७ मे २०२५ रोजी,तर नुकसान झाल्यानंतर दुसरा अर्ज २९ ऑगस्ट २०२५ रोजी सादर करण्यात आला. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे.विजय खापर्डे यांनी आपल्या मागण्यांमध्ये नाल्याची मूळ दिशा पूर्ववत करून पश्चिम-पूर्व वाहत ठेवणे,झालेल्या शेती व पिकाच्या नुकसानीची भरपाई संबंधित अधिकारी व ठेकेदाराकडून मिळवून देणे,तसेच शेताची दुरुस्ती करून सुपीक माती टाकून देण्याची स्पष्ट मागणी केली आहे.सध्या शिवधुरावरील पुलाचे काम सुरू असल्याने,भविष्यात नुकसान आणखी वाढण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. अर्जाच्या शेवटी त्यांनी स्पष्ट इशारा दिला असून, येणाऱ्या ७ दिवसांत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यास केळापूर उपविभागीय कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषणास बसणार असल्याची नोंद घेण्याची विनंती केली आहे. या तक्रारीची प्रत राज्यातील वरिष्ठ राजकीय नेतृत्वासह विभागीय आयुक्त,जिल्हाधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनाही पाठविण्यात आली असून,प्रशासन आता या गंभीर प्रकरणात काय भूमिका घेते याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# 'सिखे'च्या माध्यमातून रंगले अभिनव गणितीय प्रदर्शन

## गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिनानिमित्त परसोडी (बु.) शाळेत आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - गणित हा विषय केवळ पुस्तकातून न शिकता तो कृतीतून शिकल्यास अधिक सोपा होतो, याचा प्रत्यय कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा परसोडी (बु.) येथे आला. भारतीय महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिनानिमित्त, जिल्हा परिषद शाळा परसोडी (बु) आणि 'सिखे' मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (२२ डिसेंबर) गणितीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रदर्शनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी केवळ गणिती उदाहरणे सोडवली नाहीत, तर 'सिखे' कार्यपुस्तिकेच्या आधारावर विविध संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून मांडल्या. शाळेच्या आवारात मोठी संख्यारेषा आखून विद्यार्थ्यांनी अपूर्णांकांची बेरीज प्रत्यक्ष उड्या मारत सादर केली. ही बेरीज संख्यारेषेवर नेमक्या बिंदूवर थांबून विद्यार्थ्यांनी स्पष्ट केली, तेव्हा उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे कौतुक केले. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्याचा वापर करून अनेक गणितीय संकल्पना स्पष्ट केल्या. साहित्याच्या मदतीने अंशाधिक अपूर्णांकांची बेरीज करून दाखवली. अपूर्णांकांचा लहान-मोठेपणा, फरक दृश्य स्वरूपात मांडला. झेंड्यावरील योग्य अपूर्णांक ओळखून त्यांच्या एकक अपूर्णांकासोबत जोड्या लावण्याचा रंजक खेळ विद्यार्थ्यांनी सादर केला. या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक मारोती बेलखेडे, 'सिखे'च्या टीआयपी उपक्रमातील शिक्षक विशाल हजारे, सरोज शेंडे, रेश्मा हजारे आणि माध्यमिक शिक्षिका प्रेमिला ठाकरे आदी उपस्थित होते. इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात उत्साहाने सहभाग नोंदवला. 'सिखे'च्या कार्यपुस्तिकेमुळे विद्यार्थ्यांमधील गणिताची भीती कमी होऊन आवड निर्माण होत आहे. विद्यार्थ्यांनी केवळ उदाहरणे मांडली नाहीत, तर स्वतः कृती करून संकल्पना समजावून सांगितल्या, हे खूप प्रशंसनीय आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, अशी प्रतिक्रिया यावेळी मुख्याध्यापक मारोती बेलखेडे यांनी दिली. गणित हा विषय रंजक आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाप्रतीही ओढ निर्माण झाली असे शिक्षकांनी सांगितले. 'सिखे'चे जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे, सहायक जिल्हा व्यवस्थापक नितीन पखाले यांच्या मार्गदर्शनात 'सिखे' कोच चेतन जाधव यांनी शाळेतील शिक्षकांसह प्रदर्शनासाठी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे परसोडी येथील जिल्हा परिषद शाळेचे आणि 'सीखे' संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराच्या निषेधार्थ आंदोलन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : बांगलादेश येथे हिंदू समाजावर होत असलेल्या कथित अत्याचारांच्या निषेधार्थ यवतमाळ शहरात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने बुधवारी (दि. २४ डिसेंबर) सायंकाळी दत्त चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी आतंकवाद्यांचा पुतळा दहन करून बांगलादेश सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

बांगलादेशमध्ये १८ डिसेंबरच्या रात्री हिंदू युवक दीपू चंद्र दास याची हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. इस्लामचा अपमान केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता. या घटनेनंतर भारतासह विविध ठिकाणी या हत्येच्या निषेधार्थ आंदोलनांचा सूर उमटत आहे. याच पार्श्वभूमीवर यवतमाळ येथील हिंदू संघटनांनी निषेध आंदोलन करून बांगलादेशातील परिस्थितीचा तीव्र शब्दांत निषेध केला. आंदोलनादरम्यान बोलताना विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सेवा प्रमुख राम लोखंडे यांनी सांगितले की, बांगलादेशात सत्ता परिवर्तनानंतर हिंदू समाजावर सातत्याने अत्याचार होत असून तेथे हिंदूंच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करण्यात शासन अपयशी ठरत आहे. बांगलादेशातील हिंदूंना तात्काळ सुरक्षा पुरवावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र राज्याची मागणी विचारात घ्यावी, तसेच भारत सरकारने बांगलादेश सरकारवर आंतरराष्ट्रीय दबाव निर्माण करावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच बांगलादेशशी असलेले राजनैतिक संबंध व आर्थिक देवाण-घेवाण यावर निर्बंध घालण्याचीही मागणी करण्यात आली. या आंदोलनात सकल हिंदू समाजातील नागरिकांसह मोठ्या संख्येने महिला, विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलन शांततेत पार पडले असून परिसरात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# गॅसच्या तुटवड्यामुळे ग्राहकांच्या सिलेंडर घेण्यासाठी लागल्या भल्या पहाटे रांगा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - शहरात एच.पी घरगुती गॅस सिलिंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, त्यांना एका सिलिंडरसाठी ३५० रुपये अधिक मोजावे लागत आहेत.८९४.५० रुपयांच्या सिलिंडरसाठी १२५० ते १३०० रुपयांना खरेदी करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. शहरामध्ये एच.पी गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने काळा बाजारात घरगुती गॅस सिलेंडर साठी २ हजार रुपये सुद्धा मोजावे लागत आहे.सिलेंडर घेण्यासाठी उमरखेड रोडवरील गोडाऊनवर आज २५ डिसेंबर पहाटेपासूनच गॅस सिलेंडर खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहे.

नागरिकांच्या तक्रारीनुसार, शहरात दोन गॅस एजन्सीज आहेत, परंतु दोन्ही वितरकांकडून वेळेवर सिलिंडर मिळत नाहीत. गेल्या १५ दिवसांपासून गॅस पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. या परिस्थितीचा फायदा घेत काही ठिकाणी काळाबाजार सुरू आहे.मात्र अन्नपुरवठा प्रशासन या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांची सर्रास लूट होत आहे. शहरांना दोन गॅस एजन्सींमार्फत एच.पी. गॅसचा पुरवठा केला जातो. उमरखेड रोडवरील प्लॉटमध्ये असलेल्या गोडाऊन वरून गॅस सिलिंडरचा पुरवठा होत असतांनाही एवढ्या मोठ्या प्रमाणात अनियमितता कशी निर्माण झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी यावर अद्याप ठोस भूमिका घेत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढला आहे.दि.२५ डिसेंबर २०२५ रोजी उमरखेड रोडवरील एचपी गॅस गोडाऊन वर नागरिकांनी विदेश म्हणजे महिलाही मोठ्या प्रमाणात भल्या पहाटे सिलेंडर मिळेल म्हणून तासंतास उभ्या राहून लांबच लांब रांगा लागल्या होत्या. परंतु त्या ठिकाणी सिलेंडरचे गाडी न आल्यामुळे नागरिक संतापले होते. सकाळपर्यंत ग्राहक व वितरकामध्ये बाचाबाची देखील झाली होती. त्यामुळे तहसीलदार कार्यालयातील अन्नपुरवठा विभागाने तात्काळ लक्ष देऊन तुटवडा दूर करावा अशी मागणी गॅस ग्राहकाकडून होत आहे.

बजाज एच.पी गॅस एजन्सी धारकांनी जेवढी आवक दररोज सिलेंडरची येत आहे तेवढ्याच एजन्सी द्वारे पावत्या देऊन ग्राहकांना वाटप केले पाहिजे, परंतु बजाज एजन्सी कडून जी रोज सिलेंडरची येणारी आवक आहे त्यापेक्षा दुप्पट-तिप्पट पावत्या वाटप करून भल्या पहाटे सकाळी ग्राहकांनी गॅस तुटवड्यामुळे पुसद-उमरखेड रोड वर असलेल्या बजाज गॅस एजन्सीच्या गोडाऊन वर लांबच लांब रांगा लावल्यामुळे एच.पी. एजन्सीच्या विरोधात ग्राहकाकडून ओरड सुरू होती. शासनाच्या व अन्नपुरवठा विभागाच्या नियमानुसार गॅस सिलेंडर हे पावतीची रक्कम घेऊन घरपोच देणे अनिवार्य आहे, किंवा ग्राहकाने स्वतः गोडाऊनवरून नेल्यास त्यांना गॅस एजन्सी कडून वीस रुपये परत करावे लागतात किंवा कमी घ्यावे लागतात असा नियम आहे. परंतु हे नियमाला डावलून ग्राहकाकडून पूर्ण पैसे पावतीचे घेऊन त्यांना शहरा पासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या गॅस गोडाऊन येथुन सिलेंडरचे वाटप करीत आहे आणि पैशाची सुद्धा लूट करीत आहेत.

# विविध मागण्यांसाठी बाभूळगाव संघर्ष समिती आक्रमक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव : बाभूळगाव संघर्ष समितीच्या सदस्यांवर नगर पंचायतच्या मुख्याधिकारी डॉ. पी.एस. सोटे यांनी दाखल केलेले खोटे गुन्हे त्वरीत मागे घेण्यासोबतच विविध मागण्यांसाठी दि. 26 डिसेंबर रोजी बाभूळगाव शहर बंदचे आयोजन करण्यात आले आहे. येथील मुख्याधिकारी यांच्या मनमानी कारभाराविरोधात बाभूळगाव संघर्ष समिती आक्रमक असून या संबंधीचे निवेदन तहसिलदार, पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले.

येथिल नगर पंचायतच्या सभागृहात दि. 23 डिसेंबर रोजी मुख्याधिकारी डॉ. पी.एस. सोटे यांनी वाढीव कर आकारणी आक्षेपाबाबत सुनावणी ठेवून शहरातील मालमत्ता धारकांना नोटिसी बजावल्या होत्या. त्यानुसार सकाळी 11 वाजता पासून शहरातील मालमत्ता धारक, त्यांचे प्रतिनिधी नगर पंचायत सभागृहात मोठ्या संख्येने उपस्थित होते. परंतु त्यांनतर मुख्याधिकारी डॉ. पी.एस. सोटे यांनी बाभूळगाव पोलीस स्टेशनमध्ये जावून बाभूळगाव संघर्ष समितीचे सदस्य नगर सेवक अभय तातेड, धरमचंद छल्लाणी व इतर काही नागरिकांविरूध्द रिपोर्ट देवून गुन्हे दाखल केले. मात्र सदरची तक्रार खोटी व दिशाभूल करणारी असून जाणिवपुर्वक करण्यात आली, असा आरोप करीत बाभूळगाव संघर्ष समितीच्या सदस्यांनी तहसिलदार, पोलीस निरीक्षक यांना निवेदन दिले. शहराच्या विकासासाठी, नागरिकांसाठी काम करत असताना विनाकारण गुन्हे दाखल करणे, शहरात मनमानी कारभार चालविणे, नगर पंचायत मधील गैरप्रकारांना मुक संमती देणे, शहरात राजकारण करणे, आदी कारणांमुळे वादग्रस्त ठरलेल्या मुख्याधिकारी यांचे विरोधात दि. 26 रोजी शहर बंदची हाक संघर्ष समितीने दिली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### संभा महाराज जन्मोत्सव



**बेलोरा-**चिंचोली काळे येथील श्री संभा महाराज जन्मोत्सवानिमित्त कथा प्रवक्ता श्री शिवदास महाराज हिरुळकर यांच्या मधुर वाणीतून २५ डिसेंबर पासून सुरुवात झाली आहे.तीर्थस्थान चरित्र ग्रंथ हरिपाठ भजन दैनिक कार्यक्रम घेत आहे. काल्याचे किर्तन ह भ प श्री निवृत्ती महाराज राहील. कार्यक्रमाचा लाभ गावकऱ्यांनी घ्यावा असे संस्थांचे अध्यक्ष सुभाष तायडे यांनी कळविले आहे.



### लायन्स अमरावती इंद्रपुरीला तीन पुरस्कार प्रदान

**अमरावती-**लायन्स क्लब ऑफ अमरावती इंद्रपुरीचे अध्यक्ष भाऊलाल इंदाने यांच्या मार्गदर्शनात १९२५-२६ सत्रातील प्रांतपाल योद्धा सन्मान सेरेमनी नागपूर येथे तीन सन्मानाने पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अन्नदान सेवा क्षेत्रातील कार्याबद्दल अन्नपूर्णा सेवा रत्न पुरस्कार मानसिक स्वास्थ्यातील कार्याबद्दल विविध ठिकाणी लायन्स सदस्य डॉ. राजू डांगे यांच्या भाषणांसाठी व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोविंद कासट यांच्या प्रयत्नांसाठी मेंटल हेल्थ मानस शक्ती सोशल अवार्ड व आपले कार्यक्रम लोकाभिमुख व्हवेत यासाठी वृत्तपत्रातून केलेल्या प्रयत्नांसाठी विविध बातम्यांच्या कात्रणाचा सादरीकरणासाठी स्क्रॅप बुक अवार्ड हे तीन सन्मान आहे पुरस्कार नुकतेच नागपूर येथे हॉटेल गोत्रा खैरी येथे झालेल्या समारंभात प्राप्त झाले.अध्यक्षस्थानी प्रांतपाल डी.जी भलगत तर मंचावर माजी प्रांतपाल डॉ. नवल भूत रीजन चेअरमार्फत राजा किंगराणी सर्विस वीक चेअर पर्सन दिनेश अग्रवाल माजी प्रांतपाल रिपन राणे डॉ. निखिल जैन यांचे उपस्थिती होती. बक्षिसांचा स्वीकार लॉयन्स इंद्रपुरी अध्यक्ष भाऊलाल इंदाने सचिव प्रकाश तराळे कोषाध्यक्ष अड. प्रशांत देशमुख झोन चेअर पर्सन हरप्रीतसिंग सलुजा यांनी केला.या यशाचे श्रेय भाऊलाल इंदाने यांनी आपले सहकारी चमक व सदस्यांना तसेच विशेष करून डॉ.गोविंद कासट यांना दिले.



### श्री संत जगनाडे महाराजांच्या प्रतिमेचे वितरण

**धामणगाव रेल्वे-**तालुक्यातील सोनेगाव खर्डा येथे तेली समाज उत्सव समितीतर्फे संत श्री संताजी जगनाडे महाराजांच्या प्रतिमांचे वितरण करण्यात आले. ''हर घर संताजी' या उपक्रमांतर्गत सर्व गावातील तेली समाज बांधवांना प्रतिमेचे वितरण करण्यात आले.सोनेगाव खर्डा तेली समाज उत्सव समितीतर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. संत श्री संताजी जगनाडे महाराजांचा जयंती उत्सव साजरा करण्यात येतो. तसेच गावात तेली समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी संत श्री संताजी महाराजांच्या जयंती निमित्त सर्व गावातील तेली बांधवांच्या घरोघरी श्री संत जगनाडे महाराज यांचे फोटो वाटप करण्यात आले. यावेळी कृष्णा बोडणे गोपाल रघुते, योगेश सावरकर, सुमीत रघूते, भूषण शेलोकार, प्रदीप बोडणे, सूरज बोडणे, राहुल बोडणे, शुभम शेलोकार, तेजस वैद्य, हरी गभणे, लोकेश सावरकर, मंथन सावरकर, प्रविण पिसे आदी उपस्थित होते.

# ‘करिअर कट्टा’ उपक्रमात राज्यस्तरीय सुयश



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

संपूर्ण राज्यभर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा करिअर कट्टा हा नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध नाविन्यपूर्ण व विद्यार्थ्याभिमुख उपक्रम तसेच स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.या उपक्रमांतर्गत विद्यार्थी करिअर संसद उपक्रमामुळे शहरी भागासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचाही सर्वांगीण विकास साधला जात आहे. या उपक्रमात राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे येथील विद्यार्थी करिअर संसद सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

राज्यभरातून उत्कृष्ट करिअर संसद पदाधिकारी म्हणून एकूण पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनी सानिया शेख हिची निवड झाली आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिला २५ हजार रुपये रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.तसेच दिल्ली येथील प्रशासकीय सेवेत कार्यरत अधिकाऱ्यांच्या मुलाखतींसाठी आयोजित ‘नजरेसमोर राष्ट्र आणि हृदयात महाराष्ट्र’ या उपक्रमातही तिची निवड झाली होती. या निमित्ताने दिल्ली येथे अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व सादर करण्याची संधी तिला मिळाली.याशिवाय साक्षी जिचकार व प्रतीक्षा पाटणे या विद्यार्थिनींनीसुद्धा राज्यस्तरावर महाविद्यालयाची ओळख निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. करिअर संसदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या संपूर्ण उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी केली असून, महाविद्यालयातर्फे सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.यशाचे श्रेय सानिया शेख हिने आपल्या पालकांना, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर, करिअर कट्टा समन्वयक प्रा. ममता पळसपगार तसेच संपूर्ण करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांना आणि महाविद्यालयाला दिले आहे.

# सीसीआय कापसाच्या पैशांवर बँकांचा डल्ला?

## कर्जवसुली थांबविण्याची शिवसेना (उबाठा)ची मागणा,शेतकऱ्यांमध्ये असंतोष

**खल्लार/वार्ताहर**

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत कापूस विक्री केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी रक्कम थकीत कर्जाच्या नावाखाली थेट कर्ज खात्यात वर्ग केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. शेतकऱ्यांचे आधार कार्ड ज्या बँकेत लिंक आहे, त्या बँकांकडून परस्पर कर्जवसुली केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे.



याच पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी अमरावती तसेच जिल्हा व्यवस्थापक, अग्रणी बँक अमरावती यांच्याशी थेट चर्चा करून निवेदन सादर केले.कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी सीसीआयची रक्कम, शेतकरी अनुदान किंवा इतर कोणतेही शासकीय पैसे बँकांनी परस्पर कर्ज खात्यात वर्ग करू नयेत, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. यानंतरही जर कोणत्याही बँकेने अशी वसुली केली, तर संबंधित बँक अधिकाऱ्याला ‘शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ’ असा स्पष्ट इशाराही युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पैसे कर्ज खात्यात वर्ग केल्यानंतर ते परत देण्यास बँक टाळाटाळ करत असल्यास, अशा पीडित शेतकऱ्यांनी थेट संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासन व बँकांनी तात्काळ स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी केली जात आहे.

## खंजिरी वादक पवनपाल महाराज यांचा कीर्तनाचा कार्यक्रम

**खल्लार -** आदर्श गाव सांगवा बु येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत श्री संत गाडगे महाराजांच्या पुण्यतिथी सोहळा आयोजित केला असून त्या निमित्ताने विशेष जनजागृती कार्यक्रमांमध्ये सत्यपाल महाराजांचे शिष्य पवनपाल वडाळीकर यांचा समाज प्रबोधनचा कार्यक्रम २७ डिसेंबरला शनिवार सायंकाळी सात वाजता जिल्हा परिषद शाळेसमोरील मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला परिसरातील सर्व ग्रामस्थांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन सरपंच राजू पाटील कराळे तासे चा उपसरपंच, ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य सांगवा यांनी



प्रसिद्धी पत्रकार केले आहे.

## थांग-ता मार्शल आर्ट राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ आसामला रवाना



### परतवाडा येथील दोन खेळाडूंचा समावेश

**अचलपूर/वार्ताहर**

थांग ता फेडरेशन ऑफ इंडिया व आसाम थांग ता असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३१वी राष्ट्रीय जुनिअर थांग-ता मार्शल आर्ट चॅम्पियनशिप २०२५ गुवाहाटी (आसाम) येथील कर्मवीर नदीमचंद्र इनडोअर स्टेडियम मधे २२ ते २६ डीसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील संघ व्यवस्थापक रूपाली जहागिरदार सह निवड झालेल्या ३० खेळाडूंचा संघ भुसावळहुन रवाना झाला आहे. संघामध्ये अमरावती, सातारा, सांगली, रायगड, मुंबई शहर, ठाणे गोंदीया, नाशिक ,छ.संभाजीनगर व इतर जिल्ह्यातील खेळाडूंची निवड झाली आहे. तत्पूर्वी १६ ते १८ डीसेंबर रोजी अमरावती येथे ऑल महाराष्ट्र थांग ता असोसिएशन तर्फे निवड झालेल्या सर्व खेळाडूंचा स्पर्धा पूर्व तीन दिवसीय प्रशिक्षण सातारा वळुज येथे घेण्यात आले.सदर खेळाडूंना राज्य संघटनेचे अध्यक्ष मुकुंद धुलधर, पदमश्री प्रभाकर रावजी वैद्य, माधुरी चेंडके, राजेश महात्मे, सी ए. वृंदा अट्टल, संतोष महात्मे,आ.प्रविण तायडे, माजी आ. बच्चू कडू, मा.खा.नवनित राणा, आ. केवलराम काळे, सुरेखा ठाकरे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी अमरावती, क्रीडा उपसंचालक तसेच जिल्हा संघटनेतील सर्व पदाधिकारी पालक वर्ग यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

# आ.प्रविण तायडे यांच्या अध्यक्षतेखाली शेत पाणंद रस्त्यांच्या कामांचा आढावा

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर विधानसभा मतदारसंघातील पाणंद रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.



या बैठकीस अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, राजस्व विभागाचे अधिकारी, अचलपूर चे गटविकास अधिकारी सुधीर अरबट,चांदूर बाजार पंचायत समिती गटविकास अधिकारी ,तहसीलदार अचलपूर व चांदूरबाजार, वन विभाग,पोलीस प्रशासन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता अभयकुमार बारब्दे,आणि विविध विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.तसेच शेतकरी बांधव आणि भाजपाचे रुपेश ढेपे,विशाल काकड ,तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे,प्रफुल बर्वे,प्रसन्न काठोले आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीदरम्यान पांदन रस्त्यांची सद्यस्थिती, प्राधान्याने करावयाची कामे आणि निधी विषयक मुद्द्यांवर सविस्तरचर्चा करण्यात आली.या बैठकीत शेतीमाल वाहतुकीत येणाऱ्या अडचणी तत्काळ दूर करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रवीण तायडे म्हणाले की,‘पुढील काळात एकही शेतकरी रस्त्याविना वंचित राहणार नाही.प्रत्येक शेतकऱ्याच्या दळण–वळणाचा मार्ग मोकळा होईल आणि शेतीमाल वाहतुकीसाठी पांधन रस्ते मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.या बैठकीत मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना अंतर्गत प्रलंबित रस्ते तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधित विभागांना आ.प्रवीण तायडे यांनी सूचना दिल्या.विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना समन्वयाने आणि दर्जेदार पद्धतीने काम पूर्ण करण्याचे निर्देश ही आ.प्रवीण तायडे यांनी दिले.

# सुसंवाद हा साहित्याचा आधारस्तंभ व संसाराचाही-संजीवनी तडेगावकर

## ‘आमने-सामने’ प्रकट मुलाखतीत विचारसंवाद

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,मुंबई यांच्या अनुदानाने,परिवर्तन प्रबोधिनी अमरावती, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स,अमरावती व दिलीप फाउंडेशन, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिसरे अमरावती जिल्हा परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन ‘शोध प्रतिभेचा वेध:परिवर्तनाचा’अंतर्गत आमने सामने प्रकट मुलाखत हा विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका, संपादक, वाङ्मयीन चळवळीतील अग्रगण्य कार्यकर्त्या व स्त्रियांच्या सामाजिक प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणाऱ्या डॉ. संजीवनी तडेगावकर (जालना) यांची सखोल व विचारप्रवर्तक मुलाखत घेण्यात आली.ही मुलाखत सुप्रसिद्ध कवयित्री, साहित्यिक, अभ्यासक व परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलनाच्या मुख्य आयोजक डॉ. शोभा रोकडे (अमरावती) यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व संवेदनशील पद्धतीने घेतली. साहित्यिक जाणिवा, सामाजिक भान आणि संवादकौशल्य यांच्या आधारे त्यांनी मुलाखतीला



वैचारिक उंची प्राप्त करून दिली. मुलाखतीदरम्यान डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी कविता कशी जन्माला येते, कविता लिहिताना अनुभव, संवेदना, समाजभान व स्त्रीदृष्टीचे महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कविता ही केवळ शब्दांची रचना नसून ती जीवनानुभवांची प्रामाणिक अभिव्यक्ती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवोदित लेखक-कवींनी सातत्याने वाचन, निरीक्षण व आत्मपरीक्षण करावे, असा मौलिक सल्लाही त्यांनी दिला.साहित्य, समाज व परिवर्तन यांचा सखोल विचार मांडणारा हा संवाद साहित्यप्रेमींना प्रेरणा देणारा ठरला.कार्यक्रम साहित्यप्रेमींसाठी एक आनंददायी व चिंतनशील अनुभव ठरला आहे, ज्यातून पुढील साहित्यिक पिढीसाठी नवे मार्ग व प्रेरणा मिळाली.

# खुनाच्या गुन्ह्यातून रोशन केवदे यांची निर्दोष मुक्तता

## ॲड. शिरीष जाखड व ॲड. संदेश मेश्राम यांचा युक्तिवाद ठरला निर्णायक

**अमरावती/का.प्र.**

अंजनगाव बारी येथील खुनाच्या गंभीर गुन्ह्यात आरोपी म्हणून अटक करण्यात आलेल्या रोशन केवदे (वय २२) यांची जिल्हा व सत्र न्यायालय, क्रमांक १, अमरावती यांनी निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपीच्या वतीने ॲड. शिरीष जाखड व ॲड. संदेश मेश्राम यांनी केलेला अभ्यासपूर्ण, सखोल आणि प्रभावी युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत आरोपीस दोषमुक्त ठरवले.

मृतक मुरलीधर किसनराव नांदणे (वय ४५) हे कौटुंबिक कारणांमुळे मागील सुमारे दहा वर्षांपासून आपल्या कुटुंबीयांपासून वेगळे राहत होते. मात्र अधूनमधून ते नातलगांना भेटण्यासाठी गावाकडे येत असत. घटनेच्या काही महिन्यांपूर्वी ते दहीगाव पूर्णा येथे कुटुंबीयांना भेटण्यासाठी आले होते. मृतकाची दुरच्या नात्यातील मावशी प्रमिला मनोहरराव केवदे या अंजनगाव बारी येथे राहत होत्या. त्या पायाने अंपग असून त्यांचा मुलगा रोशन केवदे त्यांची काळजी घेत असे. त्यामुळे फिर्यादीसह अनेकांना रोशन केवदे परिचित होते.

२४ जून २०२२ रोजी सायंकाळच्या सुमारास मुरलीधर नांदणे हे प्रमिला केवदे यांच्या घरी आले होते. त्यावेळी त्यांनी दारू सेवन केले होते, अशी माहिती फिर्यादीत नमूद आहे. त्यावेळी घरात वाद निर्माण झाला. या वादातून रोशन केवदे याने लाकडी काठीने डोक्यावर वार करून तसेच मारहाण करून मुरलीधर यांचा खून केल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेनंतर पोलीस पाटलामार्फत माहिती मिळाल्यानंतर फिर्यादीने तातडीने अंजनगाव बारी येथे धाव घेतली. पुढे पोलीस स्टेशन बडनेरा येथे तक्रार दाखल करण्यात आली.

तक्रारीवरून पोलीसांनी कलम ३०२ भा.द.वि. अंतर्गत गुन्हा नोंदविला. तपास पूर्ण करून आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आणि सत्र प्रकरण क्रमांक २८२/२०२२ नोंदविण्यात आले. खटल्याच्या सुनावणीत सरकार पक्षाकडून एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. मात्र साक्षीदारांच्या जबाबांमध्ये विसंगती, घटनास्थळावरील परिस्थितीबाबत स्पष्टता नसणे आणि आरोपीविरोधात थेट व ठोस पुराव्याचा अभाव या बाबी बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या.

ॲड. शिरीष जाखड व ॲड. संदेश मेश्राम यांनी तपासातील त्रुटी, वैद्यकीय पुरावे आणि साक्षीदारांच्या कथनातील विरोधाभास यांचा सखोल अभ्यास करून युक्तिवाद मांडला. या सर्व बाबींचा विचार करून न्यायालयाने आरोपीविरोधात गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नसल्याचे स्पष्ट केले. परिणामी, रोशन मनोहरराव केवदे यांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.या निकालानंतर केवदे कुटुंबीयांमध्ये समाधानाचे वातावरण असून, न्यायालयीन प्रक्रियेत तथ्य व पुराव्याला दिलेले महत्त्व अधोरेखित झाले आहे. सदर प्रकरणामुळे केवळ आरोपांवर नव्हे तर ठोस पुराव्यावरच दोष सिद्ध होतो, हा न्यायाचा मूलभूत सिद्धांत पुन्हा अधोरेखित झाला आहे.

## छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयाचे यश



**आसेगाव पूर्णा-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन पुरुष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयाने सर्वप्रथम दोन संघावर मात करून उप उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला त्यानंतर उप उपांत्य फेरीत डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती संघावर एकतर्फी ३५-१६ व ३५-१९ अश्या सरळ दोन सेट मध्ये विजयी होऊन उपांत्य फेरीत प्रवेश केला त्यानंतर शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती संघावर सुद्धा सरळ दोन सेट मध्ये मात करीत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला, अंतिम फेरीमध्ये श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती संघावर ३५-२९, ३५-३२ अश्या सरळ दोन सेट मध्ये मात केली. विजयी संघामध्ये सौरभ राखोंडे, स्वराज बरगट, भूषण गायगोले, प्रफुल पचारे, गौरव राजस, ओम पांडे, क्रिश अंभोरे, वेदांत मेमनकर, सुहास मावस्कर व अर्जुन यादव यांचा समावेश होता. संघातील विजयी खेळाडूंनी आपल्या या दैदिप्यमान यशाचे श्रेय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू, संस्थेचे सचिव भैयासाहेब कडू, कार्यकारी प्राचार्य डॉ. रवींद्र इचे, प्रशिक्षक डॉ. हरीश काळे, अशोक बिजवे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिले आहे.

# महावितरणचे नाते प्रत्येक कुटुंबाशी घट्ट-दीपक देवहाते

**अमरावती/का.प्र.**

महावितरणचे नाते प्रत्येक कुटुंबाशी घट्ट जोडलेले आहे. वीजपुरवठा खंडित झाला की दिवस-रात्र न पाहता कर्मचारी तत्काळ कर्तव्यावर हजर होतात. कोणतीही तक्रार न करता सेवा देणाऱ्या कर्मचा-यांना कामातून विरंगुळा मिळावा, या उद्देशाने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी केले.

अमरावती शहर विभागात आयोजित महावितरणच्या मनोरंजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंते राजेश घाटोळे, प्रफुल्ल लांडे तसेच मोर्शी येथील कार्यक्रमात विजयकुमार कासट उपस्थित होते. विजेसारख्या क्षमाशून्य क्षेत्रात काम करताना ताण-तणाव कमी व्हावा आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता अधिक वाढावी, यासाठी मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली



अमरावती परिमंडळात विभागनिहाय मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सुरक्षेची शपथ घेऊन सुरू झालेल्या या सोहळ्यात सुरूवातीला महावितरण अधिकारी, कर्मचारी यांच्या जबाबदाऱ्या आणि उद्धीष्ठांवर प्रकाश टाकण्यात आला. त्यानंतर रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिरासह विविध मनोरंजनात्मक उपक्रम राबविण्यात आले. खेळातील चुरस, कराओकेच्या संगीताची साथ आणि कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण वातावरण आनंदी झाले आणि कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा मिळाली.यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते म्हणाले की, महावितरणचे कर्मचारी उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. एका महिन्यात सर्वाधिक सौर कृषीपंप बसवण्याच्या कामाची नोंद नुकतीच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये झाली असून, या विक्रमात सर्व कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. कर्मचाऱ्यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबियांचेही मोठे योगदान आहे. त्यामुळे वीज यंत्रणेवर काम करताना अतीआत्मविश्वास न बाळगता सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, कुटुंबाला तुमची गरज आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

# मतभेद बाजूला सारून शहराच्या हितासाठी काम करणार-हेमंत देशमुख

**अमरावती/का.प्र.**

मतभेद बाजूला सारून शहराच्या हितासाठी काम करण्याचा संकल्प सर्व पक्षांनी व्यक्त केला असून आगामी काळात संयुक्तपणे जनतेशी संवाद वाढविणार असल्याचे संकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) प्रा. हेमंत देशमुख यांच्यासह उपस्थीत इतर पक्षाच्या मान्यवरांनी पत्रकार परिषदेत दिले.

अमरावती महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकां च्या पक्षांनी एकत्र येत राजकीय मैदानात उतरायचा ठाम निर्धार जाहीर केला आहे. अमरावतीतील राष्ट्रवादी पक्ष (शरदचंद्र पवार) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक, अखिल भारतीय फॉरवर्ड ब्लॉक तसेच रिपब्लिकन पक्ष (खोरिपा गट) यांनी संयुक्त आघाडी करून निवडणूक लढण्याचा निर्णय घेतल्याने शहराच्या राजकारणात नवी घडामोड घडली आहे. आयोजित पत्रकार परिषदेत या निर्णयाची सविस्तर माहिती देण्यात आली.

या संयुक्त आघाडीमागील प्रमुख उद्देश भारतीय संविधानाचे बळकटीकरण, लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि अमरावती महानगरपालिकेचा सर्वांगीण व संतुलित विकास साधणे हा असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

व्यक्तिकेंद्रित किंवा सत्ताकेंद्रित राजकारणाऐवजी नागरिकांच्या दैनदिन प्रश्नांवर आधारित विकासाभिमुख भूमिका घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. महापालिकेच्या कारभारा त पारदर्शकता, जबाबदारी आणि लोक सहभाग वाढवण्यावर भर देण्यात येणार असल्याचेही नेत्यांनी सांगितले.

संयुक्त आघाडीच्या वतीने शहरासाठी स्वतंत्र व ठोस विकास आराखडा तयार करण्यात येत असून तो लवकरच जनतेसमोर मांडण्यात येणार आहे. या आराखड्यात पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, वाहतूक नियोजन, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच रोजगारनिर्मिती यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. निवडणूक हे केवळ सत्ताप्राप्तीचे साधन न मानता, शहराच्या दीर्घकालीन हितासाठी सक्षम आणि संवेदनशील प्रशासन उभे करण्याचा या आघाडीचा मानस असल्याचे स्पष्ट करण्यात आले.




**महानगरपालिका निवडणुकीत विरोधी पक्ष एकवटले**

विविध विचारसरणीचे पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवणार असल्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीतील राजकीय समीकरणे बदलण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकसंघ विरोधी शक्ती उभी राहत असल्याने सत्ताधारी पक्षांसमोर कठीण आव्हान निर्माण होणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आह.शहरातील नागरिकांमध्ये असलेली बदलाची अपेक्षा आणि विकासाची गरज लक्षात घेताही संयुक्त आघाडी निर्णायक ठरू शकते असेही सांगण्यात येत आहे.

या निर्णयाची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्याकरिता माध्यमांनी सहकार्य करावे अशी विनंती केली आहे.

मतभेद बाजूला करून शहराच्या हितासाठी काम करण्याचा संकल्प सर्व पक्षानी व्यक्त केला असून आगामी काळात संयुक्तपणे जनतेशी संवाद वाढवण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

पत्रकार परिषदेला भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. सुनिल घटाळे , निळकंठ ढोके,कॉ. जयेंद्र भोगे, कॉ. उमेश बनसोड,नंदकिशोर काळमेघ, सचिन मुंदाणे, निरंजन कठाने, स्वप्नील नवले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) प्रा. हेमंत देशमुख, मंगेश भटकर, निखील देशमुख, सैय्यद मंसुर, विशाल बोरखडे, डॉ. अभिजित पवार,प्रा.क्रांती महाजन,सुनील ठोसर,ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक बाळासाहेब कोराटे तसेच रिपब्लीकन पक्षाचे (खोरिपा) पंजाबराव रामटेके, सुरेश दहिकर, अॅड. दिलीप घरडे, धनराज कावरे आदि उपस्थित होते.

# महानगरपालिकेत निवडणूक तयारीचा सखोल आढावा

**अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांची विविध विभागांना भेट व सूचना**

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी महानगरपालिकेतील निवडणूक विषयक कामकाजाची सखोल पाहणी केली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सज्ज राहावे, या उद्देशाने ही पाहणी करण्यात आली.

या पाहणीदरम्यान महानगरपालिकेतील माहिती कक्ष, निवडणूक विभाग, भांडार विभाग तसेच नगरसचिव विभाग येथे सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक विभागातील कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करताना त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून निवडणूक संदर्भातील तयारी, कागदपत्रांची स्थिती, मनुष्यबळ नियोजन तसेच आवश्यक साहित्याबाबत माहिती जाणून घेतली.माहिती कक्षामध्ये निवडणूक संदर्भातील माहिती संकलन,नोंदी व तांत्रिक तयारीची पाहणी करत त्यांनी माहिती वेळेत व अचूक उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. निवडणूक विभागात मतदार यादी, कर्मचारी नेमणूक, प्रशिक्षण व निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत चर्चा करण्यात आली. भांडार विभागामध्ये निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले साहित्य, उपकरणे व इतर साधनसामग्री उपलब्धतेची तपासणी करण्यात आली. निवडणूक काळात कोणत्याही प्रकारची कमतरता भासू नये, यासाठी आधीच योग्य नियोजन करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी दिले.नगरसचिव विभागात निवडणूक संबंधित अधिसूचना,पत्रव्यवहार व कायदेशीर बाबींचा आढावा घेण्यात आला. सर्व कामकाज नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार पार पाडले जावे, तसेच सर्व नोंदी अद्ययावत ठेवण्यात याव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले.कोणतीही त्रुटी किंवा विलंब होऊ नये यासाठी जबाबदारीने काम करण्यावर त्यांनी भर दिला.

या पाहणीमुळे अमरावती महानगरपालिकेतील निवडणूक तयारीला अधिक गती मिळणार असून प्रशासन अधिक सक्षमपणे निवडणूक प्रक्रिया राबविण्यास सज्ज असल्याचे चित्र यावेळी दिसून आले.या पाहणी दरम्यान शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, नगरसचिव संदिप वडुरकर, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

**बनावट वैद्यकीय व इतर प्रमाणपत्रांद्वारे**

# निवडणूक कर्तव्यातून सुट मागणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महानगर पालिकेसह अमरावती महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची घोषणा केल्यानंतर निवडणूक प्रक्रियेसाठी मतदान केंद्रनिहाय मतदान केंद्र प्रमुख व मतदान अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



मात्र, काही शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी कार्यालये,महाविद्यालये व शाळांमधील अधिकारी व कर्मचारी हे आयोगाने दिलेल्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून वेळेवर वैद्यकीय किंवा ईतर प्रमाणपत्र सादर करून नियुक्ती निवडणूक आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करत असल्याचे निदर्शनास आले आहे, यामुळे निवडणूक कामकाजात अडथळे निर्माण होत आहेत.

निवडणूक कर्तव्यातून सूट मिळविण्यासाठी अर्ज करताना मा. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसारच अर्ज सादर करावेत.तसेच, बनावट वैद्यकीय किंवा ईतर प्रमाणपत्र सादर करून निवडणूक कर्तव्यातून सुट मागणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची शासकीय वैद्यकीय तज्ञांमार्फत तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीअंती प्रमाणपत्र बनावट किंवा खोटे आढळून आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे २ ऑगस्ट २००६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार शिस्तभंगविषयक कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा-चांडक यांनी दिला आहे.

# पथनाट्याच्या माध्यमातून मतदारांना मतदानाचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. मनपा आयुक्त माननीय सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप विभागामार्फत शहरातील विविध गर्दीच्या ठिकाणी जाऊन मतदार जनजागृती केली जात आहे.



याच उपक्रमाचा एक भाग म्हणून गाडगे नगर परिसरातील संत गाडगेबाबा यात्रेमध्ये उपस्थित यात्रेकरू, नागरिक व मतदार यांच्यासाठी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली. पथनाट्याच्या माध्यमातून मतदान का आवश्यक आहे, लोकशाहीमध्ये प्रत्येक मताचे महत्त्व काय आहे, तसेच मतदान न केल्यास होणारे परिणाम याविषयी प्रभावी सादरीकरण करण्यात आले.मतदानाच्या दिवशी सुट्टी असली तरीही प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावणे का गरजेचे आहे, याचे प्रात्यक्षिक देखील यावेळी सादर करण्यात आले. या उपक्रमाला उपस्थित नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास पशुशल्य चिकीत्सक डॉ. सचिन बोंद्रे, स्वीप नियंत्रण अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, झोन क्रमांक ०२ मधील श्री. दिनेश हंबर्डे, शाळा निरीक्षक योगेश पखाले, ज्योती बनसोड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ, उज्वल जाधव, कैलास कुलट, सोमेश वानखडे, संजय बेलसरे, विशाल वालचाळे, सुषमा दुधे, शुभांगी सुने, योगेश राणे, अर्चना रडके, चेतना बोंडे, प्रियंका हंबर्डे, चंचल दातीर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.अमरावती महानगरपालिका व स्वीप विभागाच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण होऊन आगामी निवडणुकीत मतदानाचा टक्का निश्चितच वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काँग्रेस नगरसेवक यावेळी अधिक

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात पार पडलेल्या १० नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या दोन निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाने जिल्ह्यात राजकीय अस्तित्व भक्कमपणे सिद्ध केल्याचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी सांगितले. काँग्रेसने दर्यापूर व चिखलदरा या दोन नगरपालिकांवर सत्ता काबीज करीत मोठे यश मिळविले. या निवडणुकीत काँग्रेसचे एकूण ७९ नगरसेवक निवडून आले. ही संख्या मागील निवडणुकीच्या तुलनेत लक्षणीय असल्याचे ते म्हणाले.



## २ नगराध्यक्षासह, ७९ नगसेवक काँग्रेस विजयी

## कार्यकर्त्यांच्या नियोजित लढाईला मिळाले यश; आगामी काळातही यश कायम राखणार

भाजपच्या बरोबरीने काँग्रेसने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्थान कायम राखल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, काँग्रेसकडून दोन नगराध्यक्षांसह ७९ नगरसेवक निवडून येणे ही पक्षासाठी मोठी राजकीय उपलब्धी मानली जात आहे. मागील निवडणुकीत काँग्रेसला केवळ ४८ नगरसेवकांवर समाधान मानावे लागले होते. मात्र यावेळी संघटनात्मक बांधणी, स्थानिक प्रश्नांवर ठाम भूमिका आणि प्रभावी प्रचाराच्या जोरावर पक्षाने मोठी झेप घेतली आहे. या यशाने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सर्वाधिक चिखलदरा १२, अचलपूर १५ आणि दर्यापूरमध्ये १७ नगरसेवक निवडून आले आहेत. या निकालानंतर बोलताना जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी आगामी जिल्हा परिषद व नगर परिषद निवडणुकांमध्येही काँग्रेसची सत्ता प्रस्थापित होईल, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

स्थानिक पातळीवरील विकास, जनतेशी असलेली नाळ आणि संघटनेची ताकद याच्या बळावर काँग्रेस आगामी काळात आणखी भक्कम होईल, असा दावा त्यांनी केला. ही निवडणूक खा. बळवंत वानखडे, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री अॅड. यशोमती ठाकूर, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात लढण्यात आली.



# लिव्ह-इन-रिलेशनशिप: स्वातंत्र्य की....

भारतीय संस्कृतीत, समाजात विवाह संस्काराला अनन्य साधारण महत्त्व आहे. किंबहुना भारतातील कुटुंब संस्थाच यामुळे आबाधित आहे. पाश्चात्त्य संस्कृतीत घटस्फोटाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे .आणि त्याला व्यक्तिस्वातंत्र्याचा मुलामा देऊन ते त्याचे समर्थन पण करतात. पाश्चात्य देशात 'लिव्ह-इन-रिलेशनशिप' हे फार कॉमन (प्रचलित) आहे. भारतात मात्र एकत्र कुटुंब पद्धती जाऊन सुद्धा आतापर्यंत विवाह संस्थेचे स्थान अबाधित होते .परंतु गेल्या काही वर्षात आपल्याकडे सुद्धा पाश्चात्य संस्कृतीने हातपाय पसरलेले दिसतात. सध्या केवळ तरुण पिढीच लिव्ह- इन- रिलेशनशिप मध्ये न राहता पन्नाशी- साठीतले स्त्री- पुरुष देखील लिव्ह- इन- रिलेशनशिप मध्ये राहताना दिसून येतात.

लिव्ह -इन -रिलेशनशिप मध्ये तरुण आणि तरुणी लग्न न करता एकाच घरात पती-पत्नी सारखे राहतात. म्हणजे दोघांचे मानसिक आणि भावनिक नात्यासोबतच शारीरिक संबंध ही तयार होतात. लिव्ह- इन- रिलेशनशिप आपल्या समाजात हळूहळू सर्व स्तरापर्यंत पसरू लागली आहे. भारतीय समाजात मान नसताना सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने २०१४ मध्ये 'लिव्ह इन रिलेशनशिप' ला कायदेशीर मान्यता आणि संरक्षण दिले आहे. नुकत्याच अलाहाबाद उच्च न्यायालयाने लिव्ह -इन- रिलेशनशिपला अवैध म्हटले जाऊ शकत नाही, हे विवाहबाह्य प्रतिष्ठेचे उल्लंघन ठरत नाही. अशा जोडप्यांना संरक्षण देणे हे सरकारचे दायित्व आहे.

भारतातील डिजिटल क्रांती भारतात २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर माहिती तंत्रज्ञान क्रांती झाली.माहिती तंत्रज्ञानाने मध्यम वर्गातील मुले -मुली पाश्चात्य देशात नोकरीनिमित्त जावे लागले. भारतात आयटी कंपनी आल्या. त्यामुळे तरुण- तरुणींना मोठ्या पॅकेजच्या नोकऱ्या लागल्या .जीवनमान उंचावू लागले. .कधी नव्हे तर मध्यमवर्गाच्या हातात पैसा खेळू लागला. स्मार्टफोन प्रत्येकाच्या हातात दिसू लागला.त्या पाठोपाठ पाश्चात्य संस्कृतीही भारतात वेगाने पसरू लागली. डिजिटल क्रांतीने विकासाचे दालन उघडले पण त्याचबरोबर भारतीय संस्कृती, संस्कार नातेसंबंध यांना छेद देणारे विषारी फळ सुद्धा आपल्या पदरात टाकले. स्वतःचे निर्णय घेताना आई-वडिलांच्या सल्ल्याची गरज वाटेनाशी झाली. किंबहुना त्यांच्या सल्ल्याशिवाय लग्न होऊ लागली. त्यातून आर्थिक स्वातंत्र्य आल्यामुळे घटस्फोटाचे प्रमाण प्रचंड वाढले. तडजोड हा शब्द लग्न संस्थेतून, कुटुंबातून हद्दपार झाला. पाश्चात्य देशातून विनामूल्य आयात झालेल्या 'लिव्ह-इन-रिलेशनशिप'चे आकर्षण युवा पिढीला वाटू लागले. टीव्ही, सिरीयल, सिनेमे, मोबाईल, फेसबुक ,इंस्टाग्राम याद्वारे त्याचा भारतात वेगाने प्रसार झाला. यात लग्नासारखी बंधने नाहीत, घरात वडीलधारे नाहीत ,शिस्त नाही ,आहे ते फक्त स्वातंत्र्य. याच आकर्षणाने लिव्ह- इन मध्ये राहणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. अगदी लहान लहान गावांमध्ये सुद्धा लिव्ह इन मध्ये राहणारे आहेत. केवळ तरुण पिढीच लिव्ह -इन -रिलेशनशिप मध्ये राहते असे नाही तर, पन्नाशी- साठी उलटलेल्या स्त्री-पुरुषांची संख्याही लक्षणीय आहे.

'लिव्ह इन रिलेशन' मध्ये राहताना पटले तर राहायचे नाही तर वेगळे होऊन दुसरा जोडीदार शोधायचा. .म्हणजे बंधनहीन, स्वच्छंद आयुष्य जगण्याचा आनंद घेणे. हे त्यांना व्यक्ती स्वातंत्र्य वाटत.पण भारतीय संस्कृतीत याला स्वैराचार म्हणतात.

**'लिव्ह -इन- रिलेशनशिप' चे दुष्परिणाम**

१)लिव्ह इन रिलेशनशिप चे वैयक्तिक आणि सामाजिक दूरगामी दुष्परिणाम होतात. २') गेल्या काही वर्षात लिव्ह' इन मध्ये राहणाऱ्या मुलींची हत्या झाल्याचे आपण बघतो आहोत. त्यात आफताब, श्रद्धा वालकर अशी बरीच उदाहरणं आहेत३) या नात्यातून दोघांच्याही सहमतीने मूल झाले, तरी लग्नाचे बंधन नसल्यामुळे पुरुष सहकारी तिच्याकडे दुर्लक्ष करतो, जबाबदारी टाळतो. अशावेळी कायदेशीर वाट चोखाळल्यास ती अतिशय वेळ खाऊ आणि खर्चिक असते.४) या नात्याला न्यायालयाने कायद्याचे संरक्षण दिले असले तरी, आपल्याकडे कायदे किती पाळले जातात? किती पळवाटा त्यात आहे ?हे वेगळं सांगायची गरज नाही. बलात्कारासाठी कठोर कायदे आहेत पण तरी रोज देशात कितीतरी बलात्कार होतच आहेत ना! त्यामुळे या दीर्घकालीन नात्याची शाश्वती नाही .

**बंधन नव्हे तर...**

विवाह संस्थेमुळे कुटुंब आणि कायदा या दोन्हींचे संरक्षण मिळते.

**माधवी पत्की**
नागपूर

# आलेगावात रस्त्यासाठी 'रस्ता रोको'

## महामार्गावरील बोगस कामांबाबत तीव्र संताप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील आलेगाव मार्गे अकोला–बुलढाणा या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या राज्य महामार्ग क्रमांक २८४ वरील बोगस व निकृष्ट रस्ता बांधकामाच्या विरोधात ग्रामस्थांचा संताप अनावर झाला. सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वाखाली २४ डिसेंबर रोजी शेकडो ग्रामस्थांनी आलेगाव परिसरातील मळसूर फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करून प्रशासनाचा निषेध केला.

एकाच रस्त्यासाठी केंद्र व राज्य शासनाचा वेगवेगळा निधी मंजूर असतानाही प्रत्यक्षात दर्जेदार काम झालेले नाही. त्यामुळे हा मोठा घोटाळा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आदिवासीबहुल भागात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कागदोपत्री कामे दाखवून निधी लाटला जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.



खड्डेमय रस्त्यामुळे वाहनधारक, शाळकरी मुले, शेतकरी व व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपघातांची शक्यता वाढली असून दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी रक्षण देशमुख यांनी केली. जिल्हाधिकारी वर्षा मीना व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी राजेश राठोड यांनी फोनद्वारे हस्तक्षेप केल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

या आंदोलनाला शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे, शेतकरी राजा ग्रुपचे अध्यक्ष रविभाऊ सोनोने, चरणगाव येथील व्यावसायिक अतुल वसतकार, नितीन ढोणे, पुरुषोत्तम आवटे, अमोल गिऱ्हे, रक्षण देशमुख, बाबूसिंग चव्हाण, भगवान राठोड, संदीप राठोड, मुजीब भाई, नदीम भाई, मस्तान भाई यांच्यासह मोठ्या संख्येने आलेगाव परिसरातील नागरिक उपस्थित होते.

> 'आलेगाव मार्गे अकोला–बुलढाणा जोडणारा २८४ क्रमांकचा महामार्ग रस्ता नसून वाहनधारकांसाठी जीवघेणा अड्डा बनला आहे. चौकशी करून तातडीने दुरुस्ती न झाल्यास २६ जानेवारी रोजी ध्वजारोहणानंतर शाळकरी विद्यार्थ्यांसह पुन्हा रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल,'
>
> **निलेश कापकर,**
> सामाजिक कार्यकर्ते.

# जगाला तारण, शांती, प्रेम आणि आनंद देण्यासाठी देवाने येशू यांना पाठविले

- रेव्हरंड निलेश अघमकर यांचे प्रतिपादन
- अकोल्यात ख्रिसमस हर्षोल्हासात साजरा

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रभू येशू ख्रिस्तांनी दिलेली प्रेम, बंधुभाव आणि त्यागाची शिकवण आचरणात आणा आणि समाजात वावरताना सत्य आणि खरेपणाचा अवलंब करा, जगाला तारण, शांती, प्रेम आणि आनंद देण्यासाठी देवाने प्रभू येशू यांना भूतलावर पाठवले, असे प्रतिपादन रेव्हरंड निलेश अघमकर यांनी सोमवारी येथे केले. प्रभू येशू ख्रिस्तांच्या जन्मदिवसानिमित्त खदान ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्च येथे आयोजित प्रार्थना सभेमध्ये ते बोलत होते.

२५ डिसेंबर रोजी ख्रिसमस अर्थात नाताळ हा सण जगभरात साजरा केला जातो. अकोला शहर आणि जिल्ह्यातही सोमवारी येशू ख्रिस्तांचा जन्मदिवस अर्थात नाताळ हा सण मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. यावेळी ख्रिश्चन बंधू - भगिनींनी एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छापत्रे देऊन परस्परांचे अभिनंदन केले. ख्रिसमसनिमित्त सुमारे १६० वर्षांचा इतिहास असणारी अकोल्यातील एकमेव ख्रिश्चन कॉलनी घरांना करण्यात आलेल्या रंगरंगोटी आणि रोषणाईने झगमगून आणि उजळून निघाली आहे. शहरात ख्रिश्चन धर्मियांच्या धार्मिकस्थळांची म्हणजेच चर्चचीदेखील सजावट आणि रोषणाई करण्यात आली आहे. विविध ठिकाणी खिसमस ट्री आणून त्यांच्यावर रोषणाई करण्यात आली आहे. अनेक चर्चेसमध्ये येशूच्या जन्माचे देखावे सादर करण्यात आले आहेत.

२४ डिसेंबरच्या रात्री ख्रिश्चन अबालवृद्धांनी विविध चर्चेसद्वारे आयोजित कॅरल पार्टीमध्ये सहभागी होऊन रात्रभर घरोघरी भेटी देऊन ख्रिस्तजन्माची गीते गायिली आणि एकमेकांना ख्रिस्तजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सांताक्लॉजच्या वेषातील युवक - युवती यावेळी सर्वांच्याच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. गुरुवार,



२५ डिसेंबर रोजी सकाळी सर्वच चर्चेसमधून प्रार्थनासभांचे आयोजन करण्यात आले होते. ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये रेव्हरंड निलेश अघमकर यांनी ख्रिसमसचा संदेश दिला. इतरही चर्चेसमधून धर्मगुरुंनी ख्रिस्तजन्मावर आधारित संदेश दिले. सध्या जगातील संघर्ष आणि अराजकतेची परिस्थिती पाहता जगाला प्रभू येशूने दिलेल्या शांती, प्रेम, बंधुभाव आणि त्याग यासंदर्भातील शिकवण आचरणात आणण्याची गरज असून, आपण समाजात वावरताना सत्य आणि खरेपणाने वागण्याची आवश्यकता असल्याचे अघमकर यांनी सांगितले. चर्चेसमध्ये यावेळी संडेस्कुल, महिला संघ, तरुण संघ यांनी खिस्तजन्मावर आधारित गीते सादर केली.

**आठ दिवस आनंदोत्सव :** आता येथून पुढे आठ दिवस सर्वत्र ख्रिस्तजयंतीचा आनंदोत्सव साजरा करण्यात येईल. त्यामध्ये ख्रिस्तजन्मावर आधारित नाटिका, लहान मुले, महिला आणि पुरुषांसाठी विविध खेळ स्पर्धा, एखाद्या प्रेक्षणीय स्थळी सहल असे विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. ३० डिसेंबरच्या रात्री किंवा १ जानेवारीला प्रार्थना सभेनंतर अनेक चर्चेसमधून चर्च सदस्यांसाठी सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. ३१ डिसेंबरच्या रात्रीही पुन्हा वॉच नाईटचे आयोजन केले जाते. कॅरोल पार्टी घरोघरी जाऊन नववर्षस्वागताची गीते सादर करतात. १ जानेवारी हा नववर्षदिनही ख्रिश्चन धर्मीय एखाद्या सणाप्रमाणेच साजरा करतात. अशाप्रकारे २४ डिसेंबरपासून नवीन वर्षापर्यंत ख्रिश्चन धर्मिय नाताळाचा आनंदोत्सव साजरा करतात.

## ८ जनजागृती रथाव्दारे मतदार जनजागृती कार्यक्रम आजपासून

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात आज दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी पासून ८ जनजागृती चित्ररथाव्दारे अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदार जनजागृती कार्यक्रमाचे मनपा उपायुक्त विजय पारतवार यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

## 'स्वामिनी'सारख्या संघटना विधवांसाठी खंबीर आधार – राखी सोनोने

**अकोला :** समाजातील गरीब व गरजू विधवांसाठी स्वामिनीसारख्या संघटना खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरत असल्याचे प्रतिपादन श्रीमती राखी सोनोने यांनी केले. वीरस्त्री स्वर्गीय लताताई देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

स्वामिनी विधवा विकास मंडळ व स्वामिनी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. २५) लताताई देशमुख यांच्या अठराव्या पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संक्रांतीच्या दिवशी चायनीज मांजामुळे गळा कापून दुर्दैवी मृत्यू झालेल्या खाजगी वायरमन किरण सोनोने यांच्या पत्नी राखी किरण सोनोने व त्यांची सहा वर्षांचा प्रसाद आणि चार वर्षांचा अंश ही दोन चिमुकली मुले यांना मदतीचा हात देण्यात आला.

संघटनेच्या वतीने राखी सोनोने यांना आर्थिक सहाय्य, साडी-चोळी तसेच मुलांसाठी शालेय साहित्य भेट देण्यात आले. याशिवाय दोन्ही मुलांचे



इयत्ता दहावीपर्यंतचे शैक्षणिक शुल्क संघटनेमार्फत भरले जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव प्रा. सुनीता डाबेराव होत्या. यावेळी अंजली पाटील, विधिज्ञ अभिषेक गौतम, प्रा. सुषमा गौतम, रवी धानोरकर, अमोल खुळेकर, कृष्णा कांबळे, मनीष देशमुख, संदीप देशमुख, श्रीमद् देशमुख, प्रथमेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०५५/२०२५ प्रोसेस नं.१८९६७/२०२५
चौ.ता. ०३/०१/२०२६ दिनांक : १८/११/२०२५

**अर्जदार :** १. प्रल्हाद संपत डोंगरे रा. न्यू अशोक वाटिका, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भिमाबाई प्रल्हाद डोंगरे
**पत्ता :-** रा. न्यू अशोक वाटिका, शिवणी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिमाबाई प्रल्हाद डोंगरे यांचे दि. ०५/११/ २०२३ रोजी शिवणी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्ज़दार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/११/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१४७/२०२५ प्रोसेस नं.१९५०३/२०२५
चौ.ता. १०/०१/२०२६ दिनांक : २८/११/२०२५

**अर्जदार :** १. शबाना परवीन शेख हारून २. शेख अयान शेख हारून दोघेही रा. अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शेख हारून शेख करीम
**पत्ता :-** रा. अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेख हारून शेख करीम यांचे दि.२०/०४/२०२३ रोजी अन्वी ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/११/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१४०/२०२५ प्रोसेस नं.२०४४८/२०२५
चौ.ता. ३१/१२/२०२५ दिनांक : १२/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती शांताबाई नारायण बघेरे २. मनिष नारायण बघेरे ३. सतिष नारायण बघेरे ४. महेंद्र नारायण बघेरे ५. सौ. छाया निर्मलकुमार सांगोदिया रा. नारायण केसर बाग रोड, ३९०, लालबाग आश्रमच्या मागे, सुदामा नगर, इंदौर, ता. जि. इंदौर मध्यप्रदेश अर्जदार क. १ ते ४ रा. घनश्यामदास नगर, इंदौर, ता. जि. इंदौर मध्यप्रदेश

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण रामपाल बघेरे
**पत्ता :-** रा. घनश्यामदास नगर, इंदौर, ता. जि. इंदौर मध्यप्रदेश

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण रामपाल बघेरे यांचे दि. २१/०७/२०१० रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१ / १२ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

■ प्रतिनिधी | अकोट ■

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अकोला जिल्ह्याच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. अकोला शहरातील कपिलवस्तू नगर येथील बुद्ध विहार येथे बुधवारी (२५ डिसेंबर) हा उपक्रम उत्साहात पार पडला.

रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सुनील अवचार, जिल्हा महासचिव



आशिष शिरसाट, जिल्हा युवक आघाडी अध्यक्ष बुद्धभूषण गोपनारायण, तेल्हारा तालुका अध्यक्ष गणेश थोरात, अकोट तालुका अध्यक्ष दयानंद तेलगोटे व अकोट तालुका महासचिव दिनेश पेटकर यांच्या पुढाकारातून शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी रामदास आठवले यांचा वाढदिवस 'संघर्ष नायक' म्हणून साजरा करण्यात आला.

या रक्तदान शिबिरात तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवित रक्तदान केले. यामुळे गरजू रुग्णांसाठी रक्तसाठा उपलब्ध झाला. जिल्हाध्यक्ष सुनील अवचार, महासचिव आशिष शिरसाट, बुद्धभूषण गोपनारायण, गणेश थोरात, दयानंद तेलगोटे, सागर सरदार, दत्ता पवार, वैभव घामोद्रे, देवानंद गवई, शुभम वानखडे, गजानन खैरे, नागेश खंडारे, आनंद वानखडे, अक्षय इंगळे, रोशन राठोड, नरेश पवार, निलेश पवार, आकाश सोनोने, सुमेध खंडारे, करण उपर्वट, विश्वजीत इंगळे, सम्यक इंगळे, अक्षय अंभोरे, रोहित अंभोरे, अंकुश वाडेकर, ॲड. कुणाल शिंदे, कपिल पडघान, राजेश कलाणे आदींनी रक्तदान केले. रक्तसंकलनासाठी शासनाच्या वतीने डॉ. मयुरेश वैराळे, नीलकंठ मांडेकर, शिल्पा तायडे, आदित्य शिंदे, शिवानी चिकराम, मोनिका शिरसाट, रुपेश तायडे उपस्थित होते. सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

## गुरुद्वारात वीर बाल दिन संपन्न

**अकोला :** देश व धर्माच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शीख हुतात्म्यांचे महान कार्य प्रेरणास्पद आहे. राष्ट्रभिमानानी युवकांनी अशा हुतात्म्यांचे सदा स्मरण करावे असे आवाहन जिल्हा भाजपचे अध्यक्ष संतोष शिवरकर यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने शिखांच्या बलिदान बाबत देशात सर्वत्र पाळल्या जाणाऱ्या वीर बाल दिनानिमित्त स्टेशन रस्त्यावरील गुरुद्वारा येथे वीर बाल दिन मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. यात प्रमुख पाहुणे म्हणून शिवरकर बोलत होते.

जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मुर्तिजापूर, जि.अकोला (श्री तांबोळी साहेब) यांचे न्यायालय.**

आर.एम. जे. सी. नं. ४११/२०२५ प्रोसेस नं.३५५०/२०२५
चौ.ता. २२/०१/२०२६ दिनांक : २३/१२/२०२५

**अर्जदार :** प्रभाबाई दत्तात्रय मोहाडे, वय ६८ वर्ष, रा. लकडगंज, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत गंगुबाई भिवाजी इंगळे, रा. लकडगंज, मुर्तिजापुर, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमुद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरीक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदार २२/०१/२०२६ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी स्वत: अगर निर्देशीत केलेल्या वकीला मार्फत चौकशी तारीख दिनांक २२/०१/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक २३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर

जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/ गैरअपिलार्थी यांनी चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस
Guardian Ward No. 577 / 2025 Fix for: 29/01/2026

**बनाम:**
1) Pooja Hemant Thote, 2) Ku. Sharvari Hemant Thote, Applicant No. 2 is Minor through her natural guardian Mother i.e. Applicant No. 1 (Pooja Hemant Thote).Both Ro Gokul Colony, Akola Road, Akot, Tq. Akot, Dist. Akola

विरुध्द : **Nil**

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला या न्यायालयामध्ये 'APPLICATION FOR GRANT OF PERMISSION TO SELL THE PROPERTY OF MINORS U/S 29, R/W31 OF GUARDIAN AND WARDS ACT 1890' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अपिल दाखल केलेली आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख २९/०१/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला २९ / ०१ / २०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक २४ माहे डिसेंबर सन २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला.
दिनांक : २४/१२/२०२५


शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

# सौर ऊर्जा अक्षय ऊर्जा काळाची गरज : जिल्हाधिकारी

## राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त कार्यशाळा

**अकोला :** जिल्ह्यात सौर ऊर्जेचा वापर वाढविणे ही काळाची गरज असून पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

त्या राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन



सप्ताह निमित्त नियोजन भवन येथे ऊर्जा बचत काळाची गरज ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व व सध्याची शासनाची धोरणे या विषयावर आधारित कार्यशाळेत बोलत होत्या. यावेळी महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक विजय काळे, ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक अच्युत मेहंदळे व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर १५० किलोवॅट पारेषण संलग्न सौर विद्युत निर्मिती प्रकल्प सुरू झाल्यामुळे वीजबिलात बचत होत असून ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भरता साधण्यासाठी हा महत्वाचा टप्पा ठरत आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी सौर व हरित ऊर्जेचा स्वीकार करून हरित आणि उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे.ऊर्जा परीक्षक श्री. मेहेंदळे म्हणाले की, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि ऊर्जा गरजा लक्षात घेता पारंपरिक ऊर्जास्रोतांवरचा ताण वाढत आहे.

# समाजबांधवांत सुसंवादासाठी मेळाव्याचा उपक्रम महत्त्वपूर्ण : पालकमंत्री ॲड. फुंडकर

## अ. भा कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळातर्फे उपवर युवक युवती परिचय मेळावा



**अकोला :** समाजातील उपवर युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा व समाजातील सुसंवाद वृद्धिंगत व्हावा यासाठी उपवर युवक-युवती परिचय मेळावे अत्यंत उपयुक्त असून युवक-युवतींना तसेच पालकांनाही एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळते. त्यामुळे समाजाने एकत्र येऊन असे उपक्रम राबविणे महत्वाचे असल्याचे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी आज केले.

अखिल भारतीय कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळातर्फे उपवर युवक युवती परिचय मेळावा जि. प. कर्मचारी भवनात झाला, त्यावेळी ते बोलत होते. खामगावच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष अपर्णाताई फुंडकर व हिवरखेडच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुलभाताई दूतोंडे यांचा गौरव यावेळी करण्यात आला, तसेच सोयरीक पुस्तिका व दिनदर्शिकेचे प्रकाशनही झाले. माजी जि.प. अध्यक्ष संध्या वाघोडे, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, सागर फुंडकर, भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, अखिल भारतीय कुणबी समाज बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी तसेच उपवर युवक युवती मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

मेळाव्याच्या माध्यमातून सुसंवाद वाढीस लागतो. अ. भा. कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ अनेक चांगले उपक्रम राबवत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी केले. अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनरेगाचा पैसा गिळंकृत : २०१४ ते २०२५ चा काळ संशयाच्या भोवऱ्यात

## आर्वी पंचायत समितीतील 'अर्धे तुम्ही—अर्धे आम्ही' घोटाळा उघड १२ बीडीओंच्या अडचणी वाढणार

**वर्धा / जनमाध्यम**

आर्वी पंचायत समितीत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या निधीवर डल्ला मारत ७० लाखांहून अधिक रुपयांचा अपहार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणाने आता स्फोटक वळण घेतले आहे.

तत्कालीन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर व गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांना अटक झाल्यानंतर, हे प्रकरण थेट आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, तपासात समोर आलेल्या धक्कादायक माहितीनुसार सन २०१४ ते २०२५ या तब्बल ११ वर्षांच्या काळातील बीडीओंची डिजिटल स्वाक्षरी (डीएससी) वापरून हा अपहार करण्यात आला, त्यामुळे अनेक माजी बीडीओंच्या अडचणीत मोठी भर पडण्याची शक्यता आहे.

मनरेगासारख्या गोरगरिबांच्या रोजगारासाठी असलेल्या योजनेत अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही असा सरळसरळ सपाटा लावून सरकारी निधी गिळंकृत करण्यात आल्याचे आतापर्यंतच्या तपासात स्पष्ट झाले आहे. निधी मंजुरी, कामांची नोंद, मस्टर रोल, ऑनलाईन अपलोडिंग या सर्व प्रक्रियेत संबंधित काळातील बीडीओंच्या डीएससीचा वापर झाल्याने खालून वर नव्हे तर 'वरून खाल' घोटाळा असल्याची शक्यता बळावली आहे.

या प्रकरणात आर्वी पोलिसांनी आतापर्यंत दोन आरोपींना अटक केली आहे. अटकेत असलेल्या बडतर्फ सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर व बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांची कसून चौकशी करण्यात आली असून, त्यांनी दिलेल्या बयाणात २०१४ ते २०२५ या काळात आर्वीत कार्यरत असलेले बीडीओही या अपहारास जबाबदार असल्याचा थेट उल्लेख केल्याची माहिती



विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. या बयाणांमुळे आता तत्कालीन सुमारे १२ बीडीओ संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी गठीत केलेल्या जिल्हास्तरीय चौकशी समितीच्या अध्यक्षांचेही बयाण आर्वी पोलिसांनी नोंदविले आहे. तसेच पंचायत समितीतील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, कनिष्ठ लेखाधिकारी व डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचे बयाण भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या कलम १८३ अंतर्गत थेट न्यायालयासमक्ष नोंदविण्यात आले आहेत.

नवीन पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल रुजू होताच, २४ डिसेंबर रोजी हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आले.

त्यामुळे आता तपासाचा फास अधिक घट्ट होणार असून, फक्त दोन बळी पुरेसे नाहीत, तर संपूर्ण साखळी उघड होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**प्रभारी बीडीओचा विसर की मुद्दाम दुर्लक्ष?**

बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांना अटक झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी विस्तार अधिकारी (पंचायत) प्रदीप चव्हाण यांना बीडीओ पदाचा अतिरिक्त प्रभार दिला.

४ डिसेंबर रोजी त्यांनी पदभार स्वीकारला असतानाही, पंचायत समितीतील 'श्रेणी अ - गटविकास अधिकारी कार्यकाळ' या अधिकृत फलकावर त्यांचे नाव नसणे म्हणजे प्रशासकीय गोंधळ की जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### आर्वी पंचायत समितीतील बीडीओंचा काळ

पी. एन. वानखेडे : ३१ ऑगस्ट २०१५ – २६ मे २०१६
सरिता पवार : १९ ऑगस्ट २०१६ – २१ जुलै २०१७
व्ही. व्ही. धापके : १ ऑगस्ट २०१७ – २९ डिसेंबर २०१७
श्रीकृष्ण पी. पांचाळ : २९ डिसेंबर २०१७ – ३ फेब्रुवारी २०१८
व्ही. डी. धापके : ४ फेब्रुवारी २०१८ – २ सप्टेंबर २०१८
व्ही. व्ही. जमदाडे : ३ सप्टेंबर २०१८ – ७ सप्टेंबर २०२१
व्ही. बी. मडावी : ८ सप्टेंबर २०२१ – २२ डिसेंबर २०२१
आर. जी. कोडवते : २३ डिसेंबर २०२१ – ६ जानेवारी २०२२
आर. डी. डुबे : ७ जानेवारी २०२२ – १६ जानेवारी २०२२
जी. एल. माने : १७ जानेवारी २०२२ – ३१ मे २०२२
अनिल गावंडे : १ जून २०२२ – ३१ जानेवारी २०२३
जी. एल. माने : १ फेब्रुवारी २०२३ – १८ ऑक्टोबर २०२३
सुनीता मरसकोल्हे : १९ ऑक्टोबर २०२३ – ३ डिसेंबर २०२५

# हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी ब्लॉक

**वर्धा/ जनमाध्यम**

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गावर हायवे ट्रैफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यासाठी महामार्ग काही ठिकाणी ४५ ते ६० मिनीटांसाठी पुर्णतः थांबविण्यात येणार आहे. महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या जिल्ह्यातील नागरिकांनी याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



समृध्दी महामार्गावर हायवे ट्रैफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत कि.मी. १०४६०८० ते कि.मी. १२०६३०० ता. धामणगाव रेल्वे व ता. चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती येथे गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत दि.२७ ते दि.२९ डिसेंबर या कालावधीत पाच टप्प्यात करण्यात येणार आहे. या प्रत्येक टप्प्यादरम्यान कामाच्या टप्प्यानजीक संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांकरिता पूर्णतः थांबविण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यातील काम पूर्ण झाल्यावर द्रुतगती मार्गावरील संबंधित वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल.

त्यानुसार गॅन्ट्री उभारण्याच्या कामाकरीता दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी २ ते ३ किंवा दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान मुंबई वाहिनीवर नगरगावंडी गावाजवळ साखळी क्रमांक १०४.०८० तसेच १०५.०५० येथे मार्ग बंद राहील. दिनांक २८ डिसेंबर रोजी दुपारी २ ते ३ किंवा दुपारी ३ ते ४ वाजताच्या दरम्यान नागपूर वाहिनीवर नगरगावंडी गावाजवळ साखळी क्रमांक १०५.०६५ येथे मार्ग बंद राहील.

दिनांक २९ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते १२ किंवा दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान नागपूर वाहिनीवर टिटवा गावाजवळ साखळी क्रमांक १२०.३०० येथे मार्ग बंद राहील.

दिनांक २९ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ४ किंवा सायंकाळी ४ ते ५ वाजताच्या दरम्यान मुंबई वाहिनीवर टिटवी गावाजवळ साखळी क्रमांक १२०.३०० येथे मार्ग वाहतुकीकरीता ४५ ते ६० मिनीटांसाठी पुर्णतः थांबविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

# विना परवाना अवैध मासेमारी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**वर्धा / जनमाध्यम**

निम्न वर्धा प्रकल्प क्षेत्रात बेकायदेशिरित्या सुरु असलेल्या मासेमारीवर मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त स्वप्नील वालदे यांच्या मार्गदर्शनात आर्वी पोलिस स्टेशनच्या सहकार्याने कारवाई करण्यात आली. या कारवाईत ८० किलो तिलमिया व पडन जातीचे चोरीचे मासे व साहित्य जप्त करण्यात आले. तसेच आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील नियोजन समितीच्या बैठकीत आमदार दादाराव केचे यांनी निम्न वर्धा प्रकल्पात अवैध मासेमारी होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

याची पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दखल घेऊन मत्स्य विभागाला चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार मत्स्य विभागाने दि.२३ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास निम्न वर्धा प्रकल्पातील मौजा धनोडी येथील पिपरी पारगोठाण आणि हैबतपूर परिसरात केलेल्या कारवाईत



**पोलिस व मत्स्य विभागाची संयुक्त कारवाई**

**८० किलो तिलापिया व पडन जातीचे मासे जप्त**

अंदाजे ३ हजार २०० रुपयाचे वजन काटे व मापे, कॅरेट, डिस्को जाळी व इतर मासेमारी साधने तसेच एक जुनी वापरात असलेली होंडा मोटारसायकल व अंदाजे ८० तिलपिया व पडन जातीचे चोरीचे मासे जप्त केले. जप्त करण्यात आलेले मासे नष्ट करण्यात आले.

या कारवाईदरम्यान घटनास्थळावरुन काही व्यक्ती पळून जाण्यात यशस्वी झाले तर चौकशीअंती पिंटू उर्फ निलेश लसनकर, आर्वी, धनराज भोवरे पिपरी पारगोठाण आणि जी. येकन्ना बाबू उर्फ जोसेफ आंध्रप्रदेश यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२), ३२९ (३), ३/५ अंतर्गत मासेमारी चोरीचा गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया आर्वी पोलिस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे.

सदर कारवाई मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त स्वप्नील वालदे व कार्यालयातील लिपिक धोंडिबा जाधव, चालक लकी अफसर अली, आर्वी पोलिस स्टेशनचे उपनिरिक्षक राज पंडित व त्यांच्या पथकाने संयुक्तपणे केली.

शासकीय जलाशयांमध्ये होणारी अवैध मासेमारी रोखण्यासाठी मत्स्य विभाग सतर्क असून यापुढेही अशी धडक मोहिम सुरुच राहील. विना परवाना मासेमारी करणाऱ्यांवर कठोर कायदेशिर कारवाई केली जाईल, असे स्वप्नील वालदे यांनी कळविले आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर K1315184वरील माझे BASHIR MIYA ANSARI ANSARI असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील BASHIR MIYA RAMUJ ANSARI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

- :पत्ता : -
गजानन नगर पिपरी मेघे वर्धा
४४२००१

# अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून कर्ज प्रक्रियेबाबत खुलासा

**वर्धा / जनमाध्यम**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कार्यवाहीबद्दल समाज माध्यमांवरून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, महामंडळाने अधिकृत खुलासा प्रसिद्ध करून वस्तुस्थिती स्पष्ट केली असून मराठा समाजातील तरुण आणि नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी केवळ निवडणुका प्रलंबित असलेल्या हद्दीमध्येच नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आली आहे. मात्र, याक्षेत्रांव्यतिरिक्त उर्वरित संपूर्ण राज्यामध्ये पात्रता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया नियमितपणे सुरू आहे. आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर संबंधित क्षेत्रांमधील ही प्रक्रिया पुन्हा नियमानुसार पूर्ववत सुरू करण्यात येईल.महामंडळाने पुढे स्पष्ट केले की, महामंडळाविषयी प्रसारित होत असलेल्या मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून समाजमाध्यमांवरील दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे संभ्रम निर्माण होऊ नये, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगण्यात आले आहे.

# सत्तेची गणिते अन् स्वीकृत सदस्यपदाची रस्सीखेच

**जनमाध्यम/सिंदी रेल्वे**

नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये भारतीय जनता पक्षाने नगराध्यक्षा पदासह तब्बल दहा नगरसेवक निवडून आणत स्पष्ट बहुमत मिळवले असले, तरी सत्तेची अंतिम मांडणी आणि स्वीकृत नगरसेवकपदाच्या वर्णीवरून शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मागील पंचवार्षिक कार्यकाळाप्रमाणे यंदाही भाजप काँग्रेसचे चार नगरसेवक सत्तेत सहभागी करून घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सिंदीकरांनी पुन्हा एकदा आमदार समीर कुणावार यांच्या विकासात्मक राजकारणावर विश्वास टाकत भाजपला स्पष्ट बहुमत दिले. आमदार म्हणून विजयाची हॅटट्रिक करणाऱ्या समीर कुणावार यांचा 'विकासकामात विरोधाला विरोध नसावा' हा ठाम आग्रह आहे. त्यामुळे मागील कार्यकाळाप्रमाणे विरोधकांनाही सोबत घेऊन सर्वसमावेशक सत्तास्थापना केली जाईल का, की यंदा पूर्णपणे भाजपच्या नगरसेवकांनाच सत्तेची सूत्रे दिली जातील, याबाबत संभ्रम कायम आहे.

**अपक्ष बोंगाडे 'फॅक्टर' ठरणार का?**

भाजपने तिकीट नाकारल्याने बंडखोरीचा मार्ग स्वीकारलेल्या माजी नगरसेवक अमोल बोंगाडे



**भाजप पुन्हा काँग्रेसचे नगरसेवक सोबत घेणार का? सिंदी पालिकेत**

**सत्तास्थापनेपूर्वीच राजकीय फड रंगात**

यांनी पत्नी ममता बोंगाडे यांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवत भाजप उमेदवाराचा पराभव केला. सात अपक्षांमधून एकमेव अपक्ष नगरसेवक निवडून आणत बोंगाडे यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे.'सुबह का भूला शाम को लौट आए तो उसे भूला नहीं कहते' या उक्तीप्रमाणे बोंगाडेंना पुन्हा भाजप सोबत घेणार का, की त्यांना सत्तेपासून दूर ठेवले जाणार, हा प्रश्नही राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

**स्वीकृत नगरसेवकपदावरून भाऊगर्दी**

सत्ताधारी पक्षात भाऊगर्दी नवीन नसते. दिल्लीपासून गल्लीपर्यंत सत्ता असलेल्या भाजपमध्येही स्वीकृत नगरसेवकपदासाठी मोठी रस्सीखेच सुरू असल्याची विश्वसनीय माहिती आहे. सत्तेची फळे चाखण्यासाठी अनेकांनी आपापल्या पातळीवर फिल्डिंग लावली असून, पक्षनेतृत्वासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

दरम्यान, नगराध्यक्षा पदाची उमेदवारी नाकारल्यामुळे बंडखोरी करणाऱ्या शहराध्यक्षा अजया साखळे यांची नाराजी दूर करताना त्यांना स्वीकृत नगरसेवकपदाचे आश्वासन देण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे दिलेल्या शब्दाची पूर्तता करायची की नव्या समीकरणांना प्राधान्य द्यायचे, हा प्रश्नही नेतृत्वापुढे उभा आहे.

**राजकीय चित्र अजून अस्पष्ट**

स्पष्ट बहुमत असूनही भाजप कोणत्या मार्गाने सत्तास्थापना करतो, कोणकोणाला सोबत घेतो आणि स्वीकृत नगरसेवकपदी कोणाची वर्णी लागते, यावर सिंदीतील पुढील पाच वर्षांचे राजकारण ठरणार आहे.शेवटी सत्तेची खरी गणिते काय ठरतात, हे येणारा काळच ठरवेलष्ठ एवढे मात्र नक्की.

## संक्षिप्त




### टिप्परसह अवैध रेतीसाठा जप्त

**सिंदी (रेल्वे) :** महसूल विभागाने वायगाव बैलमारे शिवारात अवैध रेती वाहतुकीवर धडक कारवाई करीत रेतीसह टिप्पर जप्त केला. या कारवाईत तब्बल १२ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी सचिन बुचके (रा. पारडी) व प्रमोद निमसडे (रा. भोसा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मंडळ अधिकारी प्रशांत निनावे (वय ५१) यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. एम.एच. ३६ एफ १४६९ क्रमांकाच्या टिप्परमध्ये बेकायदेशीर रेती आढळून आल्याने वाहनासह रेती जप्त करण्यात आली. पुढील कारवाईसाठी सिंदी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे.

### भरधाव कारच्या धडकेत एक गंभीर

**कारंजा (घा.) :** भरधाव कारने दिलेल्या धडकेत भोजराज देवासे (वय ५८), रा. कारंजा हे गंभीर जखमी झाले. हा अपघात चंदेवाणी फाट्याजवळ घडला. एम.एच. ०२ बी.जी. १७३३ क्रमांकाच्या कारने धडक दिल्याची नोंद आहे. जखमीस तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### घरगुती वादातून पत्नीवर दगडाने हल्ला

**कारंजा (घा.) :** घरगुती वाद विकोपाला गेल्याने पतीने पत्नीवर दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना इंदिरानगर येथे घडली. शांता काशीकर (वय ५०), रा. खर्डीपुरा असे जखमी महिलेचे नाव आहे.पती ईश्वर काशीकर याने शिवीगाळ करत वाद घातल्यानंतर दगडाने हल्ला केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी कारंजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### गळफास घेत व्यक्तीची आत्महत्या

**वर्धा :** खरांगणा (गोडे) येथे राहत्या घरी गळफास घेत एका व्यक्तीने आत्महत्या केली. प्रवीण उईके (वय ४१) असे मृताचे नाव आहे. ही घटना मंगळवार (दि. २३) रोजी घडली. सेवाग्राम पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### आर्थिक विवंचनेतून गळफास

**समुद्रपूर :** आर्थिक अडचणींमुळे कवडू जवादे (वय ५०), रा. शेगाव गोठाडे यांनी गळफास घेत आत्महत्या केली. कवडू जवादे यांना दारूचे व्यसन होते व काही दिवसांपासून ते आर्थिक विवंचनेत होते. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# बेरोजगार सेवा सहकारी संस्थांकडून प्रस्ताव आमंत्रित

**वर्धा / जनमाध्यम**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांतर्गत स्थापन झालेल्या बेरोजगारांच्या सहकारी संस्थाना कंत्राट स्वरुपाची कामे देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक संस्थांनी दि. १० जानेवारी पर्यंत विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.शासन निर्णयाप्रमाणे १० लाख रुपयापर्यंतची कामे नोंदणीकृत संस्थांना दिली जातात. सामान्य रुग्णालयामार्फत संपूर्ण जिल्ह्यातील रुग्णालयाकरीता कंत्राटी स्वरुपाची कामे यामध्ये वाहन चालक, स्वच्छता सेवक, कक्षसेवक अशा कंत्राटी स्वरुपाची कामे बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना वाटप करण्यात येणार आहे. यासाठी सामान्य रुग्णालयाकडून प्राप्त कामासाठी पात्र सेवा सहकारी संस्थेची निवड करण्यात येणार आहे.यासाठी संस्थानी कंत्राटी स्वरुपाची कामे स्विकारतेवेळी कामाच्या स्वरुपाप्रमाणे आवश्यकते प्रमाणे आवश्यक परवाने त्या संस्था, सदस्यांकडे असणे आवश्यक आहे. यामध्ये गुमास्ता परवाना, मजुर परवाना, फुड अॅन्ड ड्रग्ज परवाना, सिक्युरीटी गार्ड परवाना, वाहन चालक परवाना आवश्यक आहे.पात्र संस्थांची निवड करण्यासाठी संस्था कमीत कमी ६ महिने कार्यरत असावी, संस्था नोंदणी प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच संस्थेने आर्थिक चालू वर्षाचे अंकेक्षण अहवाल, वार्षिक लेखे परिक्षण व बॅलेन्सशिटची सत्यप्रत सोबत जोडावी. सेवा सहकारी संस्थेचे को-ऑपरेटीव्ह बँकेचे अद्यावत पासबुकची सत्यप्रत जोडावी. सदर संस्थेचे सदस्य ११ पेक्षा कमी असू नये, संस्थेने सर्व संस्था अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सदस्यांची चालू असलेले नुतनीकरण केलेले सेवायोजनकार्ड सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच संस्था कार्यरत असल्याबाबत व ब्लॅकलिस्टमध्ये नसल्याबाबतचे जिल्हा निबंधक, जिल्हा उपनिबंधक व सहाय्यक उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाकडून प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे.

ज्या संस्थांनी काम केले आहे, अशा संस्थांनी त्या कार्यालयाच्या कार्यरत प्रमुखाद्वारे आपले काम समाधानकारक असल्याबाबतचे प्रमाणपत्र सही शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. अटी व शर्तीमध्ये वेळेवर शिथीलता करण्याचे अधिकार समितीकडे राखीव ठेवण्यात आले आहे. कामाचे वाटप काम वाटप समिती मार्फत जेष्ठतायादीनुसार करण्यात येणार आहे, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने कळविले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ३१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# तंत्रज्ञानाच्या काळात स्वतःला अपडेट करणे आवश्यक

## -कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे आवाहन -तक्षशिला महाविद्यालयात राष्ट्रीय 'एआय' परिषद

**अमरावती/प्रतिनिधीः-** एआय तंत्रज्ञान मनुष्याच्या आयुष्यात प्रत्येक क्षेत्रासाठी महत्वाचे आहे. एआय विशेषता शिक्षण क्षेत्रात महत्वाचा भाग म्हणून उदयास येणार आहे. भारत एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा हब म्हणून पुढे येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यामध्ये एआयचा समावेश झाला आहे. त्यामुळे, शिक्षक, प्राध्यापकांनी स्वतःला अपडेट ठेवावे, असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते यांनी केले.





कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित एक दिवसीय राष्ट्रीय परिषद तक्षशिला महाविद्यालय येथे सोमवार (दि.२२ डिसेंबर) रोजी पार पडली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते उद्घाटक म्हणून बोलत होते.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष किर्ती अर्जुन, प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून आंध्र प्रदेश येथील आयआयआय टी'चे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. के. वेंकट सतीश, प्रमुख पाहुणे श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी प्रा.सचिन पंडित, अधिष्ठाता डॉ.मोना चिमोटे, तक्षशिला महाविद्यालय प्राचार्य डॉ. माधुरी फुले, धाबेकर कला महाविद्यालय खडकी येथील प्राचार्य डॉ. संजय देशमुख, विधी महाविद्यालय प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, उपप्राचार्य प्रा. प्रितेश पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट संचालित तक्षशिला महाविद्यालय आणि श्री संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय मंडळ दाभा संचालित श्री धाबेकर कला महाविद्यालय खडकी, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद घेण्यात आली. सुरूवातीला मान्यवरांनी परिसरातील श्री दादासाहेब गवई यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मान्यवरांनी वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, स्मृतीशेष दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते परिषदेचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. एआय परिषदेत अन्य राज्यासह जपान सारख्या देशातील जवळपास ५०० संशोधनकर्त्यांनी आपले रिसर्च पेपर (संशोधन) सादर केले.

उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. माधुरी फुले यांनी करून दिला. संचालन डॉ. वर्षा गावंडे, प्रा. आनंद देशमुख यांनी केले. उद्घाटन कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.प्रविण वानखडे, डॉ.नवल पाटील, डॉ. रविंद्र तायडे, डॉ.प्रणाली पेठे यांच्यासह प्रा. राखी बोंद्रे, प्रा. प्रियंका पवळे, प्रा.साक्षी पवार, प्रा. अपेक्षा भेडकर, प्रा. ऋतिका जावरकर, प्रा. काजल धांडे, प्रा. अश्विनी देव, प्रा. वैष्णवी इंगोले आदींनी परिश्रम घेतले.

### कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे प्रगतीला चालना : किर्ती अर्जुन

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानामुळे मोठा बदल होणार आहे. टूजी, फोरजीच्या पुढे जाऊन आज फाईव्ह जी आले. यामध्ये पुढे आणखी बदल होणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी देखील तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वतःमध्ये बदल करावा. उद्योजकता आणि शाश्वत विकासाला कशी चालना मिळू शकते, यावर शिक्षकांनी लक्ष केंद्रित करावे. बहु विद्याशाखीय दृष्टिकोनाचे महत्त्व ही परिषद अधोरेखित करेल, मत असे श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष किर्तीताई अर्जुन यांनी व्यक्त केले.

# ऑनलाइन फसवणुकीतील १९ लाख रुपये मूळ खातेधारकास परत

## -सायबर पोलिसांची मोठी कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** सायबर सेल पोलीस ठाण्यात दाखल २४ लाख ९८ हजार रुपयांच्या ऑनलाइन फसवणूक प्रकरणात अमरावती सायबर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत १९ लाख रुपयांची रक्कम यशस्वीरीत्या मूळ खातेधारकास परत मिळवून दिली आहे. वेळेत केलेल्या कारवाईमुळे मोठ्या आर्थिक नुकसानीपासून खातेधारकाची सुटका झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील तक्रारदार हे एका बँकेत कार्यरत कर्मचारी आहेत. बँकेच्या एका जुन्या व विश्वासार्ह करंट अकाउंटधारकाच्या नावाने एका अज्ञात मोबाईल क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने सुरुवातीला २ कोटी रुपयांची म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर पुन्हा कॉल करून आपली चेकबुक संपली असून तातडीने एका खात्यात पैसे पाठविण्याची गरज असल्याचे सांगितले. आरोपीने कंपनीच्या लेटरहेडवर बँक खात्याचा तपशील पाठवत २४ लाख ९८ हजार रुपये आरटीजीएसद्वारे त्वरित ट्रान्सफर करण्याची मागणी केली. संबंधित ग्राहक जुना व विश्वासार्ह असल्याने बँक कर्मचाऱ्याने ही रक्कम आरटीजीएसद्वारे पाठवली. मात्र काही वेळातच खरा खाताधारकाने बँक मॅनेजरला संपर्क साधून आपल्या खात्यातून २४.९८ लाख रुपये आरटीजीएस झाले असल्याची माहिती दिली आणि हा व्यवहार आपण केलेला नसल्याचे स्पष्ट केले. तपासात हे निष्पन्न झाले की, ज्यावरून कॉल आला होता तो मोबाईल क्रमांक खाताधारकाचा नव्हता. त्यामुळे अज्ञात व्यक्तीने खाताधारकाची ओळख बनवून बँकेची मोठी आर्थिक फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. तत्काळ सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून एनसीसीआरपी पोर्टलवर प्रकरण नोंदविण्यात आले. तपासादरम्यान फसवणुकीची रक्कम एका संशयित/वादग्रस्त बँक खात्यात ट्रान्सफर झाल्याचे आढळून आले. सायबर पोलिसांनी तात्काळ संबंधित बँकेशी संपर्क साधून १९ लाख रुपये फ्रिज (जमाकर) करून घेतले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ही संपूर्ण रक्कम मूळ खाताधारकाच्या खात्यात परत जमा करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त रमेश धुमाळ तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या नेतृत्वात पार पडली. सायबार फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी संशयास्पद कॉल, ई-मेल अथवा तातडीच्या आर्थिक मागण्यांपासून सावध राहावे व अशा प्रकारच्या घटनांची त्वरित सायबर पोलिसांकडे तक्रार करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# खा.अमर काळे यांची शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तालुक्यातील निमगाव येथे कर्जबाजारीपणा, सततची नापिकी आणि शेतमालाला मिळणारे अल्प दर यामुळे शेतकरी अतुल अशोकराव इंगळे (वय ३६) यांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी आपल्या घुईखेड दौऱ्यातून वेळ काढून निमगाव येथे इंगळे कुटुंबाची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

खासदार अमर काळे यांनी कुटुंबातील प्रत्येक सदस्याशी व्यक्तिशः संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. अतुल इंगळे यांच्या पश्चात दोन मुली, वृद्ध आई-वडील व बहीण असा परिवार असून संपूर्ण उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून होता. सातत्याने होणारी नापिकी, उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतमालाला न मिळणारा भाव, खाजगी बँकांचे कर्ज व यंदाच्या अतिवृष्टीमुळे वाढलेला आर्थिक ताण या सगळ्यांनी कुटुंबाची स्थिती अधिकच बिकट झाली होती.



या प्रसंगी चांदूर रेल्वे तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पदाधिकारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. शेतकरी कुटुंबाला तत्काळ मदत व दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# पी.आर.पोटे पाटील स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

या क्रीडा महोत्सवात सॅक रेस, बलून रेस, बास्केट बॉल, गोळा फेक, बुक बॅलन्स अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदके देऊन गौरविण्यात आले.

शाळेचे प्राचार्य व उपप्राचार्य यांनी सहभागी व विजेत्या विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# जुळया शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबध्द

## -अचलपूरच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुपाली माथने

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार रुपाली अभय माथने यांचा ऐतिहासीक विजय झाला आहे . परतवाडा शहरातील कल्याण मंडपम मध्ये संपन्न झालेल्या मत मोजनित पहिल्या फेरीपासून ते वीस फेरी पर्यंत त्यांनी मोठया मताची लीड घेतली .यानंतर नवनियुक्त नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांच्या समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला.यावेळी कल्याण मंडपम मध्ये भाजपा चे मा.आ. प्रवीण पोटे पाटील,अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,आ.राजेश वानखडे ,जिल्हा सरचिटणीस सुधीर रसे,तुषार खेरडे आदी नेते मंडळी उपस्थितीत होते.



यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांना प्रमाणपत्र देण्यात आले. नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुपाली अभय माथने या दुचाकी वाहन स्कूटी वर आल्या.त्यांच्या या साध्या राहणीमानाची चर्चा सर्वत्र सुरू आहे. जुळया शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबध्द राहणार असल्याचे प्रतिपादन ही त्यांनी यावेळी केले.

# आकाशवाणी अमरावतीवर 'गर्भाशियाचे मानसशास्त्र' विषयावर विशेष आरोग्य संवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** आकाशवाणी अमरावती केंद्रावर प्रसारित होणाऱ्या 'आरोग्य संवाद' या विशेष कार्यक्रमात गर्भाशयाचे मानसशास्त्र या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर श्रोत्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात प्रसिद्ध गर्भपूर्व आरोग्यतज्ज्ञ डॉ. ऐश्वर्या अंबाडेकर यांच्याशी शामली देशमुख यांनी सखोल संवाद साधला आहे. या चर्चेमध्ये गर्भावस्थेतील मानसिक अवस्था, आईच्या भावना व विचारांचा गर्भातील बाळाच्या विकासावर होणारा परिणाम, तसेच सकारात्मक गर्भसंस्कारांचे वैज्ञानिक महत्त्व यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रसारित होणार असून, कार्यक्रमाचे सादरीकरण आशिष गावंडे यांनी केले आहे.






श्रोते हा कार्यक्रम FM १०१.५ MHz – आकाशवाणी अमरावती वर ऐकू शकतात. तसेच हा कार्यक्रम News On Air या मोबाईल ॲपवरही उपलब्ध राहणार आहे. गर्भवती महिला, कुटुंबीय तसेच आरोग्यविषयक जाणीव असलेल्या सर्व श्रोत्यांनी हा माहितीपूर्ण व प्रेरणादायी कार्यक्रम नक्की ऐकावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वाघोली येथे संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम

**काटपुर/प्रतिनिधीः-** नजीकच्या वाघोली (माहुली ) येथे संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त व डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . सर्वप्रथम संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण पूज्य भंते प्रज्ञाबोधी व भंते कौंडण्य तसेच भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस गणपतराव तिडके व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . यानंतर पूज्य भंते प्रज्ञा बोधी यांनी उपस्थितांना धम्मदेशना दिली.

दुसऱ्या सत्रात भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून प्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला . यावेळी धम्मपिठावर भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस गणपतराव तिडके, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश इंगळे, कार्यक्रमाचे आयोजक नंदकुमार खंडारे,रामटेके सर, पुण्यवर्धन राऊत, सामाजिक कार्यकर्ते कैलास पाटील, सालोरा येथील सरपंच बेबी हरडे, मनिषा बारबुदे सरपंच वाघोली, ऊपसरपंच रवी चव्हाण, ज्योती तायडे,रवींद्र कडू इत्यादी मान्यवर धम्मपिठावर विराजमान होते . कार्यक्रमाचे प्रस्ताविक आयोजक नंदकुमार खंडारे यांनी केले . यानंतर प्रकाश इंगळे यांनी संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून उपस्थितांना गाडगे महाराजांची सामाजिक व धार्मिक उत्क्रांतीवादावर प्रकाश टाकून महाराजांचे कार्य विशद केले . यानंतर अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून संतांच्या जयंती व पुण्यतिथी साजरा करण्यामागचा उद्देश सांगितला . अध्यक्षीय भाषणातून जिल्हा सरचिटणीस गणपतराव तिडके यांनी महाराष्ट्राची होत चाललेली दुर्दशा व आजची राजकीय व सामाजिक परिस्थिती यावर विचार मंथन केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश भालेराव व रवींद्र कडू यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता गौरव मनोहर, मनोज खडसे, प्रीतम खडसे, संगम खंडारे, प्रतीक खंडारे, राजेश बोरकर, सचिन रामटेके, रोहित रामटेके, सचिन मनोहर व गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सव समिती वाघोली यांनी परिश्रम घेतले.



# राजर्षी शाहू सायन्स कॉलेजमध्ये संत गाडगेबाबा यांना अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक राजर्षी शाहू सायन्स कॉलेज मधील कला, संगीत व सांस्कृतिक समितीद्वारे महान समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सदर समितीच्या वतीने संत गाडगेबाबा यांचे विचार तसेच समाजासाठी केलेले महत्त्वपूर्ण कार्य यांचे धडे विद्यार्थ्यांना कळावे या अनुषंगाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व स्वर्गीय अतुल जगताप माध्यमिक महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांसाठी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर तसेच त्यांच्या कार्यावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. निबंध स्पर्धेत दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग घेतला. संत गाडगेबाबा यांच्या जीवनातील महत्त्वाच्या कामाचे स्वरूप स्पष्टपणे त्यांनी त्यात मांडले. विद्यार्थ्यांमध्ये मानवता, प्रामाणिकपणा आणि स्वच्छतेचा संदेश जाणून घेण्यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती.

तसेच कॉन्व्हेंट शाळेतील विद्यार्थ्यांनी सुद्धा वेशभूषा या स्पर्धेत मोठा सहभाग घेतला होता. सदर कार्यक्रमाद्वारे प्रत्येकाच्या मनात थोर महान पुरुष संत गाडगेबाबा यांच्या जीवनाचे महत्त्व पोहोचले पाहिजे या उद्देशाने निबंध व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं. १९-डी मधील नझुल प्लॉट नं. १७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

# मतदान जनजागृतीच्या घोषणानी दुमदुमाला परिसर

## -Sveep अंतर्गत जमील कॉलनी परिसरात आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी महानगपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी तसेच अमरावती शहरातील प्रत्येक परिसरात मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती व्हावी या उद्देशाने उपक्रम राबविण्यात येत असून याकरिता मनपा उर्दू हायस्कूल व मनपा उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्रमांक आठ यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील जमील कॉलनी परिसरात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.



यावेळी स्वीप विभागाचे sveep प्लॅन नियंत्रक तथा शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम,पंकज कुमार सपकाळ सहा. कार्यक्रम अधिकारी,शाळा निरीक्षक योगेश पखाले, शाळेचे मुख्याध्यापक युसुफ खान तसेच हायस्कूलचे मुख्याध्यापक सईद सर, स्वीप विभागातील सदस्य कैलास कुलट,उज्वल जाधव, योगेश राणे,सुमेश वानखडे,संजय बेलसरे, निजामउद्दीन काझी, शुभांगी सुने हे प्रामुख्याने उपस्थित होते. जनजागृती रॅली दरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांना व उपस्थित पालकांना मतदानाबाबत शपथ सुद्धा देण्यात आली तसेच परिसरातील गर्दी असणाऱ्या चौकाचौकातून तसेच गल्लीगल्लीतून ही रॅली काढून मतदान करणे का गरजेचे आहे याबद्दल मतदारांमध्ये जागृती करण्यात आली.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०८**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर सूचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **रविंद्र पांडुरंग बडगुजर,** रा.झेंडा चौक, राजापेठ, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी १) शांताराम अमृत उमाळे, रा.शंकर नगर, अमरावती, २) पुरुषोत्तम अमृत उमाळे, रा.सूदर्शन बिल्डीगजवळ, दस्तूर नगर, अमरावती, ३) विनोद अमृत उमाळे, रा.फरशी स्टॉपजवळ, विठ्ठलार्पण कॉलनी, अमरावती, ४) द्वारकाबाई रामकृष्ण उमाळे, रा.झेडा चौक, राजापेठ, अमरावती, ५) सुधीर रामकृष्ण उमाळे, रा.देशमुख लॉन, अमरावती, ६) विजय रामकृष्ण उमाळे, रा.झेंडा चौक, राजापेठ अमरावती, ७) सुनिता गणेशराव टोपले, रा.झेंडा चौक, राजापेठ, अमरावती, ८) शैलेजा दिलीप भुजाडे, रा.वडोदरा, गुजरात,६ उषा दिनकर उमाळे, राएमआयडीसी रोड, दस्तूरनगर रोड, अमरावती, १०) सुशांत दिनकर उमाळे, रा.खडी मशीन चौक, पुणे, ११) विवेक दिनकर उमाळे, रा.दस्तूर नगर, अमरावती, १२) उज्वला सुनील उमाळे, रा.चैतन्य नगर, नांदेड, १३) शर्वरी सुनील उमाळे, रा.चैतन्य नगर, नांदेड, १४) हेमंत शांताराम उमाळे, रा.शिवछाया कॉलनी, अमरावती यांचे सोबत त्यांचे मालकीची खालील वर्णनांकित मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे--

**मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर विभाग कचेरीचे कक्षेतील व महानगरपालिका अमरावतीचे हद्दीतील मौजे-राजापेठ, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नझूल शिट नं.५४/डी, नझूल प्लॉट नं.५२, याचे पी.आर.कार्ड नुसार एकुण क्षेत्रफळ २५९.४० चौ.मी. असून यावर करण्यात आलेले लोडबेअरिंक पध्दतीचे बांधकाम विटा सिमेंटचे असून वरील छत स्लॅबचे आहे. यात असलेल्या तळमजल्यावर तीन व्हरांडा, तीन हॉल, तीन बेडरुम, तीन किचन, दोन संडास-बाथरुम, जिना, इलेक्ट्रिक मिटर फिटींगसह व नळ कनेक्शनसह, बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे २००० चौ.फुट आहे. यात असलेल्या तदंगभूत वस्तूसह याचा वार्ड नं.सी-६ असून मालमत्ता नं.३२१ आहे. याची चतुःसिमा--

पुर्वेस - ढोले यांचे घर
पश्चिमेस - गुप्ता यांचे घर
उत्तरेस - सर्विस रोड
दक्षिणेस - रोड

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्तेबद्दल कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, ताबा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध, कर्ज, गहाण, बोझा, बक्षीस, वारसा हक्क इत्यादी कोणत्याही प्रकारे हितसंबंध, पुवीचा करार, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी पुराव्यासहीत समक्ष संपर्क करावा व लेखी पोच घ्यावी. अन्यथा वरील मुदतीनंतर माझे पक्षकार वर नमुद मालमत्तेचे/जागेसह घराचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील. त्यानंतर कोणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत, अगर उजर चालणार नाही, कृपया याची आम जनतेने नोंद घ्यावी.

**दिनांक २४.१२.२०२५**

**(ॲड.पी.डब्ल्यू.तायडे)**
**राहूल नगर, कॅम्प अमरावती**

## नगर पंचायत, नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती

### निविदा सूचना

**जा.क. नपनाखं/स्व.वि./** **दिनांक २२.१२.२०२५**

### (स्वच्छता विभाग)

मुख्याधिकारी, नगर पंचायत, नांदगांव खंडेश्वर यांचे वतीने स्वच्छता विभाग अंतर्गत भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे, जंतुनाशक देणे, रेबीज रोगाचे लसीकरण करणे, ओळखीसाठी कान नॉचिंग/टॅटू लावणे व त्यांच्यावर उपचार व देखभाल करणेसाठी एजन्सी नियुक्त करणे संबंधित कामासाठी द्वी-लिफाफा पध्दतीने पंजीबध्द महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत परवानाधारक, कंत्राटदार यांच्याकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा संबंधित अटी व शर्ती कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

**निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| निविदा फी | ५००/- |
| निविदेसोबत भरावयाची सुरक्षा अनामत रक्कम | १५००/- |
| कामाचा कालावधी | आदेश निर्गमित केल्यापासून १२ महिने |
| निविदा प्रसिध्द दिनांक | दिनांक २६.१२.२०२५ |
| निविदा स्विकृतीचा दिनांक | दि.२६.१२.२०२५ ते ३१.१२.२०२५ रोजी ३.०० वाजेपर्यंत |
| निविदा दस्तऐवज दाखल करण्याचा दिनांक | दि.२६.१२.२०२५ ते ३१.१२.२०२५ रोजी ३.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक (शक्य झाल्यास) | दिनांक ३१.१२.२०२५ दुपारी ५.०० वाजता |

**स्वाक्षरी/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर पंचायत, नांदगांव खंडेश्वर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### शिराळा येथे डाक चौपाल कार्यक्रम

**शिराळा-** येथील म्हस्के भवन येथे डाग विभाग, अमरावती पोस्टल डिव्हिजन यांच्या वतीने शिराळा तालुका अमरावती येथे दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे डाक चौपाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक पालक व मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. या वेळी सुनिल हिवराळे, सहाय्यक अधीक्षक डाकघर अमरावती सेंटर सब डिव्हिजन यांनी पैशांचे महत्व मनी माइंडसेट व त्यात बदल करण्याची गरज यावर उदाहरणे व गावकऱ्यांच्या वास्तव जीवनातील कथाव्दारे प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात पोस्ट आफीस बचत खाते, जनरल इन्शुरन्स पोस्टल, लाईफ इन्शुरन्स व ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स तसेच डाग विभागाच्या सर्व इतर योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.शेवटी उपस्थितांनी माझे कुटुंब माझी जबाबदारी अभियानांतर्गत कुटुंब व गांव सुरक्षित करण्याची शपथ घेतली.निलेश चिकटे डाक कर्मचारी यांनी स्वागत व आभार मानले. चेतन राऊत विभाग अधिकारी यांनी बाबत सविस्तर माहिती दिली. महिमा चावला शाखा डाकपाल यांनी ग्राहकांच्या गरजेनुसार सर्व पोस्टल सेवा वचनबध्दता व्यक्त केली.

### चांदूर बाजार येथे राष्ट्रीय ग्राहक दिन

**चांदूर बाजार-** ग्राहकाने आपल्या हक्कासाठी जागृत होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्यांची फसवणूक केव्हाही होवू शकते. असे विचार ब्रम्हानंद तिवारी यांनी व्यक्त केले. तहसील कार्यालयात झालेल्या राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चांदुर बाजार ग्राहक पंचायतचे अध्यक्ष ब्रिजमोहन हरकुट होते. प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष ग्राहक पंचायत चांदुर बाजार मदन भाटे होते. निवासी नायब तहसिलदार लक्ष्मीकांत तिवारी, नायब तहसिलदार मनोज सोनारकर, रास्त भाव दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश उल्हे उपस्थित होते.

### खोलापूर येथील चर्चवर रोषणाई

**वाठोडा शुक्लेश्वर -** भातकुली तालुक्यातील खोलापूर येथील संत पीटर चर्चवर ख्रिसमसनिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. सायंकाळी ७ वाजता प्रार्थना करण्यात आली. फादर कॉर्नर लिव्हस यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. २५ डिसेंबर रोजी चर्चमध्ये परिसरातील नागरिकांची शुभेच्छा देण्यासाठी देखील गर्दी उसळली आहे. परिसरातील सर्व नागरिकांना चर्चमध्ये पेढे मिठाई देऊन नाताळाच्या शुभेच्छा दिल्या.



### क्रिसमसनिमित्त मतदान हक्काबाबत मार्गदर्शन

**अमरावती-** झोन क्रमांक चार अंतर्गत दस्तूर नगर व वडाळी परिसरातील चर्चमध्ये आज क्रिसमस दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व नागरिकांना क्रिसमस दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रमादरम्यान अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपला मतदार हक्क बजावावा, यासाठी विशेष शपथ घेण्यात आली. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्व, जबाबदार नागरिक म्हणून सहभाग आणि निर्भय व निष्पक्ष मतदान करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.तसेच उपस्थितांना निवडणूक प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाची नोंदणी, मतदानाचा दिवस, तसेच मतदान करताना पाळावयाच्या नियमांची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये जागरूकता वाढल्याचे चित्र दिसून आले.

### संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथीनिमित्त भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात सामाजिक जाणीवेचा जागर'



**परतवाडा -** भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे आज सामाजिक जाणीवा आणि मूल्यांची प्रेरणा देणारा विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे परिसरात उत्साहाचे विशेष वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रा. खंडेराव, यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक मूल्यांची जाण, कर्तव्यभावना आणि शैक्षणिक प्रगती यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, 'समाज आणि राष्ट्रनिर्माणात तरुणाईची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. खंडेराव, प्रा. डॉ. गारोडे, प्रा. डॉ.भागवत, प्रा. डॉ. धोंडगे, प्रा. डॉ. कडू, प्रा. खांडेकर, प्रा.शेळके, प्रा. धोंडे, प्रा. तायडे, प्रा. राणे, प्रा.जयस्वाल, प्रा. जीवन सोळंके, प्रा. वैष्णव, प्रा.किल्लेदार, प्रा. वानखडे, प्रा. पाखरे, प्रा.केदार, प्रा. निंभोरकर, प्रा.नवरे, प्रा. चिंचमलातपुरे, एस.गावंडे, डी. भागडकर, एस घोगे, राजेश बच्छ, विलास जाधव, परमेश्वर खांडेकर, प्रमोद मेटकर , विनोद दुर्गे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापिका स्वाती वानखडे यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमातील सर्व सहभागी, उपस्थित शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.त्यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# चिखलदऱ्यातील 'स्काय वॉक' पर्यटनाला नवी झळाळी

## भारतातील सर्वात लांब काचेचा पूल; प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

**अमरावती/क्रा.प्र.**

भारतातील सर्वात लांबीचा काचेचा पूल (स्काय वॉक) हा विदर्भातील चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणी उभारला जात आहे. या पुलाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. पुलाच्या संरचनात्मक आणि तांत्रिक चाचण्यानंतर हा पूल पर्यटकांसाठी सज्ज होणार आहे. या काचेच्या पुलावरून चालताना पर्यटकांना थरारक अनुभव येणार आहे.

चिखलदरा येथील भीमकुंड धबधबा. प्रसिद्ध आहे. या धबधब्याच्या दरीवरून पर्यटकांना 'स्काय सायकल'चा रोमांचक अनुभव घेता येतो. याशिवाय 'जायंट स्वींग' म्हणजेच दरीच्या काठावरून उंच झोक्याचा रोमांच पर्यटकांना आकर्षित करतो. 'झीपलाईन','जायरो राईड' 'रॅपलिंग' हे साहसी प्रकारही अनुभवायला मिळतात. आता त्यात 'स्काय वॉक'ची सफर घेता येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ मध्ये चिखलदरा विकास आराखडा मंजूर केला होता. या विकासकामांची जबाबदारी सिटी ॲन्ड इंडस्ट्रज डेव्हलपमेंट ५३८ पर्पोरेशनकडे (सिडको) सोपवली होती. यात चिखलदरा येथील हरिकेन पॉईंट ते गोराघाट दरम्यान भारतातील सर्वाधिक ४०७ मीटर लांबीच्या 'स्कायवॉक' चा समावेश आहे.स्काय वॉकची उंची २८० मीटर (अंदाचे ५९४ फूट) आहे. या स्काय वॉकचे फ्लोअर १२ मिलीमीटर जाडीच्या त्रिस्तरीय काचेचे असणार आहे. एकाचवेळी ५०० पर्यटकांचा भार सांभाळण्याची तसेच प्रतितास १९० किलोमीटर गतीचा वारा झेलण्याची क्षमता या काचेची राहणार आहे. हरिकेन आणि गोराघाट यादरम्यान सर्वसाधारण वाऱ्याचा वेग ताशी १६० किलोमीटर असतो. या प्रकल्पावर सुमारे १४० कोटी रुपये खर्च होत आहेत. इंदूर येथील ॲपिकॉन कंस्ट्रक्शन कंपनीला या कामाचे कंत्राट देण्यात आले आहे.या स्काय वॉकच्या ४० मीटर उंचीच्या पिलरच्या कामाला फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरुवात होऊन प्रकल्प फेब्रुवारी २०२१ मध्ये पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते. मात्र, सिडकोने आवश्यक त्या परवानग्या न घेताच काम सुरू केल्यामुळे परवानगीच्या फेऱ्यात हा महत्त्वपूर्ण प्रकल्प अडकला होता. वन मंत्रालयाने घालून दिलेल्या अटी आणि शर्तीची पूर्तता केल्यानंतर या प्रकल्पाच्या कामाला पुन्हा सुरूवात झाली. आता या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

**पर्यटनाला चालना मिळेल**

चिखलदरा येथे स्काय वॉकचे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळू शकेल. स्काय वॉक हे चिखलदरासाठी एक महत्वाचे केंद्र ठरणार असून पर्यटकांचा ओघ वाढेल, असे चिखलदरा हॉटेल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्रीवर्धन करंडे यांनी सांगितले.



# बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर : कुलगुरू

**अमरावती/का.प्र.**

मायबापांना बेघर करणे ही गंभीर समस्या असून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू या नात्याने मला या बेघर बांधवांसाठी जी काही मदत करायची आहे, ती मी नक्कीच करेल. या बेघर बांधवांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी भारतीय जैन समाज संघटनेचे अध्यक्ष सुदर्शन गांग, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट, विदर्भ कुष्ठरोगी सेवा संस्था, तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे



समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त असलेले डॉ. प्रफुल्ल गवई, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर, बार्टीच्या प्रकल्पाधिकारी अनिता गवई आदी मान्यवर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आधार केंद्रातील व्यवस्थापन व स्वच्छतेबाबत आधार केंद्राच्या व्यवस्थापक ज्योती राठोड आणि पब्लिक एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तथा आधार केंद्राचे संचालक राजे बसवनाथे यांचे कौतुक करुन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्यात. तसेच आधार केंद्र बेघर बांधवांसाठी चांगले कार्य करीत असून त्यांच्या मदतीसाठी विद्यापीठ सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी सांगितले.

अमरावती महानगरपालिकेच्या राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत पब्लिक एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा केंद्राला सादिच्छा भेट दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योति राठोड, सूत्रसंचालन राजू बसवनाथे यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. सुभाष गवई यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहित घोंगडे, विलास थोरात, किशोर मरकाम व निवारावासीयांनी परिश्रम घेतले.

# कस्तुराबाई जैन विद्यालयात गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी



**शिराळा -** महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालय शिराळा येथे कर्मयोगी संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सर्व प्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.

यानंतर विद्यार्थ्यांनी फलकाव्दारे स्वच्छतेचा संदेश देवुन गावातुन रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांच्या जिवन चारित्र्यावर भाषणे दिली. कस्तुराबाई जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन देशमुख, शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# टोंगलापूर फाटा येथे जिल्हास्तरीय स्वदेशी खेळ क्रीडा स्पर्धाचा समारोप

**आसेगाव पूर्णा/**

सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचालित पयोष्णी गुरुकुलम् प्राथमिक मराठी शाळा व निवासी मूकबधिर विद्यालय, टोंगलापूर फाटा, मासोद यांच्या संयुक्त विद्यमाने अपंग अनाथ पुनर्वसन केंद्र, टोंगलापूर फाटा येथे आंतरशालेय जिल्हास्तरीय स्वदेशी खेळ क्रीडा स्पर्धाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. उद्घाटन मा. राजेंद्रजी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बच्चूभाऊ कडू होते. यावेळी डॉ. नयना कडू, प्रांजली बारस्कर, कौशल्य विकास व उद्योजकता कार्यालय, संस्था सचिव राहुल म्हाला, श्रीकृष्ण पखाले, डॉ. हरीशजी काळे, शिंगणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उद्घाटक राजेंद्रजी जाधव व अध्यक्ष बच्चू कडू यांचे स्वागत संस्था सचिव राहुल यांनी पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन केले.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरी-



चौथीच्या वियापर्यासाठी कबड्डी, लंगडी, पोत्याची शर्यंत, तसेच जिल्ह्यातील मूकबाधिर विद्यालयांत्रणा विद्यार्थ्यांसाठी पोत्याची शर्यंत व दोरीवरील उड्या या स्पर्धा घेण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी लगोरी, रस्सीखेच, १०० मीटर धावणे, तर दिव्यांग मूकबाधिर विद्यार्थ्यांसाठी ५० व १०० मीटर धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धा सहाय्यक राहुल खाटकर, संयोजक भूषण जाणे, पंचप्रमुख संजयजी सोळंके यांच्यासह वानखडे, उईके, दंडाळे, भटकर, नागले, ऋषिकेश पोहोकार यांनी पंच म्हणून जबाबदारी पार पाडली.

यावेळी

अशोक जाधव, दिनेश आमझरे, डॉ. हरीशजी काळे, चंद्रशेखरजी मोहोड, विक्रम भाऊ कडू, जितेंद्रजी ढोले,अरविंद राऊत, पंकज उईके, नवीन दंडाळे, दीप्ती, नीरज तिवारी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. गुणांच्या आधारे इयत्ता तिसरी-चौथी गटात उपविजेता पयोष्णी गुरुकुलम् प्राथमिक मराठी शाळा, टोंगलापूर फाटा तर विजेता- राष्ट्रसंत गुरुकुल प्राथमिक आश्रम शाळा, आसेगाव पूर्णा ठरली. दिव्यांग मूकबधिर गटात उपविजेता निवासी मूकबधिर विद्यालय, टौगलापूर फाटा, मासोद, तर विजेता- संत गाडगेबाबा निवासी मूकबधिर विद्यालय, परतवाडा यांना फिरता चषक प्रदान करण्यात आला. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री शेंडे व स्नेहल घुलक्षे, तर आभार प्रदर्शन शिक्षक संदीप पाटील यांनी केले. अशा प्रकारे खेळ, संस्कार समतेचा संदेश देणाऱ्या या क्रीडा स्पर्धांचा यशस्वी समारोप झाला.

## विद्यापीठात अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती



**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासन दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्याबद्दल माहिती डॉ. नांदुरकर यांनी दिली.

# जि.प.प्राथमिक मराठी शाळा सायत येथे केंद्र आसराची शिक्षण परिषद

**भातकुली/ अमरावती**

पं. स.भातकुली अंतर्गत केंद्र आसरा मधिल सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळेतील मुख्याध्यापक, विषय शिक्षक,सहायक शिक्षक,शिक्षिका यांच्या शिक्षण परिषदेचे आयोजन बुधवार दिनांक २४डीसेंबरला जि.प.प्राथमिक मराठी शाळा सायत येथे करण्यात आले होते.

सर्वप्रथम आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या शुभहस्ते पूजन करून प्रतिमेला हारार्पण करून व सामूहिक प्रार्थना चे गायन करून शिक्षण परिषदेला सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम जि.प.प्राथमिक मराठी शाळा सायत येथील विद्यार्थीनी यांनी इंग्रजी मध्ये उत्कृष्ट व कौतुकास्पद असा परिपाठ सादर केलानंतर

पुष्पगुच्छ देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले,व शिक्षण परिषदेला सुरुवात करण्यात आली.

शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक शैलेंद्र स.दहातोंडे (केंद्रप्रमुख,आसरा) यांनी केले, या शिक्षण परिषदेमध्ये शैलेंद्र स.दहातोंडे (केंद्रप्रमुख आसरा) इलियास खान सर, सतीश वानखडे सर (विषय तज्ञ),श्रीमती प्रज्ञा रामटेके मॅडम (फिरते शिक्षिका)श्री.दिपक चिंचे सर,श्री.शैलेश मांदळे सर,व श्री.सुनिल वानखडे सर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या शिक्षण परिषदेला

श्रीमती अन्नपूर्णाताई मानकर (सरपंच,सायत ), मंगेश मोहोड (अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती सायत) मा.अशोक राऊत (पोलीस पाटील, सायत), व शैलेंद्र स.दहातोंडे (केंद्रप्रमुख आसरा उपस्थित होते.

शिक्षण परिषदेला केंद्र आसरा मधिल सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक,विषय शिक्षक,सहायक शिक्षक शिक्षिका उपस्थित होत्या.

शिक्षण परिषदेचे संचालन प्रशांत भाकरे सर (सहा. शिक्षक,सायत ) यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमोल आखाडे सर (मुख्याध्यापक, सायत) यांनी केले

शिक्षण परिषदेच्या यशस्वितेकरिता जि.प.प्राथमिक माध्यमिक मराठी शाळा,सायत मधिल सर्व शिक्षक, ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

'तन-मन-धन से सदा सुखी हो' याराष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या राष्ट्रवंदनेने शिक्षण परिषदेची सांगता करण्यात आली.

# रेशन दुकानदारांना मिळणार 'आदर्श' पुरस्कार

## पुरवठा विभागाचा नवीन उपक्रम

**तिवसा/ वार्ताहर**

आज शासकीय सेवेतील अनेक कर्मचाऱ्याना शासनाद्वारा आदर्श पुरस्कार देण्यात येतो. त्याच धर्तीवर शासनासाठी काम करणाऱ्या रास्त भाव दुकानदार यांच्या कार्याची दखल घेऊन पुरवठा विभाग तहसील कार्यालय, तिवसा द्वारा 'श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आदर्श रेशन दुकान' हा उपक्रम सुरु केला आहे. रास्त भाव दुकानदार बंध - भगिनींच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे कार्य कौतुक व्हावे, तसेच कार्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता अमरावती जिल्ह्यात प्रथमच असा उपक्रम सुरु केल्याचे निरीक्षण अधिकारी शीतल आंबटकर यांनी सांगितले.

मुख्य सभागृह तहसील कार्यालय तिवसा येथे निवासी नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर यांचे अध्यक्षेत राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी तालुक्यातील बहुसंख्य रास्त भाव दुकानदाराच्या उपस्थितीत पुरवठा निरीक्षक एस.एस.वानखडे यांनी ग्राहक संरक्षक कायदा २०१९ बाबत माहिती दिली. तिवसा तालुका हा अनेक थोर संताची कर्मभूमी असल्याने येथील शासकीय आस्थापना सर्वांगसुंदर व आदर्श असावे या उद्दिष्टाने हा उपक्रम नवीन वर्षात राबविल्या जाणार असून एकूण आठ विषयाचे मूल्यमापन करून रास्तभाव दुकानांची प्रतवारी ठरविली जाणार आहे. यामध्ये फलक, विविध दस्तऐवज,कार्यालयीन आदेश पूर्तता, स्वच्छता व टापटीप, सामाजिक उत्तरदायीत्व, गतीशील धान्य वाटप, लाभार्थी सुविधा, दुकान उपलब्धता, अद्यावत राशन कार्ड, सायलेंट रेशन कार्ड आदी आठ विषयासाठी एकूण १०० गुणांचे मूल्यमापन होणार आहे. पुरवठा विभागातील अधिकारी यांचे प्रत्यक्ष रास्तभाव दुकान भेटीदरम्यान आठ मुद्यांचे अवलोकन केले जाणार आहे. पुढील वर्षी २६ जानेवारीला मान्यवरांच्या हस्ते तालुक्यातील उत्कृष्ठ तीन दुकानाला सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

संपर्क व्यक्तीची नियुक्ती - पुरवठा विभागातील माहितीचे आदान प्रदान गतिमान होण्याच्या उद्देशाने तालुक्यातील कार्यकुशल व तंत्रज्ञानात प्रगत असलेल्या निवडक दुकानदारांची संपर्क व्यक्ती म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये अंकुश प्रधान, आशिष माहुरे, इरफान हुसैन, महेश वानखडे,नरेश भोयर, नितीन इंगोले, निलेश कठाणे, योगेश इंगोले आदींचा समावेश आहे.

# मनपात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी जयंती



**अमरावती -** माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती निमित्य अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांचे हस्ते अटल बिहारी वाजपेयी यांचे प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले.यावेळी शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, विनोद मार्वे, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# चिचफैलमध्ये नायलॉन मांजावर कारवाई

## -२० हजारांचा प्रतिबंधित साठा जप्त -राजापेठ पोलिसांचा छापा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाने पूर्णतः बंदी घातलेल्या नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात राजापेठ पोलिसांनी चिचफैल परिसरात ठोस पाऊल उचलत धडक कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे एका घरावर टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित नायलॉन मांजा साठवून ठेवलेला आढळून आला असून, सुमारे २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी संबंधित इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शशीकांत सुभाषराव काटे (वय ५२, रा. चिचफैल, अमरावती) हा आपल्या राहत्या घरी बंदी असलेला नायलॉन मांजा विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवल्याची खात्रीलायक माहिती राजापेठ पोलिसांना २३ डिसेंबर रोजी मिळाली होती. या माहितीची पडताळणी करून २५ डिसेंबर रोजी पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत त्याच्या घरावर छापा टाकला. तपासणीदरम्यान मोनो काईट कंपनीच्या १७ चकऱ्या (अंदाजे किंमत १२ हजार रुपये) तसेच गोल्ड कंपनीच्या ८ चकऱ्या (अंदाजे किंमत ८ हजार रुपये) असा एकूण २५ चकऱ्यांचा प्रतिबंधित नायलॉन मांजा साठा हस्तगत करण्यात आला. कोणतीही वैध परवानगी नसताना हा मांजा विक्रीसाठी साठवून ठेवल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेशकुमार ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे व सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे यांच्यासह सागर सरदार, पवन तिवारी, दिनेश भिसे, संजय कडू आणि अंकुश काळे यांनी ही धडक कारवाई केली. नायलॉन मांजामुळे नागरिक, दुचाकीस्वार, पक्षी तसेच ☞(पान २ वर)

# माजी सरपंच महिलेची राहत्या घरी आत्महत्या

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील गायवाडी ग्रामपंचायतीच्या माजी महीला सरपंचा यांनी दर्यापूर शहरातील नारायण नगर येथील राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना गुरवारी (दि.२५ ) दुपारच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान घटनेची माहिती शहरात पसरताच नागरिकांनी गर्दी केली होती. अल्का प्रमोद साखरे (वय ५१ ) असे मृत महिलेचे नाव आहे. दरम्यान अल्का साखरे या गायवाडी ग्रामपंचायतध्ये ५ वर्षे सरपंच म्हणून पदावर कार्यरत होत्या. गुरुवारी घरी कुणी नसताना अल्का साखरे यांनी दुपारी तीन वाजताच्या सुमारास बेडरुममधील छताच्या पंख्याला साडीच्या मदतीने गळफास लावून आपली जिवनयांत्रा संपवली. घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलीस स्टेशनचे हरिहर गोरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन ☞(पान २ वर)

# वाहत्या कॅनॉलमध्ये पतीने पत्नीला ढकलले

## -पत्नीला जीवे मारण्याचा प्रयत्न फसला

### -चक्क झाडाने वाचविले महिलेचे प्राण

**तिवसा/प्रतिनिधीः-** आत्याकडे जाण्यास निघालेल्या पत्नीला दुचाकीने सोडून देण्याची बतावणी करून तिला चक्क पतीने पाण्याने भरून वाहणाऱ्या कॅनॉलमध्ये फेकले व घटनास्थळावरून पळ काढला.मात्र म्हणतात ना,की 'देव तारी, त्याला कोण मारी'नेमका असाच प्रत्यय या घटनेत आला आणि कॅनॉलच्या पाण्यात असलेल्या एका झाडाचा सहारा घेऊन त्या महिलेचे प्राण वाचले.घटनेनंतर पळून गेलेल्या आरोपी पतीसह एका अल्पवयीन बालकास तिवसा पोलिसांनी तातडीने अटक करून गुन्हा दाखल केला आहे.



शिवा सवले (रा.करजगाव) व एक १७ वर्षीय अल्पवयीन बालक असे या घटनेत अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.तिवसा पासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या पिंपळखुटा मोठा नजीकच्या कॅनॉलजवळ ही घटना घडली.

प्राप्त माहितीनुसार,पती-पत्नी हे काही कारणास्तव विभक्त राहत होते मात्र त्यांचा फोन वर संवाद सुरू राहायचा.अश्यातच फिर्यादी २१ वर्षीय पत्नी ही आकोट येथे आत्याकडे जाण्यास निघाली असता तिने पतीला याबाबत सांगितले,तेव्हा आरोपी पती शिवा याने तिला मीच सोडून देतो असे सांगितले. तिला दुचाकीवर बसवुन सोबत एका अल्पवयीन बालकास घेतले व सातरगाव मार्गे निघाले असता पिंपळखुटा नजीकच्या एका कॅनॉलजवळ शिवाने गाडी थांबवून बालकाच्या मदतीने तिचे हात-पाय पकडून कॅनॉलमध्ये फेकून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र 'देव तारी, त्याला ☞(पान २ वर)

# बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात निदर्शने

## -राजकमल चौकात बजरंग दल व विहिंपचे आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** बांगलादेशामध्ये हिंदूवर होत असलेल्या कथित अत्याचाराच्या निषेधार्थ आज गुरुवार २५ डिसेंबर रोजी बजरंग दल व विविध हिंदुत्ववादी संघटनांनी राजकमल चौकात निर्दशने करून बांगलादेश सरकारचा निषेध केला. बांगलादेश मध्ये हिंदू नागरिकांवर अत्याचाराच्या घटना सातत्याने वाढत आहे. अलीकडे एका हिंदू व्यक्तीची हत्या झाल्याच्या घटनेचा तीव्र निषेध आंदोलकांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर या



विषयाची दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. हिंदूवरील अत्याचार थांबवावे, बांगलादेश सरकारने अल्पसंख्यांकांचे संरक्षण करावे अशा घोषणा देण्यात आल्या. ☞(पान २ वर)

# रोहिच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

## -तिवसा ते कुऱ्हा मार्गावर घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा ते कुऱ्हा मार्गावरील भांबोरा फाट्यानजीक अचानक दुचाकी समोर आलेल्या रोहिच्या धडकेमुळे एका ३१ वर्षीय विवाहित तरुणांचा अपघातात मृत्यू झाला. ही घटना बुधवारी २४ डिसेंबर रोजी दुपारी १:३० वाजताच्या दरम्यान घडली. महेश प्रदीप पोल्हाड,रा.भांबोरा असे अपघातातील मृतक तरुणाचे नाव आहे.



महेश पोल्हाड हे नांदगाव पेठ येथील एमआयडीसीत सोफिया कंपनी मध्ये खाजगी कामगार म्हणून कामाला होते.नियमितप्रमाणे आपल्या एमएच २७ इए ०३६३ या क्रमांकांच्या दुचाकीने कामावर जाण्यासाठी निघाले होते.याच दरम्यान शेंदूरजना बाजार ते कुऱ्हा मार्गावरील भांबोरा नजीक दुचाकी समोर अचानक जंगली रोही आडवे आले. रोहिची जबरदस्त धडक दुचाकीला लागल्याने महेश पोल्हाड यांच्या डोक्यासह ☞(पान २ वर)

# ४ तलवारी, फरश्या,२ चाकूसह आरोपी ताब्यात

## -रहमान नगरमध्ये पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर गेट पोलिसांनी रहमान नगर टॉवर लाईन परिसरात आरोपी आमिन खान आशीक खान (वय २३) याच्या घरी धाड मारून ४ तलवारी, १ लोखंडी दांड्याचा फरशा, २ स्टीलचे चाकू असा एकूण ९ हजार २०० रुपयांचा अवैध शस्त्र साठा जप्त केला. आरोपी विरुद्ध कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार नागपूर गेट पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे आरोपी आमिन खान आशिक खानच्या घरी पंचा समक्ष धाड मारून अवैध शस्त्र साठा जप्त केला. पोलीस आयुक्त राकेश



ओला उपायुक्त गणेश शिंदे सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूरी गेटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार, उपनिरीक्षक पंकज गुप्ता, डिबी पथकाचे हेड कॉन्स्टेबल राजेंद्र पिंपळे, मलिक अहमद, इरफान रायलीवाले, प्रवीण ढेंगेकार, अमर पटेल, सागर पंडित, मोहन चव्हाण, संदीप माकोडे, शेखर गायकवाड, इमरान खान, मनीष यादव, भारती वानखेडे यांनी ही कारवाई केली.

# कत्तली साठी जाणाऱ्या ११ गोवंशाला जीवदान

## -शिरखेडमध्ये स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिरखेड फाटा रोडवरील अशोक फार्म हाऊस येथे नाकाबंदी करून कत्तली साठी जाणाऱ्या ११ गोवंशला जीवदान दिले. बोलेरो पिअकप वाहनासह ११ लाख २१ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपी शोएब अख्तर अब्दुल सलीम (वय ३०,जमील कॉलनी) याला अटक केली. त्याचे दोन साथीदार सुफियान कुरेशी वाजीद कुरेशी (वय २८ ) व शेख मजहर शेख हबीब (वय ३०, दोघे जमील कॉलनी) हे फरार आहे.



पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गोवंशीय जातीचे जनावरांची कत्तलीकरिता होणाऱ्या वाहतुकीला आळा घालून टोळी पकडण्यासाठी आदेश दिले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाला शिरखेड हद्दीत पेट्रोलिंग दरमियान गुप्त माहिती मिळाली की, मोर्शी कडून अमरावतीकडे एका बोलेरो पिअकप गाडी मध्ये गोवंश जातीचे जनावरांचे पाय व तोंड बांधून क्रूरतेने वागणूक देऊन गाडीमध्ये कोंबून कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत आहे. त्यानुसार पथकाने शिरखेड फाटा रोडवर अशोका फार्म हाऊस येथे नाकाबंदी करून बोलेरो पिअकप वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला, असता सदर वाहनाच्या चालकाने रोडच्या बाजूला असलेल्या झाडाला वाहन धडकले व पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून आरोपी शोएब अख्तर अब्दुल सलीम (वय ३०,जमील कॉलनी) याला पकडले. त्याचे दोन साथीदार सुफियान कुरेशी व शेख मजहर फरार झाले. गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये ☞(पान २ वर)

# जप्त घराचे सिल तोडून अवैध ताबा

## -चांदूरबाजार पोलिस ठाण्यात गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन त्याचे पैसे न भरल्यामुळे सिल केलेल्या घरावर अवैध ताबा घेण्याचा प्रकार चांदूर बाजार ठाण्याच्या हद्दीत २४ डिसेंबर रोजी उघडकीस उघडकीस आला आहे. या प्रकरणी बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

चांदूर बाजार येथील रहिवासी अकबर हुसेन आणि इकबाल हुसेन यांनी एका फायनान्स कंपनीच्या चांदूर बाजार शाखेतून☞(पान २ वर)

# सुजाण सर्जिकल अँड कॅन्सर हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा शनिवारी

## -१०० बेडसह अत्याधुनिक रेडिओथेरपी मशीन उपलब्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांच्या सुविधेसाठी अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उघडण्यात येत आहे. या मध्ये रेडिओथेरपी सह अत्याधुनिक मशिनरी द्वारा कीमोथेरेपी ऑपरेशन करण्यात येणार आहे. या १०० बेडच्या अत्याधुनिक सुजाण सर्जिकल अँड कॅन्सर हॉस्पिटल चे लोकार्पण उद्या शनिवार २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती आज गुरुवार २५ डिसेंबर रोजी पत्रकार



परिषदेमध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की या रुग्णालयात कीमोथेरेपी साठी विशेषज्ञ डॉक्टरांची टीम उपलब्ध राहणार आहे. पूर्वी कॅन्सरच्या उपचारासाठी नागपूर आणि मुंबई जाण्याची गरज नागरिकांना होती पण आता शहरातच अत्याधुनिक सेवा सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात येत आहे. डॉ. राजेंद्र सिंह अरोरा गेल्या ३५ वर्षापासून कॅन्सर रुग्णांवर उपचार करत आहे. त्यांनी अमरावतीमध्ये कॅन्सर ☞(पान २ वर)

# ख्रिसमस मानवी जीवन अधिक सुखकर बनविणारे पर्व- आ.सुलभा खोडके

### सेंट फ्रान्सिस झेव्हीअर चर्च येथे नाताळ सणाचा आनंदोत्सव

**अमरावती/प्रतिनिधीः-** भगवान येशू यांच्या जन्माचे औचित्य साधून आयोजित मेरी ख्रिसमस हा आनंदाचे क्षण वेचणारा सण असून मानवी जीवन अधिक सुखकर बनविणारे पर्व असल्याचे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी यांनी केले.

अमरावती स्थित इर्विन चौक येथील सेंट फ्रान्सिस झेव्हीअर चर्च येथे नाताळ सणाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. शहराच्या ख्रिस्ती



धर्मप्रांतात प्रभू येशु ख्रिस्तांच्या जन्मपर्व ख्रिसमस दिनाचा उत्साह दिसून आला. याप्रसंगी बिशप माल्कम सिक्वेरा व प्रमुख धर्मगुरू फा.ओनिल गोंसाल्विस यांनी आमदार सुलभा खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यासोबतच यादरम्यान सेंट फ्रान्सिस झेव्हीअर चर्चच्या वतीने सर्व अतिथी मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले.यावेळी आमदार खोडके यांनी सर्व उपस्थितांना ख्रिसमस सणाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा दिल्या.

प्रभू येशू ख्रिस्त यांच्या जन्माचे औचित्य साधून यावेळी चर्चमध्ये उपस्थित अतिथी मान्यवरांचे सह सर्व धर्मबांधव व धर्मभगिनींनी विशेष प्रार्थना केली. ☞(पान २ वर)

# वंचित बहुजन आघाडीची युनायटेड फोरमसोबत युती

## -६० जाग्यावर लढणार मनपा निवडणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले आहे.नगरपरिषद निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर वंचित बहुजन आघाडीचे लक्ष महानगरपालिका निवडणुकीवर आहे. भाजपा सोडून कोणत्याही पक्षासोबत युती करा असे निर्देश वंचित आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी दिले. त्यानुसार आता वंचित आघाडीने मनपा निवडणुकीत युनायटेड फोरम सोबत एकत्र लढण्याचा निर्णय




घेतला असल्याची माहिती आज गुरुवार २५ डिसेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली आहे.

पदाधिका-यांनी सांगितले की युतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई, बसपा, उबाठा, काँग्रेस व इतर समविचारी पक्षांसोबत चर्चा करण्यात आली. परंतु जागा वाटपावर तारतम्य न जुळल्याने पुढे चर्चा होऊ शकली नाही. युनायटेड रिपब्लिकन फोरम-वंचित बहुजन आघाडी यांची बोलणी सुरू असताना व्यवस्था परिवर्तन, भागीदारी व मूलभूत सुविधा या कशा महानगरपालिकेत रुजवता येईल यावर चाचपणी झाल्यावर ☞(पान २ वर)

# 'शिवाजी'च्या आंबा परिषदेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## -विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान

### -कुलगुरू डॉ.शरद गडाख आणि डॉ.विलास खर्चे यांचे आंबा लागवडीचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भात आंब्याचे क्षेत्र वाढायला भरपूर वाव असून केशर आंब्याला देशविदेशात मोठी मागणी आहे.एकात्मिक शेती पद्धतीत आंबा फार मोठे उत्पादन देऊ शकतो. विदर्भात आंबा लागवडीसाठी चांगले कृषी हवामान आहे त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांनी आंब्याची लागवड



यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित आंबा परिषदेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या वानखडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजानन पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, सुरेशदादा खोटरे, प्रा.सुभाष बनसोड, संस्था सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, प्राचार्य डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ ☞(पान २ वर)

**अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख-**
आज कृषिप्रधान देश आहे असे म्हणूनच आपण समाधान मानायचे का?असा सवाल करत कार्यक्रमाचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी शेतीचे उत्पादन ६० टक्क्यावरून चार टक्क्यावर आल्याचे सांगितले.कृषीचे उत्पन्न वाढल्या शिवाय भारताचा जी.डी.पी वाढणार नाही, असेही ते म्हणाले.संस्था भाऊसाहेबांच्या शेतीच्या संदर्भातील विचारांना बांधील असून त्या दृष्टीने कार्य करीत आहे. आमच्या कृषी महाविद्यालयांनी कृषी क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग सुरु केले आहेत.पुढच्या वर्षी पुन्हा भव्य कृषी प्रदर्शनी घेण्याचा संस्थेचा मानस आहे,असेही त्यांनी सांगितले.

# एनडीपीएस पथक, डॉग स्क्वॉडसह शहर पोलिसांची धडक मोहीम

## -रात्री अचानक छापे; ३७ कारखान्यांची तपासणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अंमली पदार्थ, बनावट दारू व अवैध गुटखा निर्मितीच्या शक्यतेने अमरावती शहर पोलिसांनी कंबर कसली आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गुरुवारी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या सरप्राईज तपासणीत चार पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातील बंद व सुरू असलेल्या एकूण ३७ कारखान्यांची झडती घेण्यात आली. मात्र, पहिल्या टप्प्यात कोणतीही बेकायदेशीर बाब आढळून आलेली नसल्याची माहिती पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व श्याम घुगे यांनी दिली.

ही विशेष मोहीम पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट यांच्यासह चार स्वतंत्र पथके मैदानात उतरली होती. नांदगावपेठ, राजापेठ, बडनेरा आणि वलगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील कारखान्यांमध्ये तपास करताना कच्चा माल, यंत्रसामग्री, साठवणूक व्यवस्था आणि कामगारांची माहिती तपासण्यात आली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी काळात या मोहिमेला अधिक धार देण्यात येणार आहे. विशेषतः एनडीपीएस पथक व डॉग स्क्वॉडच्या मदतीने रात्री अचानक छापे टाकण्यात येणार असून, संशयास्पद ☞(पान २ वर)